- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

दैनिक
# सिंहवाणी वृत्त
प्रखर लेखणीचा साक्षीदार

▸ संपादक (विकास) : श्याम पेठकर ▸ संचालक-संपादक : अजय बिवडे

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : सोमवार, ७ सप्टेंबर २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : २६८ | किंमत : २ रूपये

**सोने-चांदी**
- २४ कॅरेट : १,५८,७०० /-
- २३ कॅरेट : १,५६,३५० /-
- चांदी : २,७८,३००/-

Hotel Mai VilLa
Ac/Non Ac Room Available
Add : Velahari, Outer Ring Road, Nagpur
- Contact No -
7796116694
9730107075

सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६

## ५ मजली इमारत कोसळली

### ३ ठार, २ गंभीर, ५० हून अधिक विद्यार्थी ढिगाऱ्याखाली



**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**
राजधानी दिल्लीतील चाणक्यपुरी परिसरात येथील सत्य निकेतन भागात रविवारी ५ मजली इमारत कोसळल्याची घटना घडल्याने मोठी खळबळ उडाली आहे. प्राथमिक माहितीनुसार, जी इमारत कोसळली आहे, त्या इमारतीत मुलांचे हॉस्टेल असल्याने सांगितले जात आहे. या दुर्घटनेनंतर ढिगाऱ्या खाली ५० पेक्षा जास्त मुल अडकल्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले असून मदत आणि बचावकार्य सुरू करण्यात आले आहे. घटनास्थळी स्थानिक नागरिकही मोठ्या संख्येने दाखल झाले असून बचाव पथकाला मदत करत आहेत. या ढिगाऱ्याखाली ५० हून अधिक विद्यार्थी अडकलेच्या सांगितले जात आहे. या दुर्घटनेवरून काँग्रेसने सरकारवर संताप व्यक्त केला आहे. ठरवक ने एक्स वर पोस्ट करत म्हटले, दिल्ली विद्यापीठाच्या साउथ कॅम्पसजवळील सत्य निकेतन परिसरात इमारत कोसळल्याची बातमी अत्यंत चिंताजनक आहे. ढिगाऱ्याखाली दिल्ली विद्यापीठातील विद्यार्थी दबले असल्याची माहिती समोर येत आहे.
एनडीआरएफने पुढे म्हटले, विद्यार्थी आणि सामान्य नागरिकांच्या सुरक्षेबाबत कोणत्याही प्रकारचा हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नाही. दिल्ली विद्यापीठ प्रशासन आणि सरकारने तातडीने युद्धपातळीवर मदत आणि बचावकार्य सुरू करावे. प्रत्येक विद्यार्थी आणि नागरिकाला सुरक्षितपणे बाहेर काढावे. तसेच या घटनेची निष्पक्ष चौकशी करून दोषी व्यक्तींची जबाबदारी निश्चित करावी. विद्यार्थ्यांच्या जीविताबाबत कोणत्याही प्रकारचा निष्काळजीपणा सहन केला जाणार नाही.

## अन्नसुरक्षेसाठी वर्षभर मोहिम : तुकाराम मुंढे



**वृत्तसंस्था, मुंबई**
महाराष्ट्र अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) उत्सव आणि मोठ्या सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये अन्नभेसळ रोखण्यासाठी तसेच नागरिकांना सुरक्षित अन्न मिळावे यासाठी वर्षभर लागू राहणारे सर्वसमावेशक स्थायी आदेश आणि अन्नसुरक्षा कार्यपद्धती (एसओपी) लागू केली आहे. या निर्देशांचा उद्देश उत्सव साजरा करण्याच्या पद्धतीवर नियंत्रण ठेवणे नसून, उत्सवादरम्यान वितरित किंवा विक्री होणारे अन्न सुरक्षित आणि कायद्याच्या चौकटीत आहेत याची खातरजमा करणे हा आहे, असे एफडीए आयुक्त तुकाराम मुंढे यांनी स्पष्ट केले.
उत्सव आणि सार्वजनिक कार्यक्रमांसाठी जारी करण्यात आलेल्या या आदेशाबाबत काही गैरसमज आणि संभ्रम निर्माण झाला आहे. मात्र, या आदेशाद्वारे कोणत्याही धार्मिक किंवा सांस्कृतिक उपक्रमांवर निर्बंध घालण्यात आलेले नाहीत. हा आदेश सर्व धर्म आणि समुदायांच्या उत्सवांना समानपणे लागू असून, विवाहसोहळे, भंडारे, ईद, नाताळ, नववर्षाच्या पूर्वसंध्येला होणारे कार्यक्रम तसेच इतर सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये दिल्या जाणाऱ्या अन्नाच्या सुरक्षेची खात्री करण्यासाठी आहे. आम्ही उत्सवांचे नियमन करत नाही. उत्सवांमध्ये दिले जाणारे अन्न सुरक्षित आहे की नाही, याची खात्री करत आहोत.

### थोडक्यात

## लालपरी उत्पन्नात ६६ कोटींची वाढ

**मुंबई :** जुलै महिन्याच्या तुलनेत ऑगस्टमध्ये एसटीच्या उत्पन्नात तब्बल ६६ कोटी रुपयांची वाढ झाली आहे. उत्पन्नवाढीसाठी सुचविलेल्या उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी सुरू झाल्याने एसटीच्या तोट्याचे प्रमाणही कमी होऊ लागले आहे. आगामी काही महिन्यांत एसटीचा चालू तोटा भरून काढण्याच्या दिशेने महामंडळाची वाटचाल सुरू असल्याचा विश्वास परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी व्यक्त केला. एसटीचे प्रत्येक आगार हे त्या परिसरातील सर्वसामान्य जनतेला प्रवासी सेवा देण्यासाठी निर्माण करण्यात आले आहे. एसटीच्या एकूण प्रवाशांपैकी तब्बल ८५ टक्क्यांहून अधिक प्रवासी १०० किलोमीटरच्या आतील अंतरात प्रवास करतात. त्यामुळे प्रत्येक आगाराने आपल्या कार्यक्षेत्रातील प्रवाशांची गरज ओळखून त्यानुसार वाहतूक नियोजन करणे आवश्यक आहे. मात्र, गेल्या काही वर्षांत याकडे अपेक्षित लक्ष न देता लांब पल्ल्याच्या, तुलनेने अनुत्पादक फेऱ्यांवर अधिक भर दिला जात होता. त्यामुळे प्रवासी संख्या आणि उत्पन्नाच्या तुलनेत खर्च अधिक होऊन एसटीच्या तोट्यात भर पडत होती. मागील महिन्यात उत्पन्नवाढीचा आढावा घेताना मंत्री सरनाईक यांनी ही बाब स्पष्टपणे निदर्शनास आणून दिली होती.
ऑगस्ट महिन्यापासून प्रत्येक आगाराने प्रवाशांची प्रत्यक्ष उपलब्धता आणि प्रवासाची मागणी लक्षात घेऊन वेळापत्रकात आवश्यक बदल करण्यास सुरुवात केली. ग्रामीण तसेच निमशहरी भागातील दररोज प्रवास करणारे नोकरदार, शेतकरी, महिला, विद्यार्थी-विद्यार्थिनी आणि ज्येष्ठ नागरिक यांच्या प्रवासाच्या वेळा लक्षात घेऊन बसफेऱ्यांचे नियोजन करण्यात आले.

## विभागांतर्गत पीएसआय पदाच्या परीक्षेत १५० जण मास कॉपी करुन पास

### अभिजीत लेंडवे आणि इतर अधिकाऱ्याविरोधात पुरावे हाती, रोहित पवारांचा दावा



**वृत्तसंस्था, पुणे**
राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे कर्जत जामखेडचे आमदार रोहित पवार यांनी एमपीएससी आणि इतर स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या उद्याच्या आक्रोश मोचार्पूर्वी मोठा आरोप केला आहे. रोहित पवार यांनी एक्स प्लॅटफॉर्मवर एक पोस्ट शेअर केली आहे. त्या पोस्टमध्ये रोहित पवार यांनी विभागांतर्गत पोलीस उपनिरीक्षक भरती परीक्षेत मास कॉपी झाल्याची माहिती मिळाल्याचा दावा केला आहे. मास कॉपी करुन १५० जण पास झाले असून त्यासंदभार्तील काही पुरावे देखील मिळाल्याचं रोहित पवारांनी म्हटलं आहे.
विभागांतर्गत (डिपार्टमेंटल) ढरकपदाच्या परीक्षेत ६१५ पैकी जवळपास १५० जण मास कॉपी करून पास झाल्याची माहिती समोर आली आहे.
एफडीए पेपरफुटीमधील आरोपी अभिजीत लेंडवे आणि त्याच दजार्चा इतर एक अधिकारी यात सहभागी असल्याचे पुरावे आमच्याकडे आले आहेत, याचा लवकरच खुलासा करू.
कुठल्याही परिस्थितीत मेहनत करून पास झालेल्या उमेदवारांवर अन्याय होणार नाही याची दक्षता घेऊन गैरप्रकार करणाऱ्यांची चौकशी झालीच पाहिजे. अभिजीत लेंडवे सारख्या अधिकाऱ्यांसह उच्चपदस्थ अधिकाऱ्यांनी आयोगाची प्रतिष्ठा खराब केली असून आयोगाच्या विश्वासार्हतेला तडे गेले असून अशा भ्रष्ट अधिकाऱ्यांच्या कचाट्यातून आयोग मुक्त होणे गरजेचे आहे. त्यासाठीच पुण्यात उद्याचा मोर्चा आहे.
रोहित पवार यांनी अन्न व औषध प्रशासन विभागाच्या औषध निरीक्षक पेपरफुटी प्रकरणात अटकेत असलेल्या अभिजीत लेंडवे आणि इतर एका अधिकाऱ्याचा त्यामध्ये समावेश असल्याचं म्हटलंय.

**ठाकरेंच्या शिवसेनेचा मोर्चाला पाठिंबा**

एमपीएससी परीक्षांमधील पेपरफुटी आणि सातत्याने होणाऱ्या गोंधळामुळे विद्यार्थ्यांचा व्यवस्थेवरील विश्वास पूर्णपणे उडाला आहे. उद्या आपल्या हक्कासाठी रस्त्यावर उतरणाऱ्या या विद्यार्थ्यांच्या शिष्टमंडळाने आज भेट घेतली, असं आदित्य ठाकरेंनी एक्स पोस्ट करत म्हटलं. उद्याच्या मोर्चाला आमचा पूर्ण पाठिंबा आहे. आम्ही एमपीएससीच्या विद्यार्थ्यांसोबत आहोत. स्थानिक शिवसेना आणि युवासेना उद्या मोर्च्यात सहभागी होणार आहे, अशी घोषणा देखील आदित्य ठाकरेंनी केली आहे.

**विद्यार्थी आक्रोश मोर्चाचे आयोजन**

पेपरफुटीप्रकरणी एमपीएससीचे अध्यक्ष विवेक भीमनवार यांनी राजीनामा द्यावा आणि या पदावर स्वच्छ प्रतिमेच्या अधिकाऱ्याची नेमणूक करावी, यासह लाखो विद्यार्थी आणि शिक्षकांच्या इतरही काही मागण्या आहेत. याच मागण्यांच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या हक्कासाठी आणि प्रामाणिक अधिकाऱ्यांच्या माध्यमातून देशाच्या उज्ज्वल भविष्यासाठी सोमवार, दि. ७ सप्टेंबर रोजी पुण्यातील ओंकारेश्वर मंदिर चौकापासून (महर्षी विठ्ठल रामजी शिंदे पूल) जिल्हाधिकारी कार्यालयावर सकाळी १० वाजता विद्यार्थी आणि शिक्षकांचा विराट आक्रोश मोर्चा काढण्यात येणार आहे. या मोर्चात सहभागी होणार असल्याचं रोहित पवार यांनी म्हटलं आहे.

## महापुरुषांच्या रांगेत पंतप्रधानांचा फोटो नको : राज ठाकरे



**वृत्तसंस्था, ठाणे**
राज्यातील जनतेना वेगळ्या गोष्टीमध्ये गुंतवण्याचे काम सुरू आहे. देशात धर्मांची झिंग आली आहे, देवावरची श्रद्धा, धर्माबद्दलचा अभिमान इतके आपण समजू शकतो पण माणसांनी धर्मांध असू नये. आपल्या धमार्चा आपल्याला अभिमान असला पाहिजे.राज ठाकरे म्हणाले की, काही लोक टीव्हीवर येतात आणि जे तोंडाला येते ते लोकांना सांगत असतात. राम आणि रावणाचे जेव्हा युद्ध झाले त्यावेळी रावणाची १ लाख मुलं आणि दीड लाख नातू मारले गेले. मला जितकं माहिती आहे की रावणाला केवळ १० तोंडं होती. एक लाख मुलं होती. काहीही स्टो-या हे लोक सांगत असतात. देश कुठे चालला आहे आणि हे लोक भस्म लावत काय स्टोरी सांगत आहेत.
राज ठाकरे म्हणाले की, २०२१ मध्ये देशातील ज्या परदेशी कंपन्या भारतात आल्या होत्या त्यामधील ५०० कंपन्यांनी देशातील आपले कामकाज बंद केले आहे. यातून किती नोकऱ्या गेल्या याचा अंदाज बांधला पाहिजे, हा केंद्र सरकारचा डेटा आहे, मी तयार केला नाही. देशात मोठ्या प्रमाणात बेरोजगारी वाढत आहे.
हिंदू-मुस्लिमांनी काळजी घ्यावी राज ठाकरे म्हणाले की, आता गणपतीचे दिवस आहेत. या दिवसांमध्ये दंगली घडवल्या जाण्याची शक्यता आहे. देशभरात हेच सुरू आहे, जेणेकरून तुम्ही त्यामध्येच अडकले पाहिजे आणि दुसऱ्या गोष्टीकडे तुमचे लक्ष जाऊ नये. मुंबईत तुम्ही याची झलक पाहिली आहे. माझे मुस्लिम आणि हिंदू दोघांनाही सांगणे आहे की यात पडू नका.
राज ठाकरे म्हणाले की, अमित ठाकरे पुण्यात गेले त्यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा फोटो काढण्यावरून वाद झाला. छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले यांच्या रांगेत दुसरे कोणी बसू शकत नाही. पंतप्रधानांचा फोटो सरकारी कार्यालयात लावला जावा का तर हो पण तो दुसऱ्या भिंतीवर लावला पाहिजे. महापुरुषांच्या रांगेत पंतप्रधानांचा फोटो लावू नये. पण कोणत्या रांगेत कोणाचा फोटो पाहिजे हे सर्वांना कळले पाहिजे. त्यामुळे आताच ही गोष्ट सुधारा.

**देशाची आर्थिक परिस्थिती अत्यंत बिकट**

राज ठाकरे म्हणाले की, नरेंद्र मोदी यांनी परदेशात जात भारतीयांना सांगितले की परदेशात जाऊ नका, सोनं खरेदी करू नका. देशाचा जीडीपी जर इतर देशापेक्षा जास्त असेल तर परदेशात जायचे का नाही? सोनं खरेदी का करायचे नाही? जेव्हा टंचाई असते तेव्हाच आपण पैसे वाचवतो. आर्थिक परिस्थिती खूप खराब झाली आहे. आज केवळ जेन झी रस्त्यावर आले. उद्या संपूर्ण देश रस्त्यावर येईल. तुम्हाला जातीयवाद, धार्मिक तेढ यामध्ये गुंतवायचे म्हणजे तुम्ही काही दुसरे बोलणार नाही. हे लोक पत्रकारांना बातम्याच देऊ देत नाहीत. म्हणून सोशल मीडियावर लोक व्यक्त होतात.

## मजुरांचा प्रामाणिकपणा, खोदकाम करताना सापडलेली १४ सोन्याची नाणी ग्रामपंचायतीकडे दिली

### सोन्याच्या नाणींवर हत्तीचे चित्र, १५ व्या शतकातील नाणी



**वृत्तसंस्था, बेळगाव**
अनेकदा जुन्या वाड्यात किंवा पुरातत्व विभागाच्या अखत्यारित असलेल्या ऐतिहासिक वास्तूंमध्ये खोदकाम करताना किंवा त्यांची नव्याने पायाभरणी करताना मौल्यवान वस्तू आढळल्याच्या घटना यापूर्वी समोर आल्या आहेत. काहीवेळा, सोन्याची नाणी किंवा सोन्याचा हंडा अशाही मौल्यवान वस्तू आढळल्या आहेत. मात्र, आता चक्क १५ व्या शतकातील सोन्याची नाणी आढळून आली आहेत. पूर्वाश्रमीची महात्मा गांधी रोजगार हमी योजना आणि सध्याच्या व्ही.बी.जी. राम योजनेअंतर्गत बेळगाव जिल्ह्यात सुरु असलेल्या कामाच्यावेळी माती खणत असताना कामगारांना सोन्याची १४ प्राचीन नाणी सापडल्याने अनेकाच्या भुवया उंचावल्या आहेत. विशेष म्हणजे या नाण्यावर हत्तीचे चित्र असून ही नाणी दहाव्या ते पंधराव्या शतकतील असण्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.
सोनं म्हटलं की भल्याभल्यांना मोह सुटतो, कित्येकदा सोनं चोरी, चैन स्नॅचिंगसारख्या घटना घडत आहेत. सोन्याच्या दागिन्यांसाठी जीवघेणा हल्ला झाल्याच्याही घटना समोर आल्या आहेत. मात्र, रोजंदारीवर काम करणाऱ्या गरीब मजुरांना या सोन्याचा कसलाही मोह नसल्याचे दिसून आले. कारण, सोन्याची सापडलेली नाणी त्यांनी प्रामाणिकपणे ग्रामपंचायतीकडे जमा केली.
बेळगाव जिल्ह्याच्या बैलहोंगल तालुक्यातील इंचल गावात खोदकाम सुरु असताना एका मडक्यात सोन्याची चौदा नाणी सापडली आहेत. सापडलेली नाणी मजुरानी स्वतःकडे न ठेवता ती तातडीने ग्रामपंचायत कार्यालयात जमा केली. इंचल येथील बीसीएम वसतिगृहा जवळ व्ही.बी.जी. रामजी योजनेंतर्गत खोदकाम सुरू होते. काम करत असताना मजुरांना एक मडके सापडले आणि त्या मडक्यात तब्बल १४ सोन्याची नाणी आढळून आली आहेत. त्यामुळे, कामगारांमध्ये उत्सुकता पाहायला मिळाली. मात्र, कामगारांनी ही नाणी प्रामाणिकपणे ग्रामपंचायत कार्यालयाकडे जमा केली. त्यानंतर, ही नाणी तहसिलदारांच्याकडे सुपूर्द करण्यात आली आहेत.
मडक्यातील या सोन्याच्या नाण्यांवर आढळलेल्या हत्तीच्या चित्रावरून या नाण्यांचा संबंध पश्चिम गंगांच्या तळकाड राजवटीशी किंवा विजयनगर साम्राज्याच्या काळाशी असण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. काही नाण्यांच्या दर्शनी भागावर अलंकारयुक्त हत्तीचे चित्र दिसून येते. पश्चिम गंगा राजवटीच्या राजचिन्हाशी संबंधित हत्तीच्या प्रतिमेमुळे या नाण्यांना ऐतिहासिक महत्त्व असण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. दरम्यान, या सुवर्णलाभाचा आणि या नाण्यांची पंचक्रोशीत व जिल्ह्यात जोरदार चर्चा सुरू आहे.

## वाघिणीच्या हल्ल्यात युवती ठार



**दै. सिंहवाणी वृत्त, अमरावती**
वाघिणीच्या हल्ल्यात एका १८ वर्षीय युवतीचा मृत्यू झाल्याची घटना चांदूर बाजार तालुक्यातील सोनोरी येथील शेतशिवारात रविवारी घडली. सुमारे दहा दिवसांपुर्वी मोर्शी तालुक्यात याच वाघिणीच्या हल्ल्यात एका ५२ वर्षीय शेतकऱ्याचा मृत्यू झाल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. या घटनांनी गावकऱ्यांमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. दरम्यान, नागरिकांनी वनविभागाच्या विरोधात रोष व्यक्त केला. संतप्त जमावाने वनविभागाच्या वाहनांची तोडफोड केली. या वाघिणीला तत्काळ जेरबंद करण्याची मागणी गावकऱ्यांनी केली आहे.
संध्याकाळी ४ च्या सुमारास, उर्मिला इवाने (वय १८) ही तरुणी शेतात चारा कापण्यासाठी गेली असताना तिचा वाघिणीच्या हल्ल्यात मृत्यू झाला. चारा कापत असताना उर्मिलाला वाघीण आपल्या दिशेने येताना दिसली; तिने झाडावर चढण्याचा प्रयत्न केला, परंतु वाघिणीने तिच्यावर हल्ला करून तिला ओढत झुडपांमध्ये नेले. नंतर गावकऱ्यांना तिचा मृतदेह आढळला.
मोर्शी तालुक्यानंतर आता ही वाघिण चांदूर बाजार तालुक्यातून मार्गक्रमण करीत आहे. मोर्शी तालुक्यातील भांबोरा येथे एका शेतकऱ्याचा बळी घेतल्यानंतर, सुमारे ५० किलोमीटरचा प्रवास करून या वाघिणीने दोन दिवसांपूर्वी रिद्धपूर येथील मौजा नजरपूर शेत शिवारात एका शेतकऱ्याच्या गायीवर हल्ला केला होता. वाघिणीला बेशुद्ध करून पकडण्यासाठी वनविभागाचे पथक रात्रभर पिंजरे आणि ट्रॅप कॅमेरे लावून दबा धरून बसले होते, परंतु वाघीण आपल्या शिकारीचे मांस खाण्यासाठी परतली नाही; त्यामुळे वनविभागाला रिकाम्या हाताने परतावे लागले.

संपादकीय लेखणीतून...

# नरवीर राजे उमाजी नाईक

भारताच्या इतिहासात अनेक ऐतिहासिक घटना घडल्या आहेत काहींची नोंद झाली, काहींची दखलच घेण्यात आली नाही. सन १८५७ च्या उठावाअगोदरही अनेक उठाव झाले अशाच पहिल्या उठावाद्वारे इंग्रजांना सलग १४ वर्ष सळो की पळो करून सोडणारे व सर्व प्रथम क्रांतीचे स्वप्न पाहणारे महाराष्ट्रातील निधड्या छातीचे वीर आद्यक्रांतिकारक नरवीर ठरले गेले, ते म्हणजे राजे उमाजी नाईक! क्रांतिकारकांत राजे उमाजी नाईक हे तसे उपेक्षित राहून गेले. "मरावे परि कीतिरूपे उरावे" अशी उक्ती आहे, ती राजे नाईक यांच्या क्रांतिला तंतोतंत जुळते. त्यांचा गौरव करण्यापासून इंग्रज अधिकारीही स्वतःला रोखू शकले नाहीत. इंग्रज अधिकारी कॅप्टन रॉबर्टसन याने सन १८२०ला ईस्ट इंडिया कंपनीला लिहिताना म्हटले आहे, "उमाजीचा रामोशी समाज इंग्रजांविरुद्ध तिरस्काराने पेटला असून तो कोणत्या तरी राजकीय बदलाची वाट पाहत आहे. जनता त्यांना मदत करत असून कोणी सांगावे हा उमाजी राजा होऊन छत्रपती शिवाजी सारखे राज्य स्थापणार नाही?" तर मॅकिन्टॉश म्हणतो, "उमाजीपुढे छत्रपती शिवरायांचा आदर्श होता. त्याला फाशी दिली नसती तर तो दुसरा शिवाजी झाला असता." जर इंग्रजांनी कूटनीती आखली नसती तर, कदाचित तेव्हाच भारताला स्वातंत्र्य लाभले असते."

उमाजीराजे नाईक यांचा जन्म रामोशी-बेरड समाजात लक्ष्मीबाई व दादोजी नाईक खोमणे यांच्या पोटी दि.७ सप्टेंबर १७९१ रोजी पुणे जिल्ह्यातील किल्ले पुरंदर येथे झाला. वडील दादोजी नाईक खोमणे पुरंदर किल्ल्याचे वतनदार होते. त्यामुळे उमाजीराजेंचे कुटुंब पुरंदर व वज्रगड किल्ल्यांच्या संरक्षणाची जबाबदारी पार पाडत होते. त्यामुळेच त्यांना नाईक ही पदवी मिळाली होती. उमाजीराजे जन्मापासूनच हुशार, चंचल, शरीराने धडधाकट, उंचापुरे आणि करारी होते. त्यांनी पारंपरिक रामोशी हेर कला लवकरच आत्मसात केली. जसे उमाजीराजे मोठे होत गेले तसा त्यांनी वडील दादोजी नाईक यांच्याकडून दांडपट्टा, तलवार, भाला, कुऱ्हाडी, तीरकामठा, गोफण वगैरे चालवण्याची कला अवगत केली होती व किल्ले वज्रगड परिसरात या युद्धकलांचे प्रशिक्षण दादोजी नाईक यांनी दिले. त्यामुळे राजे उमाजी नाईक यांचे गुरू त्यांचे वडीलच होते. आणि आजही राजांची तालीम वज्रगड वर इतिहासाची साक्ष देत दिमाखात उभी आहे. याच तालमीत राजांनी आपलं शरीर बळकट बनविले व ब्रिटिशांविरुद्ध सशस्त्र क्रांतीचा पहिला बंड पुकारला. म्हणूनच त्यांना पहिले आद्यक्रांतिवीर पण म्हणतात. इंग्रजांनी भारतात आपली सत्ता स्थापन करण्यास सुरुवात केली होती. हळूहळू मराठी मुलुख जिंकत त्यांनी पुणे ताब्यात घेतले. इ.स. १८०३मध्ये पुण्यात दुसऱ्या बाजीराव पेशव्यास स्थानापन्न केले आणि त्याने इंग्रजांचा पाल्य म्हणून काम सुरू केले. सर्वप्रथम त्याने इतर सर्व किल्ल्यांप्रमाणे पुरंदर किल्ल्याच्या वतनदारीचे व संरक्षणाचे काम रामोशी समाजाकडून काढून घेऊन आपल्या मर्जीतील लोकांकडे दिले. त्यामुळे रामोशी समाजावर उपासमारीची वेळ आली. जनतेवर इंग्रजी अत्याचार वाढू लागले. अशा परिस्थितीत करारी उमाजीराजे बेभान झाले. छत्रपती शिवरायांना श्रद्धास्फूर्तीचे स्थान देत त्यांचा आदर्श घेऊन स्वतःच्या अधिपत्याखाली स्वराज्याचा पुकार करत माझ्या देशावर परकीयांना राज्य करू देणार नाही, असा पण करत विठोजी नाईक, कृष्ण नाईक, खुशाबा रामोशी, बापू सोळस्कर यांना बरोबर घेऊन कुलदैवत जेजुरीच्या श्री खंडोबारायाला भंडारा उधळत शपथ घेतली व इंग्रजांविरोधात पहिल्या बंडाची गर्जना केली.

उमाजीराजे नाईक यांनी इंग्रज, सावकार, मोठे वतनदार अशा लोकांना लुटून गोरगरिबांना आर्थिक मदत करण्यास सुरुवात केली. कोणत्याही स्त्रीवर अत्याचार अन्याय झाल्यास तर ते भावासारखा धावून जाऊ लागले. इंग्रजांना त्रास दिल्यामुळे उमाजीराजेंना सरकारने इ.स. १८१८मध्ये एक वर्ष तुरुंगवासाची शिक्षा दिली परंतु, तो काळ सत्कारणी लावत त्यांनी त्याकाळात तुरंगात लिहिणे वाचणे शिकले. या घटनेचे इंग्रज आधिकारी कॅप्टन मॅकिन्टॉश याने फार आश्चर्य व कौतुक केले आणि तुरूंगातून सुटल्यानंतर इंग्रजांविरुद्धाच्या त्यांचा कारवाया आणखी वाढल्या. उमाजीराजे देशासाठी लढत असल्याने जनताही त्यांना साथ देऊ लागली आणि इंग्रज मेटाकुटीला आले. उमाजीराजेंना पकडण्यासाठी इंग्रज अधिकारी मॅकिन्टॉश याने सासवड-पुरंदरच्या मामलेदारास फर्मान सोडले. मामलेदार इंग्रजी सैन्य घेऊन पुरंदरच्या पश्चिमेकडील एका खेड्यात गेला असता तेथे त्यांच्यात आणि उमाजीराजेंच्या सैन्यात तुंबळ युद्ध झाले आणि इंग्रजांना पराभव स्वीकारावा लागला. उमाजीराजेंचे सैन्य डोंगरात टोळ्या करून राहत असे. एका सैन्य तुकडीत जवळ जवळ ५ हजार सैनिक होते.

# डीजे'च्या जीवघेणा अतिरेकाविरुद्ध 'एक' शांतता दूत!

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल, वर्धा

आनंद साजरा करणे, उत्सव साजरे करणे हा मानवी जीवनाचा आणि आपल्या संस्कृतीचा एक अविभाज्य भाग आहे. मात्र, अलिकडच्या काळात 'आनंद' साजरा करण्याच्या प्रकारात बदल झाला आहे. आजकाल कोणत्याही लहान-मोठ्या कार्यक्रमात, मिरवणुकीत 'डीजे' चा धडाडणारा आवाज प्रतिष्ठेचे लक्षण मानला जाऊ लागला आहे. परंतु, हाच डीजे आता केवळ मनोरंजनाचे साधन न राहता 'जीवघेणा दणदणाट' बनला आहे. या आवाजाच्या गर्दीत माणसाचा सामाजिक विवेक हरवत चालला आहे आणि या अन्यायाविरुद्ध लढणाऱ्या एका सामान्य नागरिकाचा लढा आज अत्यंत महत्त्वाचा ठरत आहे.

महाराष्ट्र ही मुळातच उत्सवप्रिय भूमी असली तरी, लोकमान्य टिळकांनी समाजप्रबोधनासाठी आणि राष्ट्रीय एकतेसाठी सुरू केलेल्या सार्वजनिक उत्सवांचे मूळ व उदात्त स्वरूप आज पूर्णपणे हरवले आहे. आजकाल पारंपारिक वाद्यांची आणि अभिजात सांस्कृतिक सादरीकरणाची जागा आता छातीतील ठोके चुकवणाऱ्या आणि भिंती हादरवून सोडणाऱ्या डीजे तसेच डोळ्यांना थेट अंधत्व आणणाऱ्या लेझर लाईट्सने घेतली आहे, जो केवळ आपला वैचारिक व सांस्कृतिक ऱ्हास नसून सार्वजनिक आरोग्याला आणि कायदा-सुव्यवस्थेला निर्माण झालेला एक अत्यंत गंभीर धोका आहे. याच भयानक वास्तवाच्या पार्श्वभूमीवर, ध्वनी प्रदूषणाच्या नियमांचे राजरोसपणे उल्लंघन करून सामान्य नागरिकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या बेदरकार डीजे चालकांना पुणे न्यायालयाने नुकताच चांगलाच दणका दिला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आणि राष्ट्रीय हरित लवादाच्या मार्गदर्शक तत्त्वांचे काटेकोरपणे पालन करत एका महत्त्वपूर्ण प्रकरणात तीन डीजे चालकांना दोषी ठरवून त्यापैकी एकाला कठोर शिक्षा सुनावली आहे.

पुण्यातील एका ईदच्या मिरवणुकीत पोलिसांच्या स्पष्ट सूचनांकडे आणि नोटिशीकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करून 'अल मदिना यंग बॉईज' या मंडळाने सर्वोच्च न्यायालयाच्या मर्यादेपेक्षा कितीतरी पटीने जास्त आवाजात डीजे वाजवल्याप्रकरणी पुणे पोलिसांनी केलेली कारवाई आणि न्यायालयाने दिलेला हा निकाल, मनोरंजनाच्या नावाखाली सार्वजनिक शांतता भंग करणाऱ्या प्रवृत्तींना बसलेली एक मोठी कायदेशीर चपराक असून संपूर्ण राज्यासाठी हा एक भक्कम 'कायदेशीर दाखला' ठरला आहे.

परंतु, कायद्याची अंमलबजावणी केवळ पोलिसांवर आणि प्रशासनावर सोडून चालत नाही; त्यासाठी समाजातही प्रगल्भ जागरूकता असावी लागते. 'समाजाच्या विधायक कामासाठी... एक नागरिक समाजाचे परिवर्तन घडवून आणतो', हे विधान पुण्यातील जागरूक सामाजिक कार्यकर्ते विद्यानंद बापट यांनी स्वतःच्या कृतीतून सार्थ ठरवून दाखवले आहे. वाढते ध्वनी प्रदूषण आणि लेझर लाईट्सविरुद्ध त्यांनी एकाकी परंतु अतिशय अभ्यासपूर्ण, सनदशीर व तीव्र मोहीम सुरू केली. मात्र, समाजहिताच्या या भूमिकेमुळे ५ सप्टेंबर २०२६ रोजी त्यांच्यावर डीजे समर्थकांकडून (ज्यामध्ये संतोष चव्हाण या मुख्य आरोपीचा समावेश आहे) झालेला भ्याड शारीरिक हल्ला हेच दर्शवतो की, डीजेचा व्यवसाय आता केवळ मनोरंजनापुरता उरलेला नसून त्याला पैशांच्या आणि गुंडगिरीच्या जोरावर एका 'माफिया' स्वरूपाची काळी किनार प्राप्त झाली आहे.

विद्यानंद बापट यांच्यावरील या भ्याड हल्ल्यानंतर समाजात उसळलेली संतापाची लाट अतिशय स्वाभाविक होती. या घटनेनंतर राजकीय तसेच प्रशासकीय पातळीवर वेगाने चक्रे फिरली असून, एका बाजूला शिवसेना (ठाकरे गट) सारख्या राजकीय पक्षांनी बापट यांच्या भूमिकेला जाहीर पाठिंबा देत राज्यभर डीजे बंदीची मागणी लावून धरली आहे. तर दुसरीकडे, नागपूरचे पोलीस आयुक्त विश्वास नांगरे पाटील यांनी नागपूर शहरात आगामी सणांच्या पार्श्वभूमीवर १ नोव्हेंबरपर्यंत डीजेवर पूर्णपणे बंदी घालण्याचे अतिशय धाडसी व प्रशासकीय इच्छाशक्तीचे दर्शन घडवणारे पाऊल उचलले आहे. ज्या कडक अंमलबजावणीची आज सांगली-मिरज, कोल्हापूर, पुणे, मुंबईसह संपूर्ण राज्यभर नितांत गरज निर्माण झाली आहे. प्रशासनाने जर अशीच कठोर भूमिका घेतली, तरच या वाढत्या सांस्कृतिक आणि सामाजिक प्रदूषणाला वेळीच आळा घालता येईल.

या सर्व सामाजिक असंतोषामागे आणि न्यायालयीन लढ्यामागे एक अतिशय गंभीर वैद्यकीय तसेच वैज्ञानिक वास्तव दडलेले आहे. निसर्गाने दिलेला सर्वसामान्य मानवी कान जास्तीत जास्त ६० ते ७० डेसिबलपर्यंतचा आवाज सुरक्षितपणे सहन करू शकतो आणि 'ध्वनी प्रदूषण (नियंत्रण आणि नियमन) नियम, २०००' नुसार रहिवासी क्षेत्रांमध्ये दिवसा ५५ व रात्री केवळ ४५ डेसिबलची मर्यादा आखून दिली आहे. असे असताना, प्रत्यक्षात रस्त्यावरील मिरवणुकांमधील डीजेचा आवाज १०० ते १२० डेसिबलच्याही पुढे जातो, जो मानवी सहनशीलतेच्या पलीकडचा आहे. या प्रचंड आवाजामुळे आणि विशेषतः डीजेच्या 'सबवूफर'मधून निघणाऱ्या थेट कंपनांमुळे कानाच्या पडद्याला कायमची इजा होते, हृदयाच्या ठोक्यांची गती अचानक बदलते, रक्तदाब वाढतो आणि हृदयविकाराचा झटका येण्याचा धोका कैकपटीने वाढतो, ज्याचे मूक आणि असहाय्य बळी लहान मुले, गर्भवती माता आणि ज्येष्ठ नागरिक ठरत आहेत. शांततेत जगण्याचा अधिकार हा राज्यघटनेने दिलेल्या 'जगण्याच्या अधिकाराचा' एक अविभाज्य भाग आहे.

पुण्याच्या न्यायालयाने दिलेला हा ऐतिहासिक निकाल आणि एका सामान्य नागरिकाने प्राणांची बाजी लावून उभारलेला हा अभूतपूर्व लढा समाजासाठी एक मोठा धडा असून, आता प्रशासनाने कोणत्याही राजकीय दबावाला बळी न पडता कायद्याची अत्यंत कठोर अंमलबजावणी करावी. समाजानेही आत्मपरीक्षण करावे, कारण खरा उत्सव हा विधायक आनंदात आणि समाज जोडण्यात असतो, माणसांचे जीव घेणाऱ्या या क्रूर आणि हिडीस दणदणाटात नक्कीच नाही.

पूर्वी सण-उत्सव हे माणसांना एकत्र आणण्यासाठी आणि आनंद वाटण्यासाठी असायचे. तिथे 'नाद' असायचा, पण 'गोंगाट' नसायचा. आज मात्र समाजात कमालीची असंवेदनशीलता पाहायला मिळते.स्वाथार्साठी दुसऱ्यांचे आरोग्य धोक्यातः "माझा सण, माझा आनंद, मी काहीही करणार" या अहंकारातून शेजाऱ्याला किंवा रस्त्यावरून जाणाऱ्या व्यक्तीला काय त्रास होतोय, याचा विचार करायला कोणी तयार नाही.परंपरांच्या नावाखाली गैरप्रकारः ढोल-ताशा, पारंपरिक वाद्ये याऐवजी पाश्चात्त्य डीजेच्या तालावर अश्लील गाणी वाजवणे आणि त्यावर थिरकणे याला संस्कृतीचे नाव दिले जात आहे.रात्री १० नंतर लाऊडस्पीकर किंवा डीजे वाजवण्यास कायद्याने बंदी असली, तरी नियमांचे उल्लंघन करण्यात अनेकांना मोठेपण वाटते. हीच प्रवृत्ती समाजाचा 'विवेक' हरवत चालल्याची साक्ष देते.

- ९५६१५९४३०६

# पोलिस सहकारः ट्रॅफिक वॉर्डन आणि आरएसपी

कृष्णकुमार निकोडे गडचिरोली

आंतरराष्ट्रीय पोलीस सहकार दिन दरवर्षी ७ सप्टेंबर रोजी साजरा केला जातो. या दिनाचा उद्देश जगभरातील पोलीस संस्थांमध्ये सहकार्य वाढविणे, माहितीची देवाणघेवाण करणे आणि जागतिक सुरक्षेसाठी एकत्र काम करण्याची भावना बळकट करणे हा आहे. विविध देशांतील पोलीस संघटनांमध्ये सुसंवाद, एकत्रित योजना आणि गुन्हेगारीविरोधात सामूहिक प्रयत्नांच्या महत्त्वावर या दिवशी भर दिला जातो.

आंतरराष्ट्रीय स्तरावर कार्यरत असलेल्या पोलिसांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे गुन्हेगारीच्या नेटवर्कला उध्वस्त करण्यासाठी, मानव तस्करी, दहशतवाद, ड्रग तस्करी, सायबर गुन्हेगारी इत्यादी समस्यांवर प्रभावीपणे उपाययोजना करता येतात. या सहकारामुळे आंतरराष्ट्रीय सुरक्षेला बळकटी येते आणि विविध देशांतील नागरिकांच्या जीवनात सुरक्षितता नांदते. या दिवसाचे औचित्य साधून, पोलीस अधिकारी आणि संस्थांना त्यांच्या अतुलनीय कायार्साठी सन्मानित केले जाते. आंतरराष्ट्रीय पोलीस सहकार दिन पोलीस संस्थांच्या एकत्रित शक्तीवर भर देतो, ज्यामुळे गुन्हेगारी विरोधातील लढाई अधिक प्रभावी ठरते. याचा परिणाम म्हणून जागतिक स्तरावर शांतता आणि सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी पोलीस यंत्रणांची भूमिका महत्त्वपूर्ण ठरते. पोलीस आणि जनता यांच्यातील सहकार्य ही कोणत्याही समाजातील कायदा, सुव्यवस्था आणि शांतता टिकवून ठेवण्यासाठी अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया आहे. पोलिसांचे काम केवळ गुन्हेगारांना पकडणे नसून, जनतेच्या सहकार्याने गुन्हेगारीला प्रतिबंध करणे होय.

पोलीस सहकार्याचे मुख्य उपक्रमः महाराष्ट्र पोलिसांनी नागरिकांना सुरक्षिततेच्या कामात सहभागी करून घेण्यासाठी काही महत्त्वाच्या यंत्रणा उभारल्या आहेत.

ग्रामसुरक्षा दलः ग्रामीण भागात रात्रीच्या वेळी गस्त घालण्यासाठी आणि चोऱ्या किंवा मालमत्तेचे गुन्हे रोखण्यासाठी स्थानिक नागरिकांचे हे दल पोलिसांना मदत करते.

मोहल्ला एकता समितीः शहरी व संवेदनशील भागांमध्ये विविध धर्माच्या आणि जातींच्या लोकांचा यात समावेश असतो. सलोखा राखणे आणि अफवांना आळा घालणे हे याचे कार्य असते. ट्रॅफिक वॉर्डन आणि आरएसपी. : वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी सामान्य नागरिक 'ट्रॅफिक वॉर्डन' म्हणून तर शाळकरी मुले रोड सेफ्टी पॅट्रोल अंतर्गत वाहतूक व्यवस्थापनात पोलिसांना सहकार्य करतात.

जनतेने पोलिसांना सहकार्य का करावे? गुन्ह्यांचा जलद तपासः पोलिसांना आजूबाजूला घडणाऱ्या संशयास्पद घटनांची किंवा गुन्ह्यांची माहिती त्वरित दिल्यास गुन्हेगारांना पकडणे सोपे होते.

सायबर गुन्हेगारीवर नियंत्रणः आजकाल वाढणाऱ्या ऑनलाईन फसवणुकीच्या घटनांमध्ये सतर्क राहून पोलिसांकडे तक्रार केल्यास इतरांची फसवणूक टाळता येते.

सण व उत्सवांमध्ये शांतताः गणेशोत्सव, दिवाळी, किंवा निवडणुकांदरम्यान स्थानिक मंडळांनी आणि नागरिकांनी नियमांचे पालन केल्यास कायदा व सुव्यवस्था राखणे सोपे जाते.

पोलिसांकडून नागरिकांना मिळणारे सहकार्यः नागरिकांचा पोलिसांवर विश्वास वाढावा म्हणून पोलीस दलातर्फेही अनेक पावले उचलली जातातः दिलासा आणि समुपदेशनः कौटुंबिक वाद, पळून गेलेली मुले किंवा निराधार महिलांना आधार देण्यासाठी पोलीस विविध स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने समुपदेशन करतात. आपत्ती व्यवस्थापनः पूर, भूकंप किंवा कोरोनासारख्या महामारीच्या काळात पोलीस स्वतःचा जीव धोक्यात घालून नागरिकांना अन्न, औषधे आणि मदत पोहोचवण्याचे कार्य करतात.

सेवा उपक्रमः पोलीस ठाण्यात येणाऱ्या तक्रारदारांची ऑनलाईन नोंदणी करून, त्यांच्या तक्रारीचे निवारण झाले की नाही याचा फीडबॅक घेतला जातो.

पोलीस-जनता सुसंवादः नागरिकांनी पोलिसांकडे 'मित्र' म्हणून पहावे आणि मनात कोणतीही भीती न ठेवता माहिती द्यावी. कोणत्याही अफवेवर विश्वास न ठेवता थेट पोलिसांशी संपर्क साधावा. आणीबाणीच्या प्रसंगी डायल १०० किंवा ११२ या हेल्पलाइन क्रमांकाचा वापर करावा. विविध समाज माध्यमांवरुन सविनय साभार जी!

- ९६९९८३६७१७

# भारतीय महिलांचा पाकिस्तानवरील विजय श्रीचरणी अर्पण!

डॉ.दत्ता विघावे क्रिकेट समिक्षक

जपानमध्ये सुरू असलेल्या आशियाई क्रिडा स्पर्धेच्या आपल्या दुसऱ्या सामन्यात भारतीय महिलांनी पारंपारिक प्रतिस्पर्धी पाकिस्तानचा लिलया धुव्वा उडवत उपांत्य प्रवेश केला. भारताचा हा सलग दुसरा विजय असून पाकवर वर्चस्वाची आपली परंपरा कायम राखली. महिला आशिया कप टी-२० च्या 'अ' गटातील सामन्यात, डावखुरी फिरकी गोलंदाज श्री चरणी आणि लेग-स्पिनर प्रेमा रावत यांच्या भेदक गोलंदाजीपुढे पाकिस्तानचे फलंदाज गारद झाले, ज्यामुळे भारताने त्यांचा डाव १८.१ षटकांत केवळ ५५ धावांवर गुंडाळला. चरानीने चार षटकांत केवळ सात धावा देऊन तीन बळी घेतले, तर प्रेमाने चार षटकांत नऊ धावा देऊन तीन बळी घेतले.

दीप्ती शर्माने ३.१ षटकांत पाच धावा देऊन दोन बळी घेतले, तर शेफाली वर्माने एक बळी घेतला. टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील पाकिस्तान महिला संघाची ही सर्वात कमी धावसंख्या आहे. त्यांची यापूर्वीची सर्वात कमी धावसंख्या २०२४ मध्ये न्यूझीलंडविरुद्ध ५६ होती. आपल्या २०० व्या टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात, पाकिस्तानने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. संघाने चांगली सुरुवात केली आणि पहिल्या चार षटकांत एकही गडी न गमावता २७ धावा केल्या. दोन जीवदान मिळूनही, मुनीबा अली केवळ १३ धावाच करू शकली, तर शवाल झुल्फिकारने १४ धावांचे योगदान दिले. यानंतर पाकिस्तानची फलंदाजी पूर्णपणे कोसळली आणि इतर कोणताही फलंदाज दुहेरी आकडाही गाठू शकला नाही.

आपला १५० वा टी२० आंतरराष्ट्रीय सामना खेळणाऱ्या कर्णधार हरमनप्रीत कौरने खेळपट्टीची फिरकी गोलंदाजांसाठी असलेली क्षमता ओळखली आणि पाचव्या षटकापासूनच फिरकीचे जाळे विणले. तिची ही रणनीती पूर्णपणे यशस्वी ठरली. पाचव्या ते दहाव्या षटकादरम्यान पाकिस्तानने सहा गडी गमावून केवळ नऊ धावा जोडल्या. १० षटकांनंतर, त्यांचा संघ ३६ धावांवर सहा गडी गमावून अडचणीत होता. भारतीय गोलंदाजांनी उत्कृष्ट शिस्त दाखवत १८.१ षटकांत एकूण ७८ निर्धाव चेंडू टाकले. सलामीवीर मुनीबाला धावा काढण्यासाठी संघर्ष करावा लागला.



शेफालीच्या एका चेंडूसाठी जागा करण्यासाठी ती लेग स्टंपच्या दिशेने सरकली, पण चेंडू तिच्याकडून पूर्णपणे चुकला आणि ती त्रिफळाचीत झाली. यानंतर पाकिस्तानचा डाव असा सुरू झाला, जणू फलंदाज 'तू जा, मी येतो' अशा थाटात क्रीजवर येत होते. त्यानंतर, श्री चरणीने खेळपट्टीच्या वळणाचा आणि उसळीचा पुरेपूर फायदा घेतला. गुल फिरोजा शून्यावर बाद झाली. तिने चेंडूच्या वळणाविरुद्ध मोठा फटका खेळण्याचा प्रयत्न केला, पण ती शॉर्ट थर्डवर झेलबाद झाली. झुल्फिकारचा स्वीप फसला आणि तो पायचीत झाला. आयेशा जफरला फक्त दोन धावा करता आल्या. दबावातून सुटण्याच्या प्रयत्नात, तिने मिड-ऑनवर हरमनप्रीत कौरला सोपा झेल दिला. सदफ शमासने तीन धावा केल्या, पण प्रेमाच्या यष्टींवर टाकलेल्या सरळ चेंडूचा सामना ती करू शकली नाही.

पाकिस्तानची सर्वात मोठी आशा, कर्णधार फातिमा सना, सुद्धा धावा करण्यात अपयशी ठरली. दीप्ती शर्माच्या अप्रतिम ऑफ-स्पिन चेंडूने तिच्या पॅडला स्पर्श केला आणि पंचांनी तिला पायचीत घोषित केले. चेंडू लेग-मिडल स्टंपला लागल्याचे दिसत होते, पण फातिमाने रिव्ह्यू घेण्याचा विचारही केला नाही. आयमान फातिमा (५) आणि उम्म-ए-हानी (६) यांच्यातील समन्वयाच्या अभावामुळे पाकिस्तानला आणखी एक धक्का बसला. गैरसमजामुळे फातिमा नॉन-स्ट्रायकरच्या टोकाला धावबाद झाली. त्यानंतर एक खराब स्वीप शॉट मारण्याच्या प्रयत्नात उम्म-ए-हानी बाद झाली.

२०२६ च्या महिला आशिया कपच्या ९ व्या सामन्यात, शेफाली वर्माने ६ चेंडूंमध्ये १२ धावा केल्या, पण या छोट्याशा खेळीत तिने इतिहास रचला. ५६ धावांचे माफक लक्ष्य गाठताना, शफालीने सादिया इक्बालच्या पहिल्याच चेंडूवर षटकार मारला. पुढच्याच चेंडूवर तिने एक धाव घेतली आणि इतिहास रचला; महिला टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वात कमी चेंडू खेळून ३,००० धावा पूर्ण करणारी ती पहिली क्रिकेटपटू ठरली. याशिवाय, हा टप्पा गाठणारी ती सर्वात तरुण क्रिकेटपटूही ठरली.

शेफाली वर्मा महिला टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये ३,००० धावा करणारी १६ वी खेळाडू ठरली. स्मृती मंधाना आणि हरमनप्रीत कौर यांच्यानंतर हा टप्पा गाठणारी ती तिसरी भारतीय खेळाडू आहे. तिने केवळ २,१८२ चेंडू खेळून हा पराक्रम केला. शफालीने वयाच्या २२ वर्षे आणि २२० दिवसांत हा टप्पा गाठला आणि आयर्लंडच्या गॅबी लुईसचा विक्रम मोडला, जिने वयाच्या २४ वर्षे आणि ३४७ दिवसांत हा टप्पा गाठला होता. युएईच्या ईशा ओझाने वयाच्या २७ वर्षे आणि १३९ दिवसांत ही कामगिरी केली होती, तर स्मृती मंधानाने वयाच्या २७ वर्षे आणि १७१ दिवसांत ३,००० धावा पूर्ण केल्या होत्या.

### भारताचा ७ गडी राखून विजय

पाकिस्तानविरुद्धच्या सामन्यात शेफालीने ६ चेंडूंमध्ये एक चौकार आणि एक षटकार मारत १२ धावा केल्या. पाकिस्तानची कर्णधार फातिमा सनाने स्वतःच्याच गोलंदाजीवर परतीचा झेल घेत तिला बाद केले. भारताने ५६ धावांचे लक्ष्य ८.४ षटकांत ३ गडी गमावून पूर्ण केले. शफाली व्यतिरिक्त स्मृती मंधाना (९ धावा) आणि प्रतिका रावल (४ धावा) बाद झाल्या. हरमनप्रीत कौर (१८*) आणि दीप्ती शर्मा (१२*) नाबाद राहिल्या.

भारतीय कर्णधार हरमनप्रीत कौरने शनिवारी (५ सप्टेंबर) महिला आशिया कप २०२६ मध्ये पाकिस्तानविरुद्धच्या सामन्यादरम्यान इतिहास रचला. कर्णधार म्हणून आपल्या १५० व्या टी२० आंतरराष्ट्रीय सामन्यात मैदानात उतरून, हा टप्पा गाठणारी ती पहिली पुरुष किंवा महिला क्रिकेटपटू ठरली आहे. १२१ सामन्यांमध्ये कर्णधारपद भूषवलेली श्रीलंकेची कर्णधार चमारी अथापथ्थू दुसऱ्या स्थानावर आहे. ऑस्ट्रेलियाच्या मेग लॅनिंगने १०० सामन्यांमध्ये कर्णधारपद भूषवले आहे. पुरुष क्रिकेटमध्ये, कोणत्याही खेळाडूने १०० सामन्यांमध्ये कर्णधारपद भूषवलेले नाही; नामिबियाच्या गेर्हार्ड इरास्मसने ९१ सामन्यांमध्ये कर्णधारपद भूषवले आहे. आयसीसीच्या पूर्ण सदस्य राष्ट्रांमध्ये, पाकिस्तानच्या बाबर आझमने ८५ सामन्यांमध्ये आणि ऑस्ट्रेलियाच्या ॲरॉन फिंचने ७६ सामन्यांमध्ये कर्णधारपद भूषवले आहे. भारतासाठी, एम.एस. धोनीने ७२ सामन्यांमध्ये कर्णधारपद भूषवले आहे. या लाजिरवाण्या पराभवानंतरही पाकिस्तानसाठी उपांत्य फेरीचे दरवाजे खुले आहे. पाकिस्तान मध्ये या पराभवानंतर मोठा असंतोष पसरला आहे.

- ९०९६३७२०८२

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

# चंद्रपुरात 'सन्मान कर्तृत्वाचा' सोहळा उत्साहात

## माजी आमदार व्ही. यू. डायगव्हाणे, प्राचार्य डॉ. बबनराव तायवाडे यांचा जीवनगौरव पुरस्काराने सपत्नीक सन्मान

**दै. सिंहवाणी वृत्त, चंद्रपूर**

शिक्षक दिनाचे औचित्य साधून विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ, गोविंदराव वंजारी फाउंडेशन तसेच गोविंद मैना फाउंडेशन, चंद्रपूर यांच्या वतीने 'सन्मान कर्तृत्वाचा - उत्कृष्ट शिक्षक सन्मान सोहळा २०२६' मोठ्या उत्साहात पार पडला. प्रियदर्शिनी इंदिरा गांधी सांस्कृतिक सभागृह, चंद्रपूर येथे रविवारी सकाळी ११ वाजता झालेल्या या सोहळ्यात शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या चंद्रपूर, वर्धा आणि गडचिरोली जिल्ह्यातील शिक्षक, प्राध्यापक, मुख्याध्यापक, प्राचार्य, संस्था चालक आणि शिक्षण क्षेत्रातील मान्यवरांचा गौरव करण्यात आला.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विमाशि संघाचे सरकार्यवाह तथा आमदार सुधाकर अडबाले होते. आमदार ॲड. अभिजित वंजारी यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे अध्यक्ष अरविंद देशमुख यांच्यासह आजचे सत्कारमूर्ती, शिक्षण क्षेत्रात आपले संपूर्ण आयुष्य कार्यासाठी समर्पित करणारे माजी शिक्षक आमदार व्ही. यू. डायगव्हाणे सर, राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे अध्यक्ष तथा प्राचार्य डॉ. बबनराव तायवाडे, प्राचार्य डॉ. शरयू तायवाडे, पुष्पाताई डायगव्हाणे, विमाशी संघाचे अधिकृत उमेदवार दिलीप कडू, गोविंद मैना फाउंडेशनच्या अध्यक्ष सीमा अडबाले, गोविंदराव वंजारी फाउंडेशनच्या कोषाध्यक्ष स्मीता वंजारी, शिवाजी ढुमणे तसेच तिन्ही जिल्ह्यांतील विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे पदाधिकारी, प्राध्यापक, प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या सोहळ्यात माजी आमदार व्ही. यू. डायगव्हाणे, प्राचार्य डॉ. बबनराव तायवाडे यांना जीवनगौरव पुरस्काराने सपत्नीक सन्मानित करण्यात आले. यानंतर चंद्रपूर, गडचिरोली आणि वर्धा जिल्ह्यातील उत्कृष्ट शिक्षक, प्राध्यापक, मुख्याध्यापक, प्राचार्य, संस्था चालक अशा एकूण १०० सत्कारमूर्तींना मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. शिक्षकांच्या कर्तृत्वाला समाजासमोर अधोरेखित करणारा हा सोहळा शिक्षण क्षेत्रातील विविध मान्यवरांच्या उपस्थितीमुळे विशेष ठरला.

प्रास्ताविक अरविंद देशमुख यांनी, कार्यक्रमाचे संचालन सुनील शेरकी, प्रज्ञा बारेकर, रूपाली मुंगल यांनी, पुरस्कार प्राप्त शिक्षकांच्या नावांची यादी वाचन गडचिरोली जिल्ह्यासाठी अजय लोंढे, वर्धा जिल्ह्यासाठी सूहास गवते आणि चंद्रपूर जिल्ह्यासाठी हरीहर खरवडे यांनी, तर आभारप्रदर्शन दीपक धोपटे यांनी केले.

**कर्तृत्वाची समाजाने घेतलेली दखल : आमदार सुधाकर अडबाले**

आज आपण 'आदर्श शिक्षक नव्हे', तर 'उत्कृष्ट शिक्षक' या संकल्पनेचा सन्मान करत आहोत. शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्या शिक्षक, प्राध्यापक, प्राचार्य, मुख्याध्यापक आणि संस्थाचालक अशा सर्व घटकांचा आपण या ठिकाणी सन्मान केला आहे. हा पुरस्कार देण्यासाठी आम्ही कोणतीही निवड समिती स्थापन केलेली नाही. कोणाकडून प्रस्ताव मागवले नाहीत. बायोडाटा मागवला नाही. दहा प्रस्तावांमधून एकाची निवड करण्याची पद्धतही आम्ही स्वीकारलेली नाही. कारण प्रस्ताव मागवून केलेल्या निवडीमध्ये कोणीतरी निवडले जाते आणि कोणीतरी नाराज होते. आम्ही कोणाचेही प्रस्ताव मागवलेले नाहीत. आमच्या पदाधिकाऱ्यांनी शिक्षण क्षेत्रात आपण केलेल्या कामाचे मूल्यमापन केले आणि त्यातून उत्कृष्ट काम करणाऱ्या व्यक्तींची निवड केली. म्हणूनच आजच्या या सन्मानाबद्दल कोणालाही नाराज होण्याचे कारण नाही.

हा पुरस्कार म्हणजे केवळ एक सन्मानपत्र किंवा पुरस्कार नाही; हा आपल्या कर्तृत्वाची समाजाने घेतलेली दखल आहे. कारण शिक्षकांच्या प्रश्नांसाठी, शिक्षण क्षेत्राच्या भविष्यासाठी आणि मराठी माध्यमाच्या शाळांच्या अस्तित्वासाठी आपला आवाज सभागृहात बुलंद असणे आवश्यक आहे. शिक्षकांच्या आणि शिक्षण क्षेत्राच्या प्रश्नांसाठी सभागृहात ठामपणे उभे राहणारा असा आमदार आपल्याला आवश्यक आहे, असे आव्हान देखील आमदार सुधाकर अडबाले यांनी केले.

**शिक्षक हा समाज घडविणारा महत्त्वाचा घटक : ॲड. अभिजित वंजारी**

कार्यक्रमाचे उद्घाटन करताना नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघाचे आमदार ॲड. अभिजित वंजारी म्हणाले की, विदर्भामध्ये शिक्षण क्षेत्रात किंवा विविध संघटनांच्या माध्यमातून सातत्याने काम करणाऱ्या पदाधिकाऱ्यांच्या माध्यमातून योग्य शिक्षकांची शिफारस झाली पाहिजे आणि संबंधित शिक्षकाच्या कर्तृत्वाची खात्री झाल्यानंतरच त्याचा सन्मान झाला पाहिजे. ही भूमिका संपूर्ण कार्यक्रमाच्या आयोजनामागे होती आणि म्हणूनच हा कार्यक्रम वेगळा व विशेष ठरतो, असे त्यांनी सांगितले. कोरोना काळात शिक्षकाचे महत्त्व संपूर्ण समाजाने अनुभवले. कोरोनाच्या कठीण परिस्थितीत डॉक्टरांनी केलेले कार्य आपण सर्वांनी पाहिले. त्या काळात डॉक्टर देवदूतापेक्षा कमी नव्हते. मात्र, त्याचप्रमाणे संपूर्ण समाज घडविण्याचे काम करणारा शिक्षकही तितकाच महत्त्वाचा आहे, असे वंजारी म्हणाले. ज्या पद्धतीने कुंभार मातीला आकार देऊन त्यातून सुंदर वस्तू तयार करतो, त्याच पद्धतीने शिक्षक विद्यार्थ्यांच्या कोऱ्या पाटीवर ज्ञान, संस्कार आणि मूल्यांचे संस्कार करून त्यांना घडवत असतो. त्यामुळे शिक्षकांचा सन्मान हा केवळ एका व्यक्तीचा सन्मान नसून समाज घडविणाऱ्या कर्तृत्वाचा सन्मान आहे, असे त्यांनी नमूद केले.

**'पुरस्कार मिळवणे नव्हे, कर्तृत्व टिकवणे महत्त्वाचे' : व्ही. यू. डायगव्हाणे**

सत्काराला उत्तर देताना माजी शिक्षक आमदार व्ही. यू. डायगव्हाणे म्हणाले, आपण आज उत्कृष्ट शिक्षक म्हणून प्रमाणपत्र मिळवले आहे. पण हे प्रमाणपत्र मिळवणे जितके महत्त्वाचे आहे, त्यापेक्षा ते टिकवणे अधिक महत्त्वाचे आहे. पुरस्कार मिळवणे एकदा शक्य असते; मात्र, आयुष्यभर त्या पुरस्काराला साजेसे कर्तृत्व टिकवणे ही खरी कसोटी असल्याचे त्यांनी सांगितले. आजपासून ज्यांना हा पुरस्कार मिळणार आहे, ज्यांना उत्कृष्ट शिक्षक म्हणून गौरवले जाणार आहे, त्यांनी स्वतःला नेहमी उत्कृष्ट ठेवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आजच्या दिवसापुरता मी उत्कृष्ट शिक्षक आहे आणि उद्यापासून पुन्हा पूर्वीसारखाच, असे होता कामा नये, असे आवाहन त्यांनी केले.

**पुरोगामी विचारातून शिक्षणाचा विस्तार : डॉ. बबनराव तायवाडे**

सत्काराला उत्तर देताना प्राचार्य डॉ. बबनराव तायवाडे म्हणाले की, पुरोगामी विचारातून गावखेड्यातील गोरगरीब मुलगा असो किंवा मुलगी, तळागाळातील विद्यार्थी-विद्यार्थिनी असोत, त्यांना शिक्षणाच्या सुविधा कशा उपलब्ध करून देता येतील आणि त्यांचे जीवनमान कसे उंचावता येईल, हा एकमेव धागा हृदयात आणि डोळ्यासमोर ठेवून आयुष्यभर काम केले.

थोडक्यात

## आजनी जिल्हा परिषद शाळेत दहीहंडी उत्सव



**दै. सिंहवाणी वृत्त, कामठी**

कामठी तालुक्यातील आजनी येथील जिल्हा परिषद शाळेत युगंधर भगवान श्रीकृष्ण जन्माष्टमीचे औचित्य साधून कृष्ण जन्माष्टमीचा सोहळा आयोजित करण्यात आला होता. यात हर्षल जेवडे, दक्ष भोने, मोहित वाट, विराज पारधी, पीयुष शिंदेमेश्राम, रितिका फुले, टीना लायबर, चंचल ओझा, लावण्या पारधी व इतर विद्यार्थ्यांनी राधा कृष्णाची वेशभूषा करून संगीताच्या तालावर दहीहंडी फोडली.

यानंतर विद्यार्थ्यांना प्रसाद वाटप करण्यात आला. या उत्सवाचे सफल आयोजन करण्याकरिता शाळेच्या मुख्याध्यापिका ललिता आंडे, शिक्षक जितेंद्र सिंग बुंदेले, शीला जैन, सीमा मेश्राम, नलिनी धकाते, करूणा ढोक, शांताबाई ढोक आदींनी विशेष प्रयत्न केले. गेल्या काही वर्षांपासून शाळेत विविध उत्सव साजरे करण्यात येत असल्याने विद्यार्थ्यांना शाळेची गोडी लागली आहे. या सोहळ्यात सरपंच हेमराज भाऊ दवंडे, पालक पुरुषोत्तम फुले,निमचंद जेवडे, विनोद भोने, राधेशाम घोडे यांच्यासह अंगणवाडी सेविका हर्षा हेटे, अर्चना सहारे, स्नेहा घोडे गावकरी सुधाकर विघे, गोपीचंद जेवडे, नामदेव दवंडे, गजेंद्र वाट सहभागी झाले होते.

## मराठा सेवा संघाचा वर्धापन दिन साजरा



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

मराठा सेवा संघाचा वर्धापन दिन तसेच मान्यवरांचा सत्कार सोहळा उत्साहात पार पडला. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉक्टर शरद निंबाळकर, संपादक देवेंद्र गावंडे तर अध्यक्ष म्हणून जिजाऊ सृष्टी सिंदखेड राजा प्रकल्पाचे अध्यक्ष मधुकर मेहकरे उपस्थित होते. यावेळी वर्धापन दिनानिमित्त अमरावती येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे प्रमुख डॉक्टर नंदकिशोर राऊत, डॉक्टर सदानंद चौधरी, मंदाकिनी काकडे, किशोर सोलव यांचा त्यांच्या उत्कृष्ट कार्याबद्दल सत्कार करण्यात आला. यावेळी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते रमेश बोरकुटे, सुनिता जिचकार, नितीन रोंगे,नरेंद्र इंगळे, दिलीप खोडके, श्याम डहाके, प्रमोद वैद्य, अंशुल जिचकार उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पंकज निंबाळकर तर आभार प्रदर्शन अभय वैद्य यांनी केले.

## कृष्ण मंदिर वार्डात गोपाळकाला आणि दहीहंडी उत्सव उत्साहात संपन्न

**दै. सिंहवाणी वृत्त, भंडारा**

ह. भ. प. नरेश सूर्यभान पवनकर महाराज यांच्या उपस्थितीत नितेश लाहोटी आणि पुंडलिक लिमजे यांनी फोडली मानाची दहीहंडीभंडारा, ६ सप्टेंबर २०२६:येथील ऐतिहासिक श्री कृष्ण मंदिरात दरवर्षीप्रमाणे यंदाही श्रीकृष्ण जन्मोत्सव, गोपाळकाला आणि दहीहंडी सोहळा अत्यंत भक्तीमय वातावरणात आणि उत्साहात साजरा करण्यात आला.



यावेळी शेकडो भाविकांनी दर्शनासाठी आणि दहीहंडी पाहण्यासाठी मंदिरात मोठी गर्दी केली होती. गोकुळाष्टमी निमित्त मंदिरात आकर्षक फुलांची सजावट आणि विद्युत रोषणाई करण्यात आली होती. सकाळी श्रीकृष्णाची विशेष पूजा, अभिषेक आणि महाआरती संपन्न झाली. त्यानंतर दुपारी मंदिरात भजनाचा कार्यक्रम पार पडला. सायंकाळी सर्व भाविकांच्या उपस्थितीत 'गोपाळकाला' उत्सव साजरा करण्यात आला, ज्यामध्ये उपस्थितांना लाह्या, पोहे आणि दह्याचा प्रसाद (काला) वाटण्यात आला.या सोहळ्यात प्रसिद्ध कीर्तनकार ह. भ. प. नरेश सूर्यभान पवनकर महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत, शहराचे प्रख्यात चार्टर्ड अकाउंटंट नितेश लाहोटी तसेच युको बँक भंडाराचे सेवानिवृत्त अधिकारी पुंडलिक लिमजे यांनी मिळून अत्यंत उत्साहात मानाची दहीहंडी फोडली.

दहीहंडी फुटताच उपस्थित भाविकांनी विठ्ठल-रखुमाई आणि श्रीकृष्णाच्या जयघोषात एकच जल्लोष केला. याप्रसंगी प्रभागातील नगरसेवक श्री हरिश्चंद्र मडावी तसेच निमेष डोकरीमारे यांची प्रमुख उपस्थिती होती. या महोत्सवाचे यशस्वी आयोजन श्रीकृष्ण देवस्थान पंच कमिटी भंडारा, कृष्ण मंदिर वार्ड आणि स्थानिक कार्यकर्त्यांनी केले होते. सर्व भाविकांसाठी गोपाळकाला प्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. उत्सव शांततेत आणि उत्साहात पार पडल्याबद्दल श्रीकृष्ण देवस्थान पंचकमिटीतर्फे सर्व उपस्थित भाविकांचे आणि सहकार्य करणाऱ्यांचे आभार मानण्यात आले.

## शिक्षक दिनासोबत गोपालकाल्याचा उत्साह, खैरगाव शाळेत विद्यार्थ्यांनी रंगवला दुहेरी सोहळा

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

नरखेड तालुक्यातील पीएम श्री जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा खैरगाव येथे ५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिन आणि गोकुळाष्टमी गोपालकाला उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. शिक्षणातील संस्कार आणि भारतीय संस्कृतीची परंपरा यांचा सुंदर संगम घडवून आणणाऱ्या या कार्यक्रमामुळे शाळेच्या परिसरात दिवसभर आनंदाचे वातावरण होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक पराग धर्मे होते. प्रारंभी भारताचे माजी राष्ट्रपती, थोर शिक्षणतज्ज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. शिक्षक दिनाचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावे आणि शिक्षकांच्या कायार्ची जाणीव व्हावी, या उद्देशाने विद्यार्थ्यांनीच शिक्षकांची भूमिका स्वीकारत वर्ग घेतले. विद्यार्थ्यांनी अध्यापन करताना शिक्षकांची जबाबदारी आणि आव्हाने अनुभवली.





यावेळी विद्यार्थ्यांनी आपल्या आवडत्या शिक्षकांविषयी कृतज्ञता व्यक्त करणारी भाषणे, गीते आणि विविध उपक्रम सादर केले. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली. मुख्याध्यापक पराग धर्मे यांनी अध्यक्षीय भाषणातून शिक्षक दिनाचे महत्त्व स्पष्ट केले. शिक्षक हे विद्यार्थ्यांच्या जीवनाला योग्य दिशा देणारे मार्गदर्शक असून, विद्यार्थ्यांनी ज्ञानासोबतच शिस्त, संस्कार, प्रामाणिकपणा आणि सामाजिक बांधिलकी जोपासावी, असे आवाहन त्यांनी केले.

तसेच विद्यार्थ्यांना भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यानंतर गोकुळाष्टमी निमित्त गोपालकाल्याचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. विद्यार्थ्यांनी बाल गोपाळ, श्रीकृष्ण आणि गवळणींच्या वेशभूषा करून उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. पारंपरिक गीतांच्या तालावर विद्यार्थ्यांनी फेर धरत आनंद व्यक्त केला. शाळेच्या प्रांगणात दहीहंडी बांधण्यात आली. 'गोविंदा रे गोपाळा'च्या जयघोषात विद्यार्थ्यांनी उत्साहाने दहीहंडी फोडली. यावेळी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद आणि उत्साह पाहून संपूर्ण शालेय परिसर जल्लोषाने दुमदुमून गेला. गोपालकाला हा केवळ धार्मिक उत्सव न राहता विद्यार्थ्यांमध्ये एकता, सहकार्य, संघभावना, नेतृत्वगुण आणि सांस्कृतिक जाणीव निर्माण करणारा उपक्रम ठरला. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व विद्यार्थ्यांना गोपालकाल्याचा प्रसाद वाटप करण्यात आला.

शिक्षक दिन आणि गोपालकाला अशा दोन्ही कार्यक्रमांचे एकत्रित आयोजन करून विद्यार्थ्यांना शिक्षणासोबत संस्कृती, परंपरा आणि सामाजिक मूल्यांची ओळख करून देण्यात आली. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळेकडून राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांचे पालक व ग्रामस्थांकडून कौतुक करण्यात आले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कुर्वे मॅडम, शेंडे मॅडम, सावंत मॅडम, चव्हाण मॅडम, मोरे सर, ठोंबरे मॅडम, खराळकर मॅडम, पाटील मॅडम, ढोबळे मॅडम, मुसळे ताई, खोरगे ताई, प्रविण रामटेके, राजेंद्र ठोंबरे यांच्यासह शाळेतील शिक्षक व कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे शिक्षक दिन आणि गोपालकाला उत्सव संस्मरणीय ठरला.

## अंत्योदय महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा!

### प्राचार्य डॉ. देवेंद्र भोंगाडे व डॉ. मंगेश आचार्य यांना डॉ. जे. पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार



**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**



ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देत शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या अंत्योदय महाविद्यालय, देवग्रामच्या शैक्षणिक वाटचालीत आणखी एक मानाचा अध्याय जोडला गेला आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. देवेंद्र श्रीकृष्णराव भोंगाडे आणि राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. मंगेश गोविंदराव आचार्य यांना महाराष्ट्र शासनाचा प्रतिष्ठेचा 'डॉ. जे. पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार' प्राप्त झाला आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातून प्राचार्य संवर्गात डॉ. भोंगाडे, तर शिक्षक संवर्गात डॉ. आचार्य यांची पुरस्कारासाठी निवड झाली. एकाच महाविद्यालयातील प्राचार्य आणि शिक्षक या दोन्ही संवर्गांना एकाच वर्षी राज्यस्तरीय पुरस्कार मिळणे ही अंत्योदय महाविद्यालयासाठी अभिमानाची बाब ठरली आहे. प्राचार्य डॉ. भोंगाडे यांनी ग्रामीण भागातील महाविद्यालयाला गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे सक्षम केंद्र बनविण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले. त्यांच्या नेतृत्वाखाली महाविद्यालयाला स्वायत्त दर्जा प्राप्त झाला असून, महाराष्ट्रातील स्वायत्त दर्जा मिळविणारे पहिले महाविद्यालय असल्याचा मान मिळाल्याचे नमूद करण्यात आले आहे.

दरम्यान, डॉ. मंगेश आचार्य यांनी अध्यापनासोबतच विद्यार्थी मार्गदर्शन, संशोधन, लेखन आणि युवा सक्षमीकरणाच्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले आहे. विविध सामाजिक, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय विषयांवर सातत्याने लेखन करत त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये चिकित्सक विचार आणि सामाजिक भान निर्माण करण्यासाठी योगदान दिले आहे. ५ सप्टेंबर रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील संत ज्ञानेश्वर सभागृहात आयोजित समारंभात उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला. शिक्षण क्षेत्रातील विविध मान्यवर यावेळी उपस्थित होते. या दुहेरी यशाबद्दल संस्थेचे संस्थापक डॉ. भाऊसाहेब भोगे, अध्यक्ष, सचिव, सर्व पदाधिकारी, प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी व महाविद्यालय परिवाराने डॉ. भोंगाडे आणि डॉ. आचार्य यांचे अभिनंदन केले. या दुहेरी सन्मानामुळे देवग्रामसह संपूर्ण नरखेड परिसरात अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## भारतीय परंपरेनुसार इनरव्हील डिस्ट्रिक्ट ३०३ च्या डिस्ट्रिक्ट चेअरमनचे स्वागत श्रावणातील पारंपरिक पद्धतीने औक्षण व ओटी भरून सन्मान

### ओसीव्हीमध्ये पदाधिकाऱ्यांच्या कार्याचा घेतला आढावा

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

इनरव्हील क्लब ऑफ नागपूर ऑरेंज सिटीच्यावतीने ईनर व्हिल डिस्ट्रिक्ट ३०३ च्या चेअरमन यांच्या अधिकृत भेटीचे आयोजन उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले. भारतीय संस्कृती आणि परंपरेचे जतन करण्याचा संदेश देत श्रावण महिन्याच्या पार्श्वभूमीवर ड्रिस्टीक चे चेअरमन मनीषा चौधरी यांचे अनोख्या पारंपरिक पद्धतीने स्वागत करण्यात आले. श्रावण महिन्याचे औचित्य साधून आकर्षक पद्धतीने सजविण्यात आलेल्या पाळण्यात चेअरमन यांना बसवून त्यांचे औक्षण करण्यात आले. तसेच पारंपरिक पद्धतीने ओटी भरून त्यांचा सन्मान करण्यात आला. या आगळ्या आणि संस्कृतीशी जोडलेल्या स्वागतामुळे कार्यक्रमाला विशेष आकर्षण प्राप्त झाले.

क्लबच्या सदस्यांनी उत्साहाने सहभाग घेत भारतीय संस्कृतीतील परंपरांचे सुंदर दर्शन घडविले. डउश च्या निमित्ताने आयोजित बैठकीची सुरुवात डिस्ट्रिक्ट चेअरमन मनीषा चौधरी यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आली. दीपप्रज्वलनानंतर क्लबच्या विविध उपक्रमांचा, सामाजिक कायार्चा तसेच वर्षभराच्या नियोजनाचा आढावा घेण्यात आला. क्लबच्या प्रत्येक पदाधिकाऱ्याने आपापल्या जबाबदाऱ्या आणि कार्याची माहिती सादर केली. पदाधिकाऱ्यांनी केलेल्या कायार्चा आढावा घेतल्यानंतर मनीषा चौधरी यांनी क्लबच्या कामकाजा बद्दल समाधान व्यक्त केले. सामाजिक बांधिलकी जपत क्लबच्या माध्यमातून विविध



उपक्रम राबविले जात असल्याचे पाहून त्यांनी पदाधिकारी व सदस्यांचे कौतुक केले. भविष्यातही समाजोपयोगी उपक्रम अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी त्यांनी मार्गदर्शन केले.

या अधिकृत भेटी दरम्यान क्लबच्या विविध विभागांच्या कामकाजाची माहिती घेण्यात आली. सदस्यांचा सहभाग, उपक्रमांचे नियोजन, सामाजिक कार्य आणि क्लबच्या पुढील वाटचालीबाबतही चर्चा करण्यात आली. ओसीव्हीच्या माध्यमातून क्लबच्या कार्याला अधिक दिशा मिळण्यास मदत झाली. यावेळी डिस्ट्रिक्ट आय एस ओ स्वाती वानकर यांचीही विशेष उपस्थिती होती. तसेच क्लबच्या पास्ट प्रेसिडेंट, विविध पदाधिकारी आणि सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पारंपरिक स्वागत, दीपप्रज्वलन, कायार्चा आढावा आणि मार्गदर्शन अशा विविध उपक्रमांनी ओसीव्ही कार्यक्रम उत्साहात आणि आनंददायी वातावरणात संपन्न झाला. इनरव्हील क्लब ऑफ नागपूर ऑरेंज सिटीच्या या उपक्रमातून आधुनिक सामाजिक कार्यासोबत भारतीय संस्कृती व परंपरांचे जतन करण्याचा सुंदर संदेश देण्यात आला.

थोडक्यात

## माजी गृहमंत्र्यांचा मोवाडच्या विकासाला विरोध का?

### २५ वर्षांत जे झाले नाही, ते आमदार चरणसिंग ठाकूर १५ महिन्यांत करून दाखवत आहेत, नगराध्यक्ष दर्शना ढोरे यांचे अनिल देशमुखांना प्रतिउत्तर

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी मोवाड नगरपरिषद क्षेत्रातील विकासकामांबाबत उपस्थित केलेल्या प्रश्नांना नगराध्यक्ष दर्शना ढोरे



यांनी जोरदार प्रतिउत्तर दिले आहे. मोवाडच्या विकासकामांवर आक्षेप घेण्यापूर्वी प्रत्यक्ष मोवाडमध्ये येऊन कामांची पाहणी करावी आणि वस्तुस्थिती जाणून घ्यावी, असे आवाहन त्यांनी केले. २५ वर्षे सत्ता आणि लोकप्रतिनिधित्व असताना मोवाडचा मूलभूत विकास का झाला नाही? आज आमदार चरणसिंग ठाकूर यांच्या माध्यमातून अवघ्या १५ महिन्यांत विकासकामांना गती मिळत असताना त्याला विरोध का? असा थेट सवाल नगराध्यक्ष दर्शना ढोरे यांनी केला. मोवाड नगरपरिषद क्षेत्रात नमो गार्डन, पाणीपुरवठा योजना, ई-अभ्यासिका, रस्ते व नाल्यांची कामे, व्यायामशाळा, शहर सौंदर्यीकरण, विविध सभागृहे तसेच इतर पायाभूत सुविधांची कामे सुरू आहेत. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेले प्रश्न मार्गी लावण्यासाठी आमदार चरणसिंग ठाकूर हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करीत असल्याचे ढोरे यांनी सांगितले.

१९९१ च्या महापुरानंतरही मोवाडमधील अनेक प्रश्न प्रलंबित राहिले. पिण्याचे पाणी, रस्ते, नाल्या, शैक्षणिक सुविधा यांसारखे मूलभूत प्रश्न इतकी वर्षे का सुटले नाहीत, असा सवालही त्यांनी उपस्थित केला. २५ वर्षांत जे झाले नाही, ते आता होताना दिसत आहे. त्यामुळे विकासकामांचे स्वागत करण्याऐवजी त्यांच्यावर प्रश्नचिन्ह का? असा सवाल त्यांनी केला. शेतकऱ्यांसाठी महत्त्वाच्या वर्धा नदीवरील बंधारा प्रकल्पासाठी प्रयत्न सुरू असून, प्रकल्प पूर्ण झाल्यास परिसरातील शेतकऱ्यांना मोठा फायदा होणार आहे. या प्रकल्पासाठीही सर्वांनी राजकारण बाजूला ठेवून सहकार्य करावे, असे आवाहन ढोरे यांनी केले. १९९१ च्या महापुरात बाधित झालेल्या मोवाडमधील मंदिरांना ब्यकब्ब वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा मिळावा, ही मागणीही अनेक वर्षांपासून प्रलंबित होती. आमदार चरणसिंग ठाकूर यांच्या पाठपुराव्यामुळे हा प्रश्न मार्गी लागल्याचे त्यांनी सांगितले.

विकासकामांत त्रुटी असतील तर त्या जरूर निदर्शनास आणून द्याव्यात; मात्र केवळ राजकीय विरोधासाठी विकासाला विरोध करणे मोवाडकरांना मान्य नाही. जनतेने विकासासाठी कौल दिला आहे, राजकारणासाठी नाही, असे दर्शना ढोरे यांनी स्पष्ट केले. मोवाडकरांची भूमिका स्पष्ट असून, विकासाला विरोध नको, विकासकामांची पाहणी करा, त्रुटी असतील तर सांगा आणि मोवाडच्या उज्ज्वल भविष्यासाठी सहकार्य करा, असे आवाहन नगराध्यक्ष दर्शना ढोरे यांनी केले.

## ज्येष्ठ नागरिक प्रतिष्ठानतर्फे विठ्ठलनगरच्या ३४ ज्येष्ठांना नि:शुल्क शेगाव दर्शन



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

अनेक दिवसांपासून प्रतीक्षेत असलेले शेगाव दर्शन अखेर विठ्ठलनगर येथील ज्येष्ठ नागरिकांचे साकार झाले. ज्येष्ठ नागरिक समिती, विठ्ठलनगर-१, नागपूर येथील ३४ ज्येष्ठ नागरिकांनी ज्येष्ठ नागरिक प्रतिष्ठान, नागपूर यांच्या वतीने उपलब्ध करून देण्यात आलेल्या निःशुल्क वाहनसेवेचा लाभ घेत शेगाव येथे जाऊन श्री संत गजानन महाराजांचे दर्शन घेतले. गुरुवार, ३ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ८.१० वाजता छत्रपती चौक, नागपूर येथून ज्येष्ठ नागरिकांचा समूह शेगावकडे रवाना झाला. दुपारी २.४५ वाजता सर्वजण शेगाव येथे पोहोचले. त्यानंतर सर्व ज्येष्ठ नागरिकांनी श्री संत गजानन महाराजांचे मनोभावे दर्शन घेतले. दर्शनानंतर ज्येष्ठ नागरिकांनी एकत्रितपणे वेळ घालवत भजन, गाणी आणि विविध आठवणींना उजाळा दिला. आनंदी वातावरणामुळे प्रवासाचा थकवा जाणवला नाही. दुसऱ्या दिवशी सकाळी ८.१० वाजता शेगाव येथून नागपूरकडे परतीचा प्रवास सुरू करण्यात आला. या प्रवासात ज्येष्ठ नागरिकांनी भजन व गाणी म्हणत आनंद लुटला. त्यामुळे नागपूर कधी आले हेच कळले नाही, अशी भावना ज्येष्ठांनी व्यक्त केली. परतीच्या प्रवासात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या मोझरी येथील समाधीस्थळालाही ज्येष्ठ नागरिकांनी भेट देऊन दर्शन घेतले. या संपूर्ण प्रवासात ज्येष्ठ नागरिकांच्या चेहऱ्यावर समाधान आणि आनंदाचे हास्य दिसून येत होते.

वाहनचालक अविनाश झंझोटे यांनी वाहन सुरळीत आणि सुरक्षितपणे चालवत सर्व ज्येष्ठ नागरिकांना सुखरूप नागपूर येथे पोहोचविले. त्यांच्या सुरक्षित व आरामदायी वाहनचालकाबद्दल ज्येष्ठ नागरिकांनी समाधान व्यक्त केले. हा शेगाव दर्शन प्रवास यशस्वी करण्यासाठी ज्येष्ठ नागरिक समितीचे अध्यक्ष प्रेमदास नंदनवार, उपाध्यक्ष केवलराम पटोले, सचिव प्रमोद झुरमुरे, सहसचिव विनायक सेलुकर, कोषाध्यक्ष शामराव गोमासे तसेच सदस्य नरेंद्र त्रिवेदी यांनी विशेष परिश्रम घेतले. या निःशुल्क शेगाव दर्शनाचा लाभ माधव भेंडारकर, पुष्पा काळे, केशव वाकोडीकर, मोरेश्वर सिंरसे, योगिराज ठाकूर, शालिग्राम मडावी, मारोतराव पावडे, मंगला कावळे, यशोदा पोंगडे, अरुण घोरमाडे, अरुण परचंड, लिलाधर क्षीरसागर, यशवंत उमरेडकर, छबू लोहकरे, आशा तवणे, भुजाडे ताई, राजकुमार देशकर, रेखा देशकर, विनायक आसटकर, राजू मेश्राम, मनोहर मडघे, नारायण माने, राम लांडे, अरुण आसरे, विठ्ठलराव कावळे यांच्यासह अन्य ज्येष्ठ नागरिकांनी घेतला. ज्येष्ठ नागरिकांना धार्मिक स्थळांचे दर्शन घडवून आणण्या बरोबरच त्यांना एकत्र येऊन आनंदाचे क्षण अनुभवता यावेत, या दृष्टीने ज्येष्ठ नागरिक प्रतिष्ठानतर्फे उपलब्ध करून देण्यात आलेली ही निःशुल्क सेवा ज्येष्ठांसाठी विशेष आनंददायी ठरली.

# भारताच्या युवा शक्तीला नीतिमूल्यांची जोड आवश्यक : आशिष शेलार

### आयआयएम नागपूरच्या मीडिया कॉन्क्लेव्हचा समारोप



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

'तरुणांचा देश' म्हणून भारत ओळखला जात असून आजचा युवा आपल्या देशाची खरी ताकद आहे. या युवकांनी उच्च बौद्धिक क्षमता आणि देशाच्या सांस्कृतिक समृद्धीला नीतीमूल्यांची जोड दिल्यास २०४७ पर्यंत विकसित भारत घडवण्यात युवकांची भूमिका महत्त्वाची ठरेल, असा विश्वास राज्याचे माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांनी आज येथे व्यक्त केला.

येथील भारतीय प्रबंध संस्थानमध्ये (आयआयएम) आयोजित दोन दिवसीय 'मीडिया कॉन्क्लेव्ह २०२६' चा समारोप आज झाला. त्यावेळी मंत्री शेलार बोलत होते. कॉन्क्लेव्हच्या विविध सत्रांमध्ये झालेल्या चर्चेतील विचारांचा आढावा घेत शेलार यांनी संपूर्ण आयोजनाचा आशयसंपन्न समारोप केला.

शेलार म्हणाले, संपूर्ण जग आज भारताकडे भविष्यातील ऊर्जा, प्रतिभा आणि विकासाचे केंद्र म्हणून पाहत आहे. युवकांनी कुठल्याही आमिषाला बळी न पडता सजग, चिकित्सक आणि नीतिमूल्यांशी बांधील राहणे आवश्यक आहे.

जगात सर्वोत्तम बनण्याची क्षमता भारतामध्ये आहे. मात्र, आपल्या सामर्थ्याला योग्य दिशा मिळाली पाहिजे. त्यासाठी संस्कृती, माध्यमे, तंत्रज्ञान आणि नेतृत्व या तत्त्वाचे आचरण करणे गरजेचे आहे.

मीडिया, लीडरशिप अँड द न्यू वर्ल्ड ऑर्डर हा कॉन्क्लेव्हचा विषय अत्यंत समर्पक आणि काळाची गरज असल्याचे नमूद करून त्यांनी युवा पिढीला जबाबदार संवादाची चार सूत्रे दिली. केवळ लोकांचे लक्ष वेधण्यासाठी नव्हे, तर परस्परांविषयी समज निर्माण करण्यासाठी संवाद साधा. कोणत्याही विषयावर बोलण्यापूर्वी तो नीट समजून घ्या. कोणतीही माहिती प्रसारित करण्यापूर्वी तिची सत्यता तपासा आणि तंत्रज्ञानाचा वापर करण्यापूर्वी त्यामागील मानवी उद्देशाचा विचार करा. असा संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.

माध्यमे, नेतृत्व आणि नवी जागतिक व्यवस्था या तिन्हींना जोडणारा समान धागा म्हणजे नीतिमूल्ये असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. तंत्रज्ञान कितीही प्रगत झाले तरी त्याचा केंद्रबिंदू मानवकल्याणाची जबाबदारी आणि सामाजिक हित हाच असला पाहिजे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी प्रवासी भारतीय सन्मान पुरस्कारप्राप्त उद्योजक आणि सांस्कृतिक कार्यकर्ते अमित वाईकर यांनी 'बियाँड बॉर्डर्स : हाऊ इंडिया कम्युनिकेट्स विथ द वर्ल्ड' या विषयावर बीजभाषण केले. आजचा युवा भारत देशाचा सर्वांत प्रभावी जागतिक संवादक आहे. भारत तुमच्या माध्यमातून जगाशी संवाद साधतो, असे सांगत त्यांनी विद्यार्थ्यांना भारताच्या आंतरराष्ट्रीय प्रतिमेचे संवाहक बनण्याचे आवाहन केले. भारताची ओळख केवळ विविध रंग, संगीत, साहित्य, भाषा आणि संस्कृतीपुरती मर्यादित नाही. असे वाईकर म्हणाले. चीनमधील आपल्या वास्तव्यात आयोजित केलेल्या सार्वजनिक रक्तदान शिबिराचा अनुभव त्यांनी यावेळी सांगितला. निःस्वार्थ सेवा आणि त्यातून निर्माण होणारा विश्वास हीच भारताची खरी जागतिक ताकद असल्याचे त्यांनी सांगितले.

आयआयएम नागपूरचे संचालक डॉ. भीमराया मेत्री यांनी संस्थेच्या विविध उपक्रमांची माहिती दिली. ते म्हणाले, आयआयएम नागपूर केवळ भविष्यासाठी सक्षम मनुष्यबळ घडवत नसून महाराष्ट्र आणि देशाच्या सर्वांगीण विकासासाठी केंद्र व राज्य सरकारसोबत सक्रियपणे काम करीत आहे. या संस्थेने विविध शासकीय विभाग आणि संस्थांसोबत केलेले सामंजस्य करार, लोकाभिमुख प्रकल्प तसेच ज्ञान व संशोधनाच्या माध्यमातून समाजासाठी सुरू असलेल्या उपक्रमांचा त्यांनी यावेळी उल्लेख केला.

यावेळी शिक्षणतज्ज्ञ, प्राध्यापक, अधिकारी, विद्यार्थी, उद्योग प्रतिनिधी, प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी उपस्थित होते. दोन दिवस चाललेल्या 'मीडिया कॉन्क्लेव्ह २०२६'मध्ये माध्यमे, नेतृत्व, कृत्रिम बुद्धिमत्ता, सार्वजनिक संवाद, विकास पत्रकारिता, आरोग्यविषयक जनजागृती, हिंदी माध्यमे आणि भारताची जागतिक प्रतिमा अशा विविध विषयांवर व्यापक मंथन झाले.

## एनसीएमसी कार्डच्या तिकीट आकारणीत अनियमितता, तात्काळ चौकशीची ग्राहक पंचायतीची मागणी

### कार्डच्या तिकीट आकारणीत कथित अनियमितता, तात्काळ चौकशीची ग्राहक पंचायतीची मागणी

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर शहरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत वापरल्या जाणाऱ्या एनसीएमसी कार्डच्या माध्यमातून प्रवास करणाऱ्या प्रवाशांकडून तिकीट मशीनद्वारे अपेक्षेपेक्षा अधिक रक्कम आकारली जात असल्याचा गंभीर आरोप ग्राहक पंचायत नागपूर जिल्ह्याने केला आहे.

या कथित अनियमिततेची तातडीने चौकशी करून प्रवाशांकडून अतिरिक्त आकारलेली रक्कम परत करण्यात यावी, तसेच एनसीएमसी कार्ड व्यवहारांचे स्वतंत्र ऑडिट करण्यात यावे, अशी मागणी अखिल भारतीय ग्राहक पंचायतीने केली आहे. ग्राहक पंचायत नागपूर जिल्ह्याचे कार्याध्यक्ष संजय धर्माधिकारी आणि अध्यक्ष गणेश शिरोळे यांनी राज्याचे मुख्यमंत्री यांना पत्र पाठवून या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी केली आहे. प्रवाशांकडून येणाऱ्या तक्रारींच्या आधारे हा मुद्दा पुढे आणण्यात आला आहे. ग्राहक पंचायतीच्या म्हणण्यानुसार, एनसीएमसी कार्डवरून एका तिकिटाची रक्कम घेतली असतानाही वाहनातील तिकीट मशीनद्वारे चार तिकिटांची रक्कम आकारली गेल्याच्या तक्रारी प्रवाशांकडून करण्यात आल्या आहेत.

अतिरिक्त आकारलेली रक्कम परत मिळण्याबाबत विभाग नियंत्रक, नागपूर यांच्याकडे मार्गदर्शन मागण्यात आले; मात्र त्यातून समाधानकारक मार्गदर्शन मिळाले नसल्याचे ग्राहक पंचायतीने म्हटले आहे.

**कार्ड रिचार्जमध्येही पारदर्शकतेचा अभाव?**

एनसीएमसी कार्ड रिचार्ज करताना १.०६ टक्के कमी रक्कम जमा होत असल्याचा दावा करण्यात आला आहे. कार्ड रिचार्ज अथवा व्यवहाराची माहिती ग्राहकांना एसएमएस, ई-मेल किंवा व्हॉट्सअपच्या माध्यमातून मिळत नसल्याने व्यवहाराच्या पारदर्शकतेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण होत असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. तसेच कार्ड सुरू करण्यापूर्वी त्याची योग्य तपासणी होत नसल्याने प्रवासा दरम्यान तिकीट मशीन बंद पडणे, इंटरनेट सेवा उपलब्ध नसणे आदी तांत्रिक अडचणींना प्रवाशांना सामोरे जावे लागत असल्याचा आरोपही ग्राहक पंचायतीने केला आहे. त्यामुळे प्रवाशांना गैरसोयीचा सामना करावा लागत असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

**महिला प्रवाशांबाबतही तक्रार**

विशेषतः महिला प्रवाशांच्या बाबतीतही कार्डमधून रक्कम जमा असतानादेखील पूर्ण तिकीट आकारले जात असल्याचा दावा तक्रारीत करण्यात आला आहे. या प्रकाराचीही चौकशी करून प्रवाशांकडून चुकीच्या पद्धतीने आकारण्यात आलेली रक्कम परत करण्याची मागणी करण्यात आली आहे. एजन्सीला आर्थिक फायदा करून देण्याचा आरोप ग्राहक पंचायतीने या संपूर्ण व्यवस्थेबाबत आणखी गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. एनसीएमसी कार्ड व्यवस्थेचे कंत्राट ज्या एजन्सीला देण्यात आले आहे, त्या एजन्सीला आर्थिक फायदा व्हावा या उद्देशानेच ही व्यवस्था करण्यात आली असल्याचा आरोप निवेदनातून करण्यात आला आहे. तसेच संबंधित प्रशासनाची जबाबदारी असतानाही याची पुरेशी तपासणी न होता योजना वेगाने लागू करण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे.

या सर्व प्रकारामुळे एमएसआरटीसी व एनसीएमसी कार्ड व्यवस्थेतील आर्थिक व्यवहार, तिकीट मशीनची कार्यप्रणाली तसेच प्रवाशांना मिळणाऱ्या व्यवहाराच्या माहितीतील पारदर्शकता याबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले असल्याचे ग्राहक पंचायतीने म्हटले आहे. स्वतंत्र चौकशीसह ऑडिटची मागणी मुख्यमंत्र्यांनी या तक्रारीची तातडीने दखल घेऊन स्वतंत्र चौकशी करावी, प्रवाशांकडून अतिरिक्त आकारलेली रक्कम परत मिळवून द्यावी, एनसीएमसी व्यवहारांचे स्वतंत्र ऑडिट करावे तसेच दोषी आढळणाऱ्या संबंधितांवर नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी ग्राहक पंचायतीने केली आहे.

या प्रसिद्धीपत्रकावर अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य गजानन पांडे, शहराचे अध्यक्ष अनिरुद्ध गुप्ते, जिल्हा सचिव प्रकाश भुजाडे, शहर सहसचिव समीर जोशी, तसेच संजय जोशी, संजय देशपांडे, प्रसाद पोफळी, नगसेविका मायाताई हाडे, शहर उपाध्यक्ष उदय दिवे, जिल्हा उपाध्यक्ष अरविंद हाडे, बब्बू भाई शेख, विजय पांडे, संध्या कुर्वे, अँड. स्मिता देशपांडे, तृप्ती आकांत, संध्या पुनियानी, श्रीपाद हत्तमस आदींच्या सह्या आहेत. ग्राहकांच्या हिताचे संरक्षण आणि सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेतील आर्थिक व्यवहारात पारदर्शकता राखण्यासाठी या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी होणे आवश्यक असल्याचे ग्राहक पंचायतीने स्पष्ट केले आहे.

## नरखेडच्या दहीहंडीतून एकतेचा संदेश, नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग

### श्री छत्रपती शिवाजी महाराज संघटन टीमने फोडली दहीहंडी, ४१ हजारांचे प्रथम पारितोषिक



**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

नरखेड शहरात पारंपरिक दहीहंडी उत्सव मोठ्या उत्साहात, जल्लोषात आणि सामाजिक एकतेचा संदेश देत पार पडला. दहीहंडीच्या निमित्ताने शहरातील युवक, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच विविध सामाजिक घटक मोठ्या संख्येने एकत्र आल्याने संपूर्ण परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. या उत्सवातून सामाजिक सलोखा, बंधुभाव आणि एकतेचे दर्शन घडले. डॉ. अमोलदादा रणजितबाबू देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत दहीहंडी उत्सवाचे आयोजन करण्यात आले. यावेळी नगर परिषद अध्यक्ष मनोज रमेशबाबू कोरडे, गोपालजी टेकाडे, श्यामरावजी बाराई, संजयजी चरडे, नितीनजी राय, विनोद क्षीरसागर यांच्यासह विविध मान्यवरांची उपस्थिती लाभली.

दहीहंडी फोडण्यासाठी गोविंदा पथकांमध्ये मोठी चुरस पाहायला मिळाली. ढोल-ताशांचा गजर, 'गोविंदा आला रे'च्या जयघोषाने वातावरण दुमदुमून गेले. युवकांनी मानवी मनोरे रचत दहीहंडी फोडण्यासाठी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. अखेर श्री छत्रपती शिवाजी महाराज संघटन टीमने उत्कृष्ट कामगिरी करत दहीहंडी फोडली आणि ४१ हजार रुपयांचे प्रथम पारितोषिक पटकावले. दहीहंडी उत्सव हा केवळ धार्मिक किंवा सांस्कृतिक कार्यक्रम न राहता समाजातील विविध घटकांना एकत्र आणणारा उत्सव ठरला. युवकांमध्ये संघभावना, शिस्त, सहकार्य आणि सामाजिक बांधिलकी निर्माण करण्याबरोबरच सर्व समाजघटकांनी एकत्र येऊन उत्सव साजरा करण्याचा संदेश यानिमित्ताने देण्यात आला. या उत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी पप्पू महंत, सारंग दळवी, मुकुंदजी रावत, निलेश पोतदार, संकेत कुराडे, शंकर महिंद्रे, गौरव पोतदार, रुपेश अजमेरा, जितू दादमल, लक्ष खत्री, जितू खत्री, शुभम जवाडे, बाळा कोठे, अबुताला खान, हेमंत बोरकर, रमेश रेवटकर, दिवाकर बंदिरगे, विनोद क्षीरसागर यांच्यासह सर्व सहकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## मराठा-कुणबी-ओबीसी विषयातून मराठा आरक्षण मंत्रिमंडळ उपसमितीला हटवा, राष्ट्रीय ओबीसी मुक्ती मोर्चाची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

### मराठा आरक्षण उपसमितीला कुणबीकरणाचा निर्णय घेण्याचा अधिकार काय? चिमूर तालुक्यातील ९२ ग्रामपंचायतींच्या सरपंचपदाच्या आरक्षण सोडतीचा फेरविचार करण्याचीही मागणी

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

मराठा समाजाचे कुणबीकरण करून ओबीसी प्रवर्गात समावेश करण्या संदर्भातील निर्णय घेण्याचा अधिकार मराठा आरक्षण मंत्रिमंडळ उपसमितीला काय आहे, असा सवाल उपस्थित करून राष्ट्रीय ओबीसी मुक्ती मोर्चाने ही उपसमिती या विषयातून तातडीने हटवावी, या विषयातील पुढील सर्व निर्णय ओबीसी मंत्रिमंडळ उपसमितीमार्फत घेण्यात यावेत, अशी मागणी मोर्चाचे मुख्य संयोजक नितीन चौधरी यांनी पत्रपरिषदेत केली. मराठा आरक्षण हा स्वतंत्र विषय असून, मराठा समाजाचे कुणबीकरण व



त्यानंतर ओबीसी प्रवर्गात समावेश हा ओबीसी आरक्षणाच्या प्रक्रियेशी संबंधित विषय आहे. त्यामुळे या विषयावर निर्णय घेण्यासाठी संबंधित ओबीसी मंत्रिमंडळ उपसमितीला जबाबदारी देणे आवश्यक असल्याचे चौधरी यांनी सांगितले. मराठा आंदोलनाच्या मागण्यांवर सरकारकडून निर्णय घेतले जात असल्याने ओबीसी समाजामध्ये अस्वस्थता वाढत असल्याचा आरोपही त्यांनी केला. २५ जानेवारी २०२४ आणि २ सप्टेंबर २०२६ रोजीचे शासन निर्णय, तसेच मराठा आंदोलकांशी झालेल्या चर्चेचा संदर्भ देत, कुणबी प्रमाणपत्र देण्याबाबत आश्वासने दिली जात असल्याचा दावा त्यांनी केला. या संपूर्ण प्रक्रियेची वैधानिकता स्पष्ट करण्याची मागणीही त्यांनी केली. पूर्वीच्या निर्णयांची समीक्षा करा

मराठा- कुणबीकरण व ओबीसीकरणाच्या संदर्भात मराठा आरक्षण मंत्रिमंडळ उपसमितीने यापूर्वी घेतलेल्या निर्णयांची ओबीसी मंत्रिमंडळ उपसमितीने समीक्षा करावी, अशी मागणी करण्यात आली. तसेच यापुढे या विषया संदर्भात कोणताही निर्णय घेण्याची जबाबदारी मराठा आरक्षण मंत्रिमंडळ उपसमितीकडे ठेवू नये, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना करण्यात आले. यासंदर्भात लवकरच मुख्यमंत्र्यांची भेट घेणार असल्याचेही मोर्चाने सांगितले. चिमूरमधील ९२ ग्रामपंचायतींच्या आरक्षणावर प्रश्नचिन्ह दरम्यान, राज्यातील ओबीसी समाजाच्या राजकीय प्रतिनिधित्वाकडेही सरकारचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप मोर्चाने केला. चंद्रपूर जिल्ह्यातील चिमूर क्षेत्रातील ९२ ग्रामपंचायतींच्या सरपंचपदाच्या आरक्षण सोडतीत ओबीसी समाजासाठी एकही सरपंचपद राखीव नसल्याचा दावा पत्रपरिषदेत करण्यात आला. एवढ्या मोठ्या संख्येने ग्रामपंचायती असताना ओबीसी समाजाला एकही सरपंचपद न मिळणे हा गंभीर प्रश्न असून, या आरक्षण सोडतीचा फेरविचार करण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली. जिल्हा व तालुका स्तरावर ओबीसींचे राजकीय प्रतिनिधित्व योग्य प्रमाणात कायम राहण्यासाठी ओबीसी मंत्रिमंडळ उपसमितीने पुढाकार घ्यावा, असेही मोर्चाने म्हटले. ओबीसींच्या योजना, सवलती आणि निधीच्या तरतुदींवर केवळ चर्चा न करता ओबीसींच्या राजकीय प्रतिनिधित्वाचा प्रश्नही गांभीर्याने हाताळण्याची गरज असल्याचे चौधरी यांनी स्पष्ट केले. यावेळी पत्रपरिषदेत रमेश कोठाळे, प्रभाकर फुलबांधे, अरुण पाटमासे, गुणवंत देशकर, संतोष नारसेकर आणि सुधीर कडू यांच्यासह राष्ट्रीय ओबीसी मुक्ती मोर्चाचे पदाधिकारी उपस्थित होते.

# खापरखेडा पत्रकार संघाच्या निवेदनाची आमदार डॉ. आशिष देशमुख यांच्याकडून दखल

## चिचोली आठवडी बाजारात सीएसआर निधीतून मूलभूत सुविधा पुरवण्याचे कार्यकारी संचालकांना निर्देश

**दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा**

खापरखेडा येथील चिचोली आठवडी बाजारात महानिर्मितीच्या सीएसआर फंडातून मूलभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात या मागणीसाठी खापरखेडा पत्रकार संघाच्या वतीने सावनेर-कळमेश्वर विधानसभा मतदारसंघाचे आमदार डॉ. आशिष देशमुख यांना ६ सप्टेंबर रविवारला निवेदन देण्यात आले निवेदनाची दखल घेत आमदार डॉ. देशमुख यांनी महानिर्मितीच्या कार्यकारी



संचालक (प्रकल्प) विवेक रोकडे यांच्याशी संपर्क साधून चिचोली आठवडी बाजारात सर्व आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याचे निर्देश दिले आहेत.

खापरखेडा मुख्य बाजारपेठेतील अधिन्यासच्या जागेवर भरणारा रविवार आठवडी बाजार चिचोली येथील वार्ड क्रमांक १ मधील महानिर्मितीच्या जागेवर स्थलांतरित करण्यात आला आहे सदर जागा महानिर्मितीच्या मालकीची असल्याने पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी खापरखेडा औष्णिक वीज केंद्र प्रशासनाला मूलभूत नागरी सुविधा उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले होते.

खापरखेडा औष्णिक वीज केंद्र प्रशासनाने चिचोली आठवडी बाजारात मूलभूत सोयी-सुविधा उभारण्यासाठी जवळपास ३ कोटी ४३ लाख रुपयांच्या कामांचा प्रस्ताव सीएसआर फंडातून मंजुरीसाठी मुंबई येथील प्रकाशगड मुख्य कार्यालयाकडे व संबंधित विभागाकडे पाठवला आहे.

मात्र बाजारात येणाऱ्या शेकडो नागरिकांना व व्यापारी व भाजी विक्रेत्यांना विविध समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. त्यामुळे सामाजिक बांधिलकीची जाण ठेऊन नागपूर जिल्हा मराठी पत्रकार संघ संलग्न खापरखेडा पत्रकार संघाच्या वतीने आमदार डॉ. आशिष देशमुख यांची भेट घेऊन निवेदन देण्यात आले.

यावेळी आमदार डॉ. आशिष देशमुख यांनी निवेदनाची दखल घेत महानिर्मितीचे कार्यकारी संचालक (प्रकल्प) विवेक रोकडे यांना सीएसआर फंडातील ३ कोटी ४३ लाखांच्या प्रस्तावाला मंजुरी देऊन चिचोली आठवडी बाजारात मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याच्या सूचना केल्या. आमदार डॉ. आशिष देशमुख यांच्या सकारात्मक पुढाकारामुळे चिचोली आठवडी बाजाराचा कायापालट होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. निवेदन देताना खापरखेडा पत्रकार संघाचे अध्यक्ष सुनील जांलदर, सचिव अभय मिश्रा उपस्थित होते.

थोडक्यात

## महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धेसाठी अर्ज सादर करण्यास ११ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

राज्य शासनाच्यावतीने सन २०२५ पासून महाराष्ट्रातील गणेशोत्सव हा 'महाराष्ट्राचा राज्य उत्सव' म्हणून साजरा करण्यात येत आहे. या राज्य उत्सवांतर्गत आयोजित करण्यात आलेल्या 'महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा २०२६' साठी अर्ज सादर करण्याच्या मुदतीत वाढ करण्यात आल्याची घोषणा राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी केली आहे. यावर्षीपासून देशभरातील आणि देशाबाहेरील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांसाठीही स्वतंत्र बक्षिसे ठेवण्यात आली असून जास्तीतजास्त गणेशोत्सव मंडळांना या स्पर्धेत सहभागी होता यावे, या उद्देशाने अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख आता शुक्रवार, ११ सप्टेंबर २०२६ पर्यंत करण्यात आली आहे. या स्पर्धेसाठीचे अर्ज https://ganeshotsav.pldmka. co.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने स्वीकारले जात आहेत. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी या सुवर्णसंधीचा लाभ घेत मोठ्या संख्येने सहभागी व्हावे आणि तालुका, जिल्हा, राज्य, राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरील पारितोषिके पटकावावीत, असे आवाहन सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी केले आहे.

## नवनीत नगरच्या विकासासाठी नागरिकांचे खासदारांकडे साकडे, प्रलंबित कामे मार्गी लावण्याची मागणी



**दै. सिंहवाणी वृत्त, वाडी**

नवनीत नगर परिसराच्या सर्वांगीण विकासासह नागरिकांच्या विविध समस्या व प्रलंबित विकासकामांकडे लक्ष वेधण्यासाठी नागरिकांच्या शिष्टमंडळाने खासदारांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. यावेळी परिसरातील रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, पथदिवे तसेच इतर मूलभूत सुविधांशी संबंधित समस्यांबाबत नागरिकांनी आपल्या मागण्या खासदारांच्या निदर्शनास आणून दिल्या. परिसराच्या विकासाला गती मिळावी आणि नागरिकांच्या समस्यांचे प्राधान्याने निराकरण व्हावे, अशी मागणी शिष्टमंडळाने केली.

नवनीत नगरच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्याबाबत यावेळी सकारात्मक चर्चा झाली. नागरिकांच्या विविध प्रश्नांची योग्य स्तरावर मांडणी करून त्यावर तातडीने कार्यवाही करण्याची अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली. यावेळी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अश्विन बैस, वाडी नगर परिषदेचे नगरसेवक आशिष मुरलीधर पाटील, मनोहर मेश्राम, शंकर गणवीर, प्रल्हाद उके, गौतम उके, रुपेश वानखेडे, माणिक निकोसे, राजकुमार दहिवले, मनीष मांडवे, धीरज पाटील, महानंदा राऊत, माया रामटेके, माया मांडवे, संगीता गजभिये, मेघा गजभिये व कल्याणी मांडवे उपस्थित होते. नवनीत नगरच्या विकासासाठी नागरिक एकजुटीने पुढाकार घेत असून, परिसरातील प्रलंबित प्रश्न मार्गी लागेपर्यंत सातत्याने पाठपुरावा करण्यात येणार असल्याचे नागरिकांनी यावेळी सांगितले.

## शेतातील केबल चोरणारी टोळी गजाआड!

### ४२ हजारांच्या ४७० मीटर केबल चोरीचा छडा, तांबे काढून नागपुरात विक्री

**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**

शेतातील बोरवेलच्या मोटारीला जोडलेली विद्युत केबल चोरून नेण्याचा धंदा करणाऱ्या टोळीचा भिवापूर पोलिसांनी पदार्फाश केला आहे.



विशेष खेडकर, शुभम शिवरकर, प्रज्वल खेडकर, संदीप खारकर

भागेभोरी, गोंडबोरी, सेलोटी, किन्हाळा, विरखंडी-धापर्ला परिसरातील शेतांमधून तब्बल ४७० मीटर विद्युत केबल, अंदाजे ४२ हजार रुपये किमतीची, चोरल्याचे तपासात उघड झाले आहे. चोरी केलेल्या केबलमधील तांबे काढून ते नागपुरातील भंगार व्यावसायिकांना विकल्याची माहितीही समोर आली आहे. सेलोटी येथील शेतकरी सुनिल शामरावजी लाहोरे यांच्या शेतातील बोरवेलच्या पंपापासून ग्रीपपर्यंतची सुमारे ९० मीटर केबल चोरीला गेल्याचे ५ सप्टेंबर रोजी निदर्शनास आले. त्यानंतर परिसरातील इतर शेतकऱ्यांकडे चौकशी केली असता अनेक शेतांमधूनही विद्युत केबल गायब असल्याचे समोर आले. यानुसार पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली.

तक्रारीच्या धाग्यावरून तपासाची चक्रे फिरवत भिवापूर पोलिसांनी संदीप रामाजी खारकर (२६), विशेष रघुनाथ खेडकर (१९), शुभम नामदेव शिवरकर (२५) आणि प्रज्वल रघुनाथ खेडकर (२१) यांना अटक केली. पोलिसांच्या माहितीनुसार, आरोपी संगनमताने दोन मोटारसायकलींचा वापर करून शेतांमधील केबल चोरत होते. त्यानंतर केबल जाळून त्यातील तांबे वेगळा करून नागपुरात भंगारात विकला जात होता. या कारवाईमुळे शेतकऱ्यांच्या शेतातील केबल चोरीच्या घटनांमागील टोळीचा पदार्फाश झाला असला तरी चोरीच्या मालाची पूर्ण वसुली आणि गुन्ह्यात वापरलेल्या मोटारसायकली व कटरची जप्ती अद्याप बाकी असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे. ठाणेदार मस्कर यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई पोलीस नायक रवींद्र जाधव, पोलीस अंमलदार मनोज चाचरे व रोशन शहारे यांनी पार पाडली. पोलीस पुढील तपास करीत आहेत.

## आगामी सणोत्सवाच्या पार्श्वभूमीवर नागपूर ग्रामीण पोलीसांनी घेतली रामटेक येथे शांतता समिती बैठक




**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**

नागपुर ग्रामीण पोलीस अधिक्षक हर्ष पोद्दार, अपर पोलीस अधीक्षक अनिल म्हस्के यांच्या मार्गदर्शनात आगामी गणेशोत्सव तसेच विविध धार्मिक उत्सवांच्या पार्श्वभूमीवर सणोत्सव बंदोबस्त असल्याने कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी नागपूर ग्रामीण जिल्ह्यातील विविध पोलीस स्टेशन येथे आगामी गणेशोत्सव, श्रीकृष्ण जयंती, पोळा आणि इतर सणोत्सवांच्या विविध बैठका घेण्यात आल्या. रामटेक पोलीस स्टेशन आगामी सणोत्सव संदर्भात गणेश मंडळ पदाधिकारी, शांतता समिती सदस्य आणि पोलीस पाटील यांची बैठक घेण्यात आली.

यावेळी बैठकीमध्ये रामटेक उपविभागीय अधिकारी प्रियेश महाजन, उपविभागीय पोलीस अधिकारी रमेश बरकते, तहसीलदार रमेश कोळपे, रामटेक पोलीस निरीक्षक राजेशकुमार थोरात,देवलापार सहा पोलीस निरीक्षक नारायण तुरकुंडे,अरोली सहा पोलीस निरीक्षक सागर गोमासे उपस्थित होते. तसेच पोलीस स्टेशन रामटेक येथे पोलीस निरीक्षक राजेशकुमार थोरात यांनी गणेश मंडळ पदाधिकारी आणि डिजे मालक यांची बैठक घेतली.

## शिक्षक ही समाज आणि राष्ट्रनिर्मितीची मजबूत कडी : एस. जी. मच्छिरके

### जिल्हा परिषद हिंदी वरिष्ठ प्राथमिक शाळा नवेगाव येथे उत्साहात शिक्षक दिन साजरा



**दै. सिंहवाणी वृत्त, राजु फुंडे-सालेकसा**

जिल्हा परिषद हिंदी वरिष्ठ प्राथमिक शाळा नवेगाव येथे भारताचे महान शिक्षणतज्ज्ञ तथा माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त शिक्षक दिन उत्साहपूर्ण व मंगलमय वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात माता सरस्वती आणि डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षकांप्रती आदर व कृतज्ञता व्यक्त केली. तसेच शाळेतील सर्व शिक्षकांचा श्रीफळ व पेन देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पदवीधर शिक्षक एस. जी. मच्छिरके होते, तर प्रमुख अतिथी म्हणून पदवीधर शिक्षक राजकुमार बसोने उपस्थित होते. यावेळी स्वयंसेवक राकेश दमाहे आणि स्वयंसेविका साक्षी भंडारी यांची विशेष उपस्थिती होती.

कार्यक्रमात मार्गदर्शन करताना वक्त्यांनी सांगितले की, शिक्षक हे केवळ विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाचे ज्ञान देणारे नसून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची, संस्कारांची आणि उज्ज्वल भविष्याची जडणघडण करणारे शिल्पकार आहेत. आदर्श शिक्षक विद्यार्थ्यांना योग्य दिशा देऊन त्यांना जबाबदार नागरिक घडविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करतात. यावेळी विद्यार्थ्यांनी शिक्षक दिनाचे महत्त्व विशद करत आपले मनोगत व्यक्त केले. शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त करताना विद्यार्थ्यांनी गुरुजनांच्या मार्गदर्शनाचे महत्त्व अधोरेखित केले. त्यामुळे शाळेच्या परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. अध्यक्षीय मार्गदर्शन करताना एस. जी. मच्छिरके यांनी विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबतच शिस्त, संस्कार आणि मेहनतीला जीवनात महत्त्व द्यावे, असे आवाहन केले. राजकुमार बसोने यांनी विद्यार्थ्यांनी जीवनात निश्चित ध्येय ठेवून सातत्याने प्रयत्न करावेत तसेच शिक्षकांच्या मार्गदर्शनाचा योग्य लाभ घ्यावा, असे सांगितले.

कार्यक्रमाचे संचालन कु. माही बोपचे यांनी केले, तर आभार प्रदर्शन इंजल तांडेकर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी हिमांशू लिल्हारे, हिमेश ठेले, कु. हिमांशी मच्छिरके, हिमांशी बिसेन, विधी पटले, अदिती बोपचे, कुसुम वर्मा, दिव्य दमाहे आणि मयुरी भंडारी यांनी अथक परिश्रम घेतले. शिक्षक दिनाच्या या कार्यक्रमातून गुरु-शिष्य नात्यातील आदर, स्नेह आणि संस्कारांची परंपरा अधिक दृढ झाली.

## चिचोली येथील टॉवर लाईनजवळ जुगार अड्डयावर धाड

### १ लाख ३६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त, ५ आरोपींना रंगेहाथ अटक, १ फरार

**दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा**

स्थानिक पोलीस ठाण्याच्या हद्दीतील चिचोली येथे टॉवर लाईनजवळ सुरू असलेल्या जुगार अड्डयावर खापरखेडा पोलिसांनी ६ सप्टेंबर रविवारला दुपारच्या सुमारास धाड टाकून पाच आरोपींना रंगेहाथ अटक केली सदर घटनेत तीन दुचाकी, मोबाईल फोन व रोख रकमेसह एकूण १ लाख ३६ हजार ११० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला असून एक आरोपी पसार झाला आहे.



साहिल जाकिर दुधकनोज वय ३०, राहूल दादाराव निकोसे वय ४४, धर्मेंद्र उर्फ धर्मा अतिश्वर डोंगरे वय ३६, हसन खलील शेख वय ३२,रोहित नितलाल तुरकर वय २७ सर्व रा चिचोली वार्ड क्रमांक १ अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत.

प्राप्त माहितीनुसार ६ सप्टेंबर रविवारला खापरखेडा पोलीस ठाण्यातील डीबी पथक अवैध धंद्यांवर कारवाई करण्यासाठी पेट्रोलिंग करीत होते यावेळी चिचोली येथे टॉवर लाईनजवळ मैदानात काही इसम जुगार खेळत असल्याची गुप्त माहिती मिळाली माहितीच्या आधारावरून धाड टाकली असता नगदी ६ हजार ११० रुपये, तीन दुचाक्या, ५ मोबाईल, ५२ तासपत्ते असा एकूण २ लाख ३६ हजार ११० रुपयांचा मुद्देमाल घटनास्थळावरून जप्त केला. कारवाईदरम्यान आरोपी सचिन घोडेस्वार हा घटनास्थळावरून पसार झाला असून पोलीस शोध घेत आहेत

पोलीस शिपाई बादल गिरी यांच्या तक्रारीवरून आरोपींविरुद्ध कलम १२ महाराष्ट्र जुगार प्रतिबंध कायद्यान्वये गुन्हा दाखल केला असून पोळ्याच्या पावन पर्वावर खापरखेडा पोलिसानी धडक कार्यवाही सुरू केल्यामूळे गुन्हेगारांचे धाबे दणाणले आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप बुवा यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि सचिन यादव, पोहवा संदीप सगने, बादल गिरी, आशिष मेश्राम, शेखर वानखेडे, आशिष कापसे यांच्या पथकाने पार पाडली.

## आपत्ती पुनर्प्राप्ती डेटा सेंटरची कामे निर्धारित कालावधीत पूर्ण करावी :आशिष शेलार

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

शासनाच्या विविध विभागांच्या माहितीची सुरक्षितता, उपलब्धता आणि विश्वासार्हता सांभाळण्यासाठी नागपूर येथील आपत्ती पुनर्प्राप्ती डेटा सेंटर महत्त्वपूर्ण ठरणार आहे. हे सेंटर पूर्ण कार्यान्वित झाल्यावर शासकीय कामकाज अधिक विश्वसनीय, सुरक्षित व कार्यक्षमतेने होण्यास मदत होईल. त्यादृष्टीने येथील उर्वरित कामे निर्धारित कालावधीत गतीने पूर्ण करण्याचे आदेश राज्याचे माहिती तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार यांनी आज येथे दिले.

गड्डीगोदाम मेट्रो स्थानक येथे सुमारे १४ हजार चौरस फूट जागेत उभारण्यात येत असलेल्या अत्याधुनिक आपत्ती पुनर्प्राप्ती डेटा सेंटरची आशिष शेलार यांनी आज पाहणी केली.



यावेळी त्यांनी येथील कामांचा सविस्तर आढावा घेतला. इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभागाचे नोडल अधिकारी लक्ष्मीकांत त्रिपाठी, महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशनचे कार्यकारी संचालक संदीप बापट, महामेट्रोचे महाप्रबंधक सुधाकर उराडे यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु असलेला आपत्ती पुनर्प्राप्ती डेटा सेंटरचा हा प्रकल्प शासनाच्या विविध विभागांची माहिती सुरक्षित ठेवण्याच्या दृष्टीने महत्वाचा ठरणार असल्याचे सांगून आशिष शेलार यांनी डेटा सेंटरची आपत्कालीन परिस्थितीतील कार्यक्षमता आणि सुरक्षितता अधिक बळकट करण्यासाठी विशेष नियोजन करण्याच्या सूचना केल्या. त्यादृष्टीने संबंधित अधिकाऱ्यांनी केलेल्या पुढील नियोजनाची माहिती त्यांनी घेतली.

### पाहणीदरम्यान तांत्रिक चर्चा व आढावा

डेटा सेंटरच्या सुरळीत आणि अखंडित कामकाजासाठी आवश्यक असलेल्या सर्व तांत्रिक बाबींची मंत्री शेलार संबंधितांकडून माहिती घेतली. सर्व्हर रूम, कंट्रोल रूम तसेच महत्वाचे विविध कक्ष, इमर्जन्सी युनिट व सुरक्षेची रचना जाणून घेतली.

संबंधित अधिकाऱ्यांनी त्यांना येथील संपूर्ण परिसर अवगत करून दिला. येथील सर्व्हर सातत्याने थंड ठेवण्यासाठी लागणाऱ्या कूलिंग सिस्टीम आणि त्यासाठी आवश्यक असणाऱ्या पाण्याची उपलब्धता व पर्यायी व्यवस्थेविषयी विशेष सजगता ठेवावी. येथील प्रलंबित कामांची वेळेत पूर्तता करण्यासाठी विविध विभागांमध समन्वय राखून कामाच्या गतीवर लक्ष ठेवावे असे सांगून श्री शेलार यांनी प्रकल्पाची सद्यस्थिती व पुढील प्रत्येक टप्प्यातील कामांच्या नियोजनाची माहिती घेतली.

## जन्माष्टमीनिमित्त भक्तिमय भजन अन् दहीहंडी उत्सव



**दै. सिंहवाणी वृत्त, वाडी**

दत्तवाडी येथील गजानन सोसायटीमध्ये जन्माष्टमीनिमित्त गुरुकृपा साई महिला भजन मंडळाच्या वतीने भक्तिमय भजनाचा कार्यक्रम आणि दहीहंडी उत्सव उत्साहात पार पडला. यावेळी महिला मंडळाच्या सदस्यांनी विविध भक्तिमय भजनांचे सादरीकरण करून परिसरातील वातावरण भक्तिमय केले. कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरलेल्या दहीहंडी उत्सवात रुक्मिणी चिटमुलवार या चिमुकलीने श्रीकृष्णाची वेशभूषा साकारत दहीहंडी फोडली. तिच्या या कृष्णरूपाने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. भजन कार्यक्रमात शालू देवरे, संध्या वाघमारे, अरुणा देशमुख, गीता थोटे, वर्षा इंगळे व दिलीप तराळेकर यांनी साथसंगत केली. मृदंगवादक अरुण कराळे आणि संवादिनीवादक राजेंद्र वाघ यांनी वाद्यसाथ देत कार्यक्रमाची रंगत वाढविली. या कार्यक्रमाचे आयोजन वेदांत चिटमुलवार व स्नेहा चिटमुलवार यांनी केले. कार्यक्रमाला परिसरातील नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

थोडक्यात

## बोरी (घिवारी) येथे शिक्षक दिन साजरा



**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**

शिक्षक दिनानिमित्त बोरी (घिवारी) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शिक्षक दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी शाळेतील विद्यार्थ्यांनी शिक्षकांची भूमिका साकारून एक सुंदर अनुभव घेतला. याप्रसंगी सरपंच विशाल सेलोकर, मुख्याध्यापक लोकेश प्रतेके, शाळा समिती उपाध्यक्ष कैलास झलके, अगंवाडी सेविका दामिनी तिजारे, मदतनीस प्रतिमा मेश्राम, आरोग्य सेविका निशा तायडे, आरोग्य सहाय्यक वैद्य, आशा सेविका रंजना चवळे, शाळा मदतनीस अनिता मडावी, पालक तेजराम पिंगरे,अजय तिजारे उपस्थित होते. याप्रसंगी मार्गदर्शन करताना सरपंच विशाल सेलोकर म्हणाले की,आजचा विद्यार्थीच उद्याचा शिक्षक, अधिकारी, नेता आणि देशाचा आधारस्तंभ आहे.

शिक्षक होणे म्हणजे केवळ वर्गात शिकवणे नाही, तर ज्ञान देणे, संस्कार घडवणे आणि उज्ज्वल भविष्याची वाट दाखवणे होय. विद्यार्थ्यांनी शिक्षकाची भूमिका साकारताना घेतलेला हा अनुभव त्यांच्यातील आत्मविश्वास, जबाबदारी आणि नेतृत्वगुणांना नक्कीच बळ देईल. या सुंदर उपक्रमासाठी शाळेतील सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांचे त्यांनी कौतुक केले.

## आयुष्यमान हॉस्पिटलविरोधात चौकशीची मागणी

### दोषी आढळल्यास गुन्हा दाखल करण्याची शिवसेनेची मागणी



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

आयुष्यमान हॉस्पिटल, पंचशील टॉकीजसमोर, बिग बाजारच्या मागे, नागपूर येथे उपचारादरम्यान विठ्ठल तुकाराम साठे यांचा मृत्यू झाल्याच्या घटने प्रकरणी रुग्णालयाच्या कार्यपद्धतीची सखोल चौकशी करून दोषी आढळणाऱ्या संबंधितां विरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी शिवसेनेच्या वतीने करण्यात आली. युवा सेना जिल्हाप्रमुख शरद सरोदे यांच्या नेतृत्वाखाली रविवारी ६ सप्टेंबर रोजी, आयुष्यमान हॉस्पिटलसमोर विठ्ठल तुकाराम साठे यांचा मृतदेह ठेवून पीडित कुटुंबाला न्याय मिळावा तसेच कुटुंबाला योग्य मोबदला देण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली. या आंदोलना दरम्यान रुग्णालयाच्या कारभारा बाबत प्रश्न उपस्थित करण्यात आले असून, संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी पोलिस प्रशासनाकडे करण्यात आली. शिवसेने च्यावतीने हॉस्पिटलचे व्यवस्थापक डॉ. मुरली तसेच डॉ. रूबी यांच्या भूमिकेचीही चौकशी करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली. चौकशीत संबंधितांकडून कोणतीही वैद्यकीय अथवा कायदेशीर अनियमितता झाल्याचे निष्पन्न झाल्यास, त्यांच्याविरुद्ध लागू असलेल्या कायद्यानुसार एफआयआर दाखल करून आवश्यक ती पुढील कारवाई करावी तसेच हॉस्पिटलच्या कामकाजा बाबत बार कौन्सिलकडे निवेदन देण्यात येणार आहे, रुग्णालयाच्या व्यवस्थापनाची व संबंधित प्रकरणाची सखोल चौकशी करून दोष आढळल्यास नियमानुसार कायदेशीर कारवाई करण्यात यावी. रुग्णांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक असल्यास संबंधित रुग्णालयाच्या परवानग्या, नोंदणी व इतर वैधानिक बाबींचीही सक्षम प्राधिकरणा मार्फत तपासणी करण्यात यावी, अशी भूमिका शिवसेनेने व्यक्त केली. दरम्यान, मृत विठ्ठल तुकाराम साठे यांच्या कुटुंबीयांना शासनाच्या तसेच लागू असलेल्या कायदेशीर तरतुदींनुसार मदत व नुकसानभरपाई मिळवून देण्यासाठी प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी. मृत्यूचे नेमके कारण, उपचाराची पद्धत, वैद्यकीय नोंदी, उपचारा दरम्यान घेण्यात आलेले निर्णय आणि संबंधित रुग्णालयाकडून करण्यात आलेल्या उपचारांची प्रक्रिया यांची सक्षम यंत्रणे मार्फत तपासणी करण्यात यावी.

आयुष्यमान हॉस्पिटल विरोधात युवा सेना जिल्हा प्रमुख शरद सरोदे यांच्या नेतुत्वत आयुष्मान हॉस्पिटल पंचचिल चौक, बर्डी येथील दोषींवर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. पीडित कुटुंबाला न्याय मिळेपर्यंत शिवसेना त्यांच्या पाठीशी ठामपणे उभी राहील, अशी भूमिका युवा सेना जिल्हाप्रमुख शरद सरोदे यांनी यावेळी व्यक्त केली. या आंदोलनात महिला आघाडी जिल्हाप्रमुख सौ.मनीषा पपडकर, सुषमा इंगळे, मनीषा पराड, मुलासिंग गौर, पंकज खिच्ची, प्रतीक बहुगुणा, नैना दीक्षित, विक्रम ठाकूर, स्वप्निल वेश्य, उपशहरप्रमुख व शहर समन्वयक सोहम पापडकर, सागर बावने, महेश पारधी, अजय मोहाडीकर, तसेच अमित बजाज, विनोद प्रजापती, हरीश शाहू, मनीष दिनकर, पोलीस पाटील भूजल कालपूर, महेश ढोले, यश डोंगरे, शुभम साठे, मृतकाचे पुत्र सतीश दिनकर, आजनडोहचे सरपंच अनिल दिग्रस यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## विमल पाटील यांचे निधन



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

विमल रामकृष्ण पाटील (वय ९०, रा. आठवा मैल, मंडपेले-आऊट दवलामेठी)यांचे निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा सोमवारी सकाळी १० वाजता त्यांच्या राहते घरून निघेल. अंबाझरी घाटावर अंत्यसंस्कार करण्यात येईल.

# शिक्षण व्यवस्था वाचवण्यासाठी एकजुटीने लढा द्या : सुप्रिया सुळे

## म. रा. शिक्षण संस्था महामंडळाचे नागपूर व अमरावती विभागाचे संयुक्त अधिवेशन उत्साहात

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

गेल्या काही वर्षांपासून शिक्षण व्यवस्था कमकुवत करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. ही व्यवस्था वाचवण्यासाठी शिक्षण संस्था, शिक्षक, पालक आणि समाजाने एकत्र येण्याची गरज आहे. शिक्षण क्षेत्रातील प्रश्न सोडवण्यासाठी केवळ आंदोलन करण्याऐवजी ठोस कृती कार्यक्रम आखून शासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला पाहिजे, असे आवाहन महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्था महामंडळाच्या अध्यक्षा तथा खासदार सुप्रिया सुळे यांनी रविवारी केले.

महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्था महामंडळाच्या नागपूर व अमरावती विभागाच्या संयुक्त अधिवेशनात त्या बोलत होत्या. कमला नेहरू महाविद्यालय, सक्करदरा येथे आयोजित या एक दिवसीय अधिवेशनात शिक्षण संस्थांच्या विविध प्रश्नांवर चर्चा करण्यात आली.

शिक्षक दिनानिमित्त डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांना अभिवादन करून सुळे म्हणाल्या, शिक्षण



संस्थांनी प्रत्येक बैठकीत किमान एक ठोस ठराव करून त्यावर त्याच महिन्यात कार्यवाही करण्याचा प्रयत्न करावा. आंदोलन हा पहिला पर्याय नसावा. शासनाशी चर्चा करून प्रश्न सोडवण्यावर भर द्यावा. महामंडळाने आपली सदस्यसंख्या वाढवून सर्व शिक्षण संस्थांना एका छत्राखाली आणावे आणि शासनाकडे मागण्यांसाठी प्रभावी पाठपुरावा करावा, असे सुळे यांनी सांगितले. मराठी माध्यमाच्या शाळांचे अस्तित्व टिकवण्यासाठी पालकांना विश्वासात घेणे, शाळांची गुणवत्ता वाढवणे आणि बदलत्या काळानुसार शिक्षण पद्धतीत सुधारणा करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे भविष्यात शिक्षकांची भूमिका कमी होईल का, शिक्षकांची गरजच राहणार नाही का, अशी चर्चा सुरू आहे. मात्र पुढील पिढीला सक्षम करण्यासाठी शिक्षकांची भूमिका महत्त्वाचीच राहणार आहे.

मुलं शिक्षण व्यवस्थेपासून दूर जात असतील तर त्याचा परिणाम पुढील अनेक पिढ्यांना भोगावा लागेल. त्यामुळे शिक्षण संस्थांनी पुढील २५ वर्षांचे नियोजन करण्याची गरज आहे, असे सुळे यांनी नमूद केले. शिक्षकांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्याची आणि शिक्षण संस्थांनी आत्मचिंतन करून भविष्यासाठी धोरण निश्चित करण्याची गरज असल्याचेही त्यांनी सांगितले.

आरटीईअंतर्गत केंद्र सरकारने महाराष्ट्र सरकारला निधी दिल्याचे सांगितले जाते. मग अडचण नेमकी कुठे आहे? असा सवाल सुळे यांनी उपस्थित केला. या प्रश्नाकडे प्रत्येक आमदार आणि खासदाराने लक्ष देण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रास्ताविकातून रविंद्र फडणवीस यांनी महामंडळाचे कार्य व शिक्षण संस्थांचे प्रश्न यावर विचार माडले. आमदार किरण सरनाईक, वसंत घुईखेडकर, कांचनमाला गावंडे यांनीदेखील शिक्षक, प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची कमतरता, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान आणि शिष्यवृत्ती यांसह विविध प्रश्न मांडले.

अधिवेशनाच्या उद्घाटन सत्राला स्वागताध्यक्ष आमदार अभिजीत वंजारी, शिक्षक आमदार किरण सरनाईक, आमदार संजय भेंडे, माजी आमदार विनोद गुडधे पाटील, महामंडळाचे सहकार्यवाह रविंद्र फडणवीस, विजय गव्हाणे, नागपूर विभागाचे अध्यक्ष अनिल शिंदे, अमरावती विभागाच्या अध्यक्षा कांचनमाला गावंडे, वसंत घुईखेडकर, सलील देशमुख यांच्यासह अनेक मान्यवर व कार्यकारिणी सदस्य उपस्थित होते. नागपूर व अमरावती विभागातील शिक्षण संस्थांचे संचालक मोठ्या संख्येने अधिवेशनात उपस्थिती लावली. माजी केंद्रीय मंत्री विजयनवल पाटील यांची ऑनलाईन उपस्थिती होती. यावेळी मान्यवरांच्या हस्ते शिक्षणतज्ज्ञ विनोद गुडधे पाटील, सी. एस. जवदंड गुरूजी, ज्ञानेश्वर चामट, सीताराम तल्हार, शोभा काळे, मुश्ताक भाई, महेंद्र सोमवंशी यांचा सत्कार करण्यात आला.

**सरकारने शिक्षण-आरोग्याची जबाबदारी स्वीकारावी :**

### शिक्षकांनी एआय शिकणे महत्वाचे

एमकेसीएलचे संचालक शशिकांत देशपांडे यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेवर मार्गदर्शन केले. मानवी बुद्धिमत्ता आणि एआय म्हणजे नमानवी बुद्धिमत्ता यांची तुलना करताना त्यांनी यापैकी कोणती बुद्धिमत्ता श्रेष्ठ या वादात पडू नये. याऐवजी दोन्हीच्या समन्वयातून काय चांगले करता येईल याचा प्रयत्न केला पाहिजे, मानवी कौशल्ये कशी अधिक प्रगत करता येतील याचा विचार केला पाहिजे असे सांगताना त्यांनी शिक्षकांनी एआय शिकून घेणे खूप महत्वाचे असून विद्यार्थ्यांना अत्याधुनिक वातावरण उपलब्ध करून देण्याची जबाबदारी संस्था चालकांची असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

**अभिजीत वंजारी**

आमदार अभिजीत वंजारी म्हणाले, सरकारने किमान आरोग्य आणि शालेय शिक्षण या दोन मूलभूत क्षेत्रांची जबाबदारी स्वीकारली पाहिजे. महामंडळाच्या माध्यमातून त्यासाठी सातत्याने पाठपुरावा झाला पाहिजे. मराठी माध्यमाच्या शाळा आणि शालेय शिक्षण धोरणात पालकांना कसे सहभागी करून घेता येईल, याचा विचार करण्याची गरज आहे, असे ते म्हणाले.

# 'प्रतिमा उरी धरोनी'मधून अवीट मराठी भावसंगीताचा सुरेल जागर

### अरणाई-सप्तकतर्फे आयोजित संगीत मैफलीला रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

मराठी भावसंगीताची समृद्ध परंपरा जपणाऱ्या अजरामर कवी, गीतकार, संगीतकार आणि गायकांच्या स्मृतींना स्वरांजली अर्पण करणारा 'प्रतिमा उरी धरोनी' हा विशेष संगीत कार्यक्रम आज पर्सिस्टंट सभागृह, आयटी पार्क, गायत्रीनगर, नागपूर येथे उत्साहात पार पडला. अरणाई आणि सप्तक यांच्या वतीने आयोजित या कार्यक्रमाला संगीतप्रेमी रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

मराठी भावगीतांच्या सुवर्णकाळातील लोकप्रिय आणि अविस्मरणीय गीतांनी कार्यक्रमाची रंगत वाढवली. डॉ. आशिष मुजुमदार यांनी संगीत-निवेदनाची जबाबदारी सांभाळत प्रत्येक गीतामागील भावविश्व आणि संदर्भ रसिकांसमोर उलगडून सांगितला. त्यांच्या निवेदनामुळे कार्यक्रमातील गीतांचा आशय अधिक प्रभावीपणे रसिकांपर्यंत पोहोचला. गीत ही अंतिम प्रस्तुती असली तरीही प्रतीक गीत तयार होण्या पासून ते गायले जात पर्यन्त चा सफर तितकाच उत्कंठापूर्ण असतो असे मुजुमदार म्हणले.

कार्यक्रमाची सुरुवात अंजली मराठे यांच्या 'मोगरा फुलला' या गीताने झाली. त्यानंतर ऋषिकेश रानडे यांनी 'मन उधाण वाऱ्याचे', 'डौल मोराच्या मानचा', 'ही चाल तुरुतुरु', 'तुला पाहिले मी नदीच्या किनारी', 'गंसाजणी', 'लटपट लटपट तुझं चालणं', 'संथ वाहते कृष्णामाई' आणि 'या जन्मावर, या जगण्यावर' यांसारखी लोकप्रिय गीते सादर करून वातावरण सुरेल केले.

रश्मी मोघे यांच्या आवाजातील 'हे सुरांनो चंद्र व्हा', 'लावणी', 'राजा सारंगा', 'भारूड', 'प्रतिमा उरी धरुनी' आणि 'सारेच जण' या सादरीकरणांना रसिकांकडून विशेष दाद मिळाली. तर अंजली मराठे यांनी 'ही गुलाबी हवा', 'या चिमण्यांनो', 'नीज माझ्या नंदलाला', 'गुणी बाळ असा', 'माहेरच्या गावा' आणि 'काय बाई सांगू' या गीतांमधून भावसंगीताची विविध रूपे उलगडली. 'सारेच जण' या गीताच्या सादरीकरणात वैभव जोशी आणि डॉ. आशिष मुजुमदार यांचाही सहभाग होता.

कार्यक्रमाला आनंद मास्टे, अरविंद उपाध्ये, ऋग्वेद पांडे, पंकज यादव आणि विक्रम जोशी यांनी साथसंगत केली.

अवीट गोडीची भावगीते, दमदार गायन, सुरेल साथसंगत आणि माहितीपूर्ण निवेदन यामुळे संपूर्ण सभागृहात भावपूर्ण वातावरण निर्माण झाले. अनेक परिचित गीतांनी रसिकांच्या जुन्या आठवणींना उजाळा मिळाला. प्रत्येक लोकप्रिय गीतानंतर मिळणारी टाळ्यांची दाद कार्यक्रमाच्या यशाची साक्ष देत होती.

सप्तकतर्फे विकास लिमये, श्रीकांत देशपांडे, अविनाश चोपडे, नितीन सहस्त्रबुद्धे, विलास मानेकर, प्रमोद कळमकर आणि उदय पाटणकर यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ उदय गुप्ते यांनी केले तर कलाकारांचे स्वागत विलास काळे यांनी केले.

# जयताळा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राला राष्ट्रीय गुणवत्ता मानांकन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागांतर्गत लक्ष्मीनगर झोनमधील जयताळा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राला राष्ट्रीय गुणवत्ता मानांकन (National Quality Assurance Standards – NQAS) प्राप्त झाले आहे. राष्ट्रीय आरोग्य प्रणाली संसाधन केंद्र, नवी दिल्ली यांच्या दि. १ सप्टेंबर २०२६ रोजीच्या अधिकृत निकालानुसार जयताळा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राने ८२.४५ टक्के गुण प्राप्त करत 'Quality Certified' हा दर्जा मिळविला आहे. ही गुणवत्ता मानांकन नागपूर महानगरपालिकेच्या महापौर निता ठाकरे यांच्या प्रोत्साहनात्मक पाठिंब्यामुळे यशस्वीपणे राबविण्यात आली असून, उपमहापौर लीला हाथीबेड, स्थायी समिती सभापती शिवानी दाणी-वखरे, सत्तापक्ष नेते नरेंद्र (बाल्या) बोरकर, वैद्यकीय सेवा व आरोग्य विशेष समितीच्या सभापती मनिषा अतकरे, आयुक्त डॉ. विपीन इटनकर आणि अतिरिक्त आयुक्त अंकित यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपक सेलोकर, अतिरिक्त वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. नरेंद्र बहिरवार यांच्या देखरेखीखाली राबविण्यात आली होती. नागपूर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागांतर्गत यापूर्वी कपिल नगर, शांतिनगर, मानेवाडा, नंदनवन आणि इंदोरा या पाच नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांना राष्ट्रीय गुणवत्ता मानांकन प्राप्त झाले आहे.

आता जयताळा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राचा समावेश झाल्याने नागपूर महानगरपालिकेच्या एकूण ६ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांना NQAS मानांकन प्राप्त झाले आहे. जयताळा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राचे हे यश साध्य करण्यासाठी वैद्यकीय अधिकारी डॉ. विवेकानंद मठपती यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण वैद्यकीय व आरोग्य कर्मचाऱ्यांच्या टीमने सातत्यपूर्ण मेहनत घेतली असून या प्रक्रियेत NUHM च्या शहर कार्यक्रम व्यवस्थापक डॉ. अश्विनी निकम, शहर गुणवत्ता समन्वयक डॉ. राजेश बुरे आणि सार्वजनिक आरोग्य व्यवस्थापक डॉ. चैती हटवार यांनी मार्गदर्शन व समन्वयाची महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

# मोबाइल कॉलद्वारे चालकविरहित वाहन नियंत्रणाचे नवे तंत्रज्ञान

## घर किंवा कार्यालयातूनही वाहनाच्या मिशनचे नियंत्रण करण्याची संकल्पना, आमगावच्या अनिल बरैया यांचा तिसरा पेटंट अर्ज

**दै. सिंहवाणी वृत्त, राजु फुंडे-सालेकसा**

महाराष्ट्रातील गोंदिया जिल्ह्यातील आमगाव येथील रहिवासी अनिल गुलाबचंद बरैया यांनी स्वदेशी तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात आणखी एक महत्त्वपूर्ण पाऊल टाकले असून, आपल्या तिसऱ्या तांत्रिक संशोधनासाठी पेटंट अर्ज दाखल केला आहे. मोबाइल अथवा सेल्युलर व्हॉइस कॉलच्या माध्यमातून स्वायत्त वाहनाच्या मिशनचे नियंत्रण करण्याच्या अभिनव तंत्रज्ञानाशी हा संशोधन प्रकल्प संबंधित आहे.

बरैया यांच्या माहितीनुसार, या तंत्रज्ञानासाठी त्यांनी २० जुलै २०२६ रोजी पेटंट अर्ज दाखल केला असून Application No. 202621088317 असा त्याचा क्रमांक आहे. या आविष्काराचे पेटंट प्रकाशन ४ सप्टेंबर २०२६ रोजी झाले आहे. या तंत्रज्ञानाचे शीर्षक "System Ônd Method for Context-Aware Autonomous Vehicle Mission Generationfrom Cellular Voice Communication" असे आहे.

दूरवरून वाहनाला निर्देश देण्याची अभिनव संकल्पना

या तंत्रज्ञानाची प्रमुख वैशिष्ट्यपूर्ण बाब म्हणजे सेल्युलर व्हॉइस कॉलच्या माध्यमातून दूरवरून वाहनाला आवश्यक निर्देश देता येणे. या संकल्पनेनुसार वाहनात प्रत्यक्ष चालक उपस्थित नसतानाही अधिकृत व्यक्ती घर, कार्यालय किंवा अन्य ठिकाणाहून आवाजाच्या माध्यमातून वाहनाच्या मिशन अथवा संचालनासंबंधी सूचना देऊ शकते.

बरैया यांच्या मते, या तंत्रज्ञानाला केवळ 'चालकविरहित वाहन' असे संबोधणे योग्य ठरणार नाही. या प्रणालीमध्ये वाहनाच्या संचालनाची जबाबदारी पूर्णपणे संपत नसून, चालक किंवा अधिकृत ऑपरेटर वाहनापासून दूर राहून कमांडिंगची भूमिका बजावू



शकतो. निश्चित प्रणाली आणि अधिकृत परवानगीच्या आधारे कुटुंबातील भाऊ, बहीण किंवा अन्य व्यक्तीलाही वाहनाच्या नियंत्रणामध्ये भूमिका बजावता येऊ शकते.

**मेडिकल व्यवसायासोबत स्वदेशी तंत्रज्ञानाचा ध्यास**

अनिल बरैया सध्या माँ वैष्णवी मेडिकल अँड जनरल स्टोर्सचे संचालन करतात. मेडिकल रिटेल व्यवसाय सांभाळतानाच नवनवीन तंत्रज्ञानाच्या संकल्पना विकसित करणे, त्यावर प्रयोग करणे आणि प्रत्यक्ष चाचणीसाठी प्रकल्प तयार करणे हे त्यांच्यासाठी आव्हानात्मक होते. मात्र, या आव्हानांवर मात करत त्यांनी सातत्याने प्रयोग सुरू ठेवले आणि आपल्या संशोधनाला पेटंट प्रक्रियेपर्यंत नेले.

### देशासाठी स्वदेशी तंत्रज्ञान विकसित करण्याचा संकल्प

देशासाठी स्वदेशी तंत्रज्ञान विकसित करणे आणि सातत्याने काहीतरी नवे करण्याचा प्रयत्न करणे हा आपला उद्देश असल्याचे अनिल बरैया यांनी सांगितले. नागरिकांचे आशीर्वाद व सहकार्य मिळत राहावे आणि भविष्यातही देशाच्या प्रगतीसाठी आणखी नवनवीन तांत्रिक प्रकल्प विकसित करता यावेत, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. आमगावसारख्या ग्रामीण भागातून तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात सातत्याने नवे प्रयोग करून पेटंट अर्ज दाखल करणाऱ्या अनिल बरैया यांच्या या प्रयत्नाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

**तीन पेटंट अर्जांची उल्लेखनीय कामगिरी**

अनिल बरैया यांचा हा तिसरा पेटंट अर्ज आहे. यापूर्वी त्यांनी दोन तांत्रिक प्रकल्पांसाठी पेटंट अर्ज दाखल केले आहेत.

पहिला पेटंट :
Application No. 202621001425
दिनांक : 27 फेब्रुवारी 2026
"A Large Scale Digital Clock System (Physics)"

दुसरा पेटंट :
Application No. 202621018969
दिनांक : 10 एप्रिल 2026
"A Music Synchronised Water Fountain and LED Lighting System (Electrical)"

तिसरा पेटंट :
Application No. 202621088317
दिनांक : 20 जुलै 2026
"System and Method for Context-Aware Autonomous Vehicle Mission Generstion from Cellular Voice Communication"

थोडक्यात

## कोदामेंढीत तहकूब झालेली महिला व सर्वसाधारण दोन्ही ग्रामसभा आज

**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**

३१ ऑगस्टला कोरम अभावी तहकूब झालेली ग्रामपंचायत कोदामेंढीची महिला व सर्वसाधारण ग्रामसभा उद्या सोमवार (ता. ७ सप्टेंबर)ला अनुक्रमे सकाळी ११ व दुपारी १२ वाजता घेण्यात येणार आहे. सभेत मागील सभेचे इतिवृत्ताचे वाचन करून कायम करणे, महिला सक्षमीकरणाच्या प्रश्नावर विचार विनिमय करणे, अंगणवाडीच्या आढावा घेणे, महिला बचत गटाच्या आढावा घेऊन मार्गदर्शन करणे, भ्रूण हत्याबाबत मार्गदर्शन करणे, मागील सभेत मंजूर झालेल्या ठरावावर अंमलबजावणी करणे, माहितीच्या अधिकार अधिनियम २००५ बाबत माहिती देणे, विविध विकास कामाची निवड करणे, विविध समिती गठित करणे, व्हीबीजी रामजी योजनेअंतर्गत वैयक्तिक वृक्ष लागवड करणे,अध्यक्षाच्या परवानगीने वेळेवर येणाऱ्या विषयावर चर्चा होणार आहे. तरी या ग्रामसभेला ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आव्हान सोशल मीडियातील ग्रामपंचायत च्या ग्रुपवर ग्रामसभेचे पत्र वायरल करून, गावात दवंडी देऊन ग्रामपंचायत प्रशासनाने केले आहे.

## गॅस रिफिलिंग कंपनीत स्फोट, कामगार गंभीर

### सुरक्षा साधनांचा अभाव अन् व्यवस्थापनाच्या निष्काळजीपणामुळे दुर्घटना

**दै. सिंहवाणी वृत्त, अखिल रोडे - उमरेड**

येथील गो गॅस कंपनीच्या प्लांटमध्ये दोन दिवसांपूर्वी अचानक झालेल्या जोरदार स्फोटात एक कामगार गंभीर जखमी झाला. या अपघातात कामगाराच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली असून त्याला तब्बल ६ टाके पडले आहेत. कंपनीत सुरक्षेचे कोणतेही नियम पाळले जात नसल्याने ही गंभीर दुर्घटना घडल्याचा आरोप केला जात आहे. कंपनीतील कर्मचारी आपल्या समस्या घेऊन शिवसेना (शिंदे गट) पदाधिकाऱ्यांकडे गेले होते. कामगारांच्या तक्रारीनंतर पदाधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष कंपनीत जाऊन परिसराची व प्लांटची पाहणी केली. पाहणीदरम्यान कामगारांना हेल्मेट, हातमोजे किंवा सेफ्टी शूज यांसारखे कोणतेही सुरक्षा किट पुरवले जात नसल्याचे समोर आले. तसेच प्लांटमध्ये योग्य लाईट व्यवस्था नसणे, मशिन्सची वेळेवर देखभाल न करणे आणि कर्मचाऱ्यांचे पेमेंट वेळेवर न देणे अशा अनेक गंभीर समस्या येथे असल्याचे आढळून आले.

या पाहणीदरम्यान शिवसेना उमरेड विधानसभा सचिव दिलीप भाऊ सोनटक्के, उमरेड तालुकाप्रमुख अभिषेक नान्हे, उमरेड शहर प्रमुख सुजित कुरुडकर, युवासेना उपजिल्हाप्रमुख मिथुन माटे, तालुका समन्वयक प्रणय लांजेवार, शिवसेना उपतालुका प्रमुख अखिल रोडे आणि उपशहर प्रमुख सुनील चिचूलकर यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. कामगारांच्या जीवाशी खेळणाऱ्या कंपनी प्रशासनाविरोधात औद्योगिक सुरक्षा विभाग आणि कामगार आयुक्तांकडे कठोर कारवाईची मागणी करण्यात येणार असून जखमी कामगाराला योग्य आर्थिक भरपाई देण्याची मागणी पदाधिकाऱ्यांनी केली आहे.

## बोरी (घिवारी) येथे श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त अंगणवाडीत चिमुकल्यांची वेशभूषा स्पर्धा



**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**

श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या निमित्ताने बोरी (घिवारी) येथील अंगणवाडी केंद्रात चिमुकल्यांचे वेषभूषा स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. स्पर्धेत बालकृष्ण, राधा रूपात सजलेल्या चिमुकल्यांनी सर्वांची मने जिंकली. त्या निरागस चेहऱ्यांवरील हास्य, छोट्या-छोट्या पावलांतील उत्साह आणि संस्कृतीची सुंदर झलक या स्पर्धेत दिसत होती. चिमुकल्यांच्या या निरागस रूपातून आपल्या संस्कृती, संस्कार आणि परंपरांची सुंदर ओळख पुढच्या पिढीपर्यंत पोहोचते, हीच या कार्यक्रमाची खरी सुंदरता! या सुंदर उपक्रमात मुख्याध्यापक लोकेश प्रतेके, शाळा समिती उपाध्यक्ष कैलास झलके, अगंवाडी सेविका दामिनी तिजारे, मदतनीस प्रतिमा मेश्राम, आरोग्यसेविका निशा तायडे, आरोग्य सहाय्यक वैद्य, आशा सेविका रंजना चवळे, शाळा मदतनीस अनिता मडावी उपस्थित होते.

## पीएम श्री जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा दहेगाव येथे शिक्षक दिन व दहीहंडीचा कार्यक्रम

**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**

डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जन्मदिवस हा शिक्षक दिन म्हणून मोठा थाटामाटात साजरा करण्यात येतो. पीएम श्री जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा दहेगाव येथे आजच्या दिवशी विद्यार्थ्यांना



स्वयंशासन या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी शिक्षक बनुन अध्यापनाचे कार्य केले. आजच्या दिवशी शाळेच्या मुख्याध्यापक म्हणून कुमारी अवनी श्रीकृष्ण आंबिलढुके या विद्यार्थीनींनी मुख्याध्यापक पदाचा कार्यभार उत्कृष्टपणे पार पडला. सुरुवातीला डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन करून शाळेचे मुख्याध्यापक वासुदेव भुते यानी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जीवन चरित्रावर आधारित विद्यार्थ्यांना माहिती सांगितली. डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिवस शिक्षक दिन म्हणून का साजरा करण्यात येतो याची सर्व माहिती विद्यार्थ्यांना सांगितले . या कार्यक्रमाचे संचालन शिक्षक सुधीर कांबळे यांनी केले. यानंतर याप्रसंगी विद्यार्थ्यांनी श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त विद्यार्थ्यांनी विविध नृत्य केले,दहीहंडी फोडण्यात आली. विद्यार्थ्यांना काला देण्यात आला. दोन्ही कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षकवृंद सुधीर खंडाईत, सुधीर कांबळे, राजेश रोहाड,सुजाता बोधले, प्रज्ञा रामटेके,संगीता कारेमोरे मॅडम, ज्योती आंबिलढुके, उमेश उके, पुष्प लता उके, यांनी विशेष सहकार्य केले. या कार्यक्रमाचे आभार शिक्षक राजेश रोहाड यांनी केले.

# 'मारबत महोत्सवाला' प्रारंभ

## मंत्री आशिष शेलार यांच्या हस्ते काळी व पिवळी मारबतची विधिवत पूजा

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूरची पारंपारिक, सांस्कृतिक व ऐतिहासिक ओळख असणाऱ्या 'मारबत महोत्सवाला' राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर घेऊन जाण्यासाठी नागपूर महानगरपालिका प्रयत्नशील असून, मारबत महोत्सवाला रविवार (ता.०६) पासून प्रारंभ झाला आहे. राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांच्या हस्ते भाविकांची श्रद्धा असलेल्या काळी व पिवळी मारबत यांची विधिवत पूजा करण्यात आली. मारबत महोत्सव येत्या शुक्रवार ११ सप्टेंबर रोजी आयोजित केले जाणार आहे.

यांप्रसंगी महापौर निता ठाकरे, स्थायी समिती सभापती शिवानी दाणी-वखरे, पोलीस आयुक्त विश्वास नांगरे पाटील, मनपा आयुक्त डॉ. विपीन, सह पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, अतिरिक्त पोलीस आयुक्त राजेंद्र दाभाडे, क्रीडा विशेष समिती सभापती दर्शनी धवड, विधी विशेष समिती सभापती कु. निधी तेलगोटे, ज्येष्ठ नगरसेवक आभा पांडे, सतरंजीपुरा झोन सभापती अभिरुची राजगिरे, गांधीबाग झोन सभापती उमा देशमुख, मनपाचे अतिरिक्त आयुक्त अंकित, अपर पोलीस आयुक्त विनीता साहू, पोलिस उपायुक्त संदीप पाखले, पोलिस उपायुक्त राहुल माखनीकर, आदित्य मिरखेलकर, मनपाचे अतिरिक्त





आयुक्त मिलिंद मेश्राम, नगरसेवक तुषार लारोकर, रेखा निमजे, नगरसेविका चेतना निमजे, कल्पना शर्मा, स्वीटी भिसीकर, रामभाऊ आंबुलकर, संजय अवचट, हेमंत बरडे, श्रीकांत आगलावे, कल्पक भानारकर, सहायक आयुक्त हरीश राऊत, अनिकेत धोपट मनपाचे क्रीडा अधिकारी डॉ. पियुष आंबुलकर उपस्थित होते. तदनंतर हेरिटेज वॉकचे आयोजन करण्यात आले.

**जनतेचा सहभाग असणाऱ्या परंपरेचे जतन करणार : आशिष शेलार**

यावेळी बोलतांना आशिष शेलार म्हणाले की, नागपूरच्या मारबत उत्सवाला १४५ वर्षांची प्रदीर्घ ऐतिहासिक परंपरा लाभलेली आहे. इडा, पिडा, अनिष्ट प्रथा,परंपरा, रोगराई घेऊन जागे मारबत असे म्हणत अनिष्ट गोष्टींना तीरांजली वहिल्या जाते, ही समाजासाठी उत्तम बाब आहे. मारबत सारख्या इतर उत्सवात ज्यात जनतेचा मोठ्या प्रमाणात सहभाग असतो अशा, पारंपारिक उत्सावांचे जतन, संवर्धन, प्रचार व प्रसार करण्याचा राज्याच्या सांस्कृतिक कार्य विभागाचा मानस असल्याचे आशिष शेलार यांनी सांगितले.

**मारबत पाहण्यासाठी कोणतेही तिकीट नाही**

शिवानी दाणी वखरे यांनी स्पष्ट केले की, नागपूर महानगरपालिका मारबत पाहण्यासाठी कोणतेही तिकीट विक्री करत नाही. नागरिकांना मारबतच्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारशाशी जोडण्यासाठी मनपाकडून जनजागृती व प्रचार-प्रसार करण्यात येत आहे. दरम्यान, मारबतच्या निमित्ताने मारबत महोत्सवाचेचे छायाचित्र/नाव मुद्रित असलेले टी-शर्ट आणि बँड उपलब्ध करून देण्यात आले आहेत. इच्छुक नागरिकांना हे टी-शर्ट व बँड घेता येणार असून, हे पूर्णपणे ऐच्छिक आहे.

विशेष म्हणजे, टी-शर्ट अथवा बँड खरेदीचा मारबत पाहण्यासाठीच्या प्रवेशाशी कोणताही संबंध नाही. मारबत महोत्सव हा नागपूरच्या सांस्कृतिक ओळखीचा आणि परंपरेचा महत्त्वपूर्ण भाग आहे. त्यामुळे नागरिकांनी सोशल मीडियावर प्रसारित होणाऱ्या अपुऱ्या किंवा चुकीच्या माहितींवर विश्वास न ठेवता, नागपूर महानगरपालिकेच्या अधिकृत माध्यमांवर उपलब्ध माहितीलाच प्राधान्य द्यावे, असे आवाहन मनपाच्या वतीने करण्यात आले आहे.

**शहराची अनिष्ट व वाईट प्रवृत्ती घेऊन जा गे मारबत: महापौर निता ठाकरे**

महापौर निता ठाकरे यांनी सांगितले की, "मारबत व बडग्या म्हणजे केवळ सण नसून समाजातील अनिष्ट, वाईट गोष्टी आणि संकटे दूर करून शहराला प्रगतीच्या अधिक उंचीवर घेऊन जाण्याचे हे प्रतीक आहे. पोलीस विभाग आणि महानगरपालिका उत्तम समन्वयाने काम करत असून, यंदाचा हा महोत्सव नागपूरच्या वैभवात भर घालणारा ठरत आहे." समाजात वाईटाचा बिमोड करून सकारात्मक ऊर्जा निर्माण करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

**आयोजनाचे विशेष प्रयत्न**

दरवर्षीप्रमाणे यंदाही पिवळी मारबतचे आयोजन तऱ्हाने तेली समाज व काळी मारबतचे आयोजन काली मारबत उत्सव समितीच्या वतीने केले जात आहे. राष्टीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर घेऊन जाण्यासाठी मारबत व बडग्या महोत्सवाची तयारी केल्या जात आहे. याचाच एक भाग म्हणून, विविध राष्ट्राचे प्रतिनिधी, ख्यातनाम व्यक्ती व मराठी व हिंदी सिनेसृष्टीतील सिनेअभिनेता, अभिनेत्री यांना विशेष आमंत्रित केले जात आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, राज्य मंत्री आशिष जैस्वाल यांच्यासह सर्व खासदार, आमदार यांना देखील आमंत्रित केले जात आहे.

**विशेष सत्कार व हेरिटेज वॉक**

मारबत महोत्सवाचे औचित्य साधून नागपूरच्या सांस्कृतिक व ऐतिहासिक वारशाचा प्रसार करण्यासाठी विशेष हेरिटेज वॉक काढण्यात आला. या हेरिटेज वॉकचे यशस्वी नेतृत्व व सहकार्य करणाऱ्या मंदिरा नेवारे यांचा विशेष सत्कार करण्यात आला. तसेच, बाडग्यावर विशेष अभ्यास करून 'आचार्य'(पीएचडी) पदवी प्राप्त केल्याबद्दल राहुल जांभूळकर यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. काळी मारबत मंदिरापासून या हेरीटेज वॉकची सुरुवात झाली. यावेळी सहभागी नागरिकांना काळी मारबतचे दर्शन तसेच तिचा ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा याबाबत माहिती देण्यात आली. त्यानंतर हेरिटेज वॉक दरम्यान पिवळी मारबतकडे जाताना आर्किटेक्ट मंदिरा नेवारे यांनी मार्गातील विविध ऐतिहासिक संदर्भ आणि मारबत परंपरेचा इतिहास सहभागी नागरिकांना समजावून सांगितला. पिवळी मारबत येथे पोहोचल्यानंतर तिचा इतिहास, परंपरा आणि मारबतला ओटी भरणे, पूजा करण्यामागील श्रद्धा व महत्त्व याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली.

**मारबत मार्गाची पोलीस व मनपा प्रशासनाची संयुक्त पाहणी**

नेहरूपुतळा चौक ते पिवळी मारबत चौक दरम्यानच्या मागार्ची महापौर निता ठाकरे, पोलीस आयुक्त विश्वास नांगरे पाटील व मनपा आयुक्त डॉ.विपीन यांच्या मार्गदर्शनात पोलीस व मनपा प्रशासनाने संयुक्त पाहणी केली.

## चंद्रशेखर बावनकुळे यांचा राजस्थानात झंझावात!

### दहा महापालिकांच्या निवडणूक व्यवस्थापनात दमदार कामगिरी

**मुख्यमंत्री भजनलाल शर्मा यांच्यासह राज्यातील मंत्री, केंद्रीय मंत्री व लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्यासमवेत समन्वय, महाराष्ट्रातील आमदार, पदाधिकाऱ्यांची विजयी रणनीती**

**दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई**

महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आणि महापालिका निवडणुकांमधील अभूतपूर्व यशाचा अनुभव पाठीशी असलेले महाराष्ट्राचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी राजस्थानातील आगामी महापालिका निवडणुकांच्या रिंगणात भाजपसाठी जबरदस्त मोचार्बांधणी सुरू केली आहे. भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन यांनी बावनकुळे यांची राजस्थान महापालिका निवडणुकीच्या सहप्रभारीपदी नियुक्ती केली असून, गेल्या १५ दिवसांपासून ते राजस्थानमधील जयपूर, कोटा, भरतपूर, जोधपूर, उदयपूर, अजमेर, पाली, बिकानेर, भिलवाडा आणि अलवर या दहाही महत्त्वाच्या महापालिकांचा दौरा करून निवडणूक व्यवस्थापन आणि प्रचार मोहिमेचे संचालन करत आहेत. या संपूर्ण दौऱ्यात बावनकुळे यांनी राजस्थानचे मुख्यमंत्री भजनलाल शर्मा, केंद्रीय मंत्री, लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला आणि राज्यातील वरिष्ठ नेत्यांशी नियमित समन्वय साधत भाजपच्या विजयाची रणनीती आखली आहे.

बावनकुळे यांनी राजस्थानात रहिवासी असलेल्या महाराष्ट्रजनांच्या भेटी घेतल्या. त्यांनी अतिशय आत्मीयतेने स्वागत केले. याचबरोबर त्यांनी विविध संस्थांचे प्रमुख, महत्वाचे राजकीय विश्लेषक, व्यावसायिक, व्यापारी, शैक्षणिक प्रमुख, पत्रकार, युवा समूहासोबत चर्चा केली. जनतेचे प्रश्न समजून घेतले. त्याप्रमाणे कार्यकर्त्यांना सूचना केल्या. प्रचारादरम्यान मुख्यमंत्री भजनलाल शर्मा, लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्यासह राजस्थानमधील केंद्रीय मंत्र्यांसोबत नियमित संवाद साधत आहेत. राजस्थानमधील मंत्री, भाजपा आमदार, पदाधिकारी, कार्यकर्ते, व्यावसायिक यांच्यासोबत त्यांचा सुरू असलेला संवाद भाजपाला निवडणुकीत विजयाची हमी देत असल्याची भावना चंद्रशेखर बावनकुळे यांची आहे.

कोअर कमिटी बैठक, प्रचार सभा आणि धार्मिक दर्शनावर भर दिला जात आहे. बिकानेर येथील या बैठकीला केंद्रीय कायदेमंत्री अर्जुनराम मेघवाल, महाराष्ट्राचे माजी मंत्री कृपाशंकर सिंह उपस्थित होते. जयपूर येथे संघटन बैठक आणि प्रतिष्ठित नागरिकांशी संवाद साधला. भाजपचे राष्ट्रीय संघटन महामंत्री बी. एल. संतोष यांच्या प्रमुख उपस्थितीत उच्चस्तरीय संघटनात्मक बैठक



पार पडली. यामध्ये बावनकुळे यांनी महाराष्ट्रातील रणनीतीचा पॅटर्न मांडला.

या बैठकीला भाजप प्रदेशाध्यक्ष मदन राठोड, प्रदेश प्रभारी राधामोहनदास, राष्ट्रीय महामंत्री हरीश द्विवेदी, राष्ट्रीय महामंत्री खा. गजेंद्रसिंह पटेल, राष्ट्रीय मंत्री खा. संगीता यादव, राष्ट्रीय मंत्री रोहन गुप्ता, दिल्ली सरकारमधील मंत्री रवींद्र इंद्राज सिंह उपस्थित होते. कोटा येथे लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांची भेट व प्रचार कार्यालयाचे उद्घाटन केले. आमदार श्रीकांत भारतीय यांच्यासह ठाणे भाजपा अध्यक्ष संदीप लेले, देवांग दवे, अमित चव्हाण, रवींद्र साळेगावकर, अमित जाधव, अक्षय फाटक, राजेंद्र शिळीमकर हे उपस्थित होते.

## सूरज चव्हाण झाला बाबा!; घरात चिमुकल्या परीचे आगमन

**मुंबई :** बिग बॉस मराठी ५चा विजेता आणि झापूक झुपूक या नावाने घराघरांत पोहोचलेला सूरज चव्हाण आता बाबा झाला आहे. सूरज आणि त्याची पत्नी संजना यांच्या आयुष्यात एका गोंडस लेकीचं आगमन झालं आहे. जन्माष्टमीच्या खास दिवशी त्यांच्या घरी कन्यारत्नाचा जन्म झाल्याने चव्हाण कुटुंबाचा आनंद द्विगुणित झाला आहे. लेकीच्या जन्माची बातमी समोर येताच सूरजच्या चाहत्यांनी सोशल मीडियावर शुभेच्छांचा वर्षाव सुरू केला आहे.सूरज चव्हाण आणि संजना यांचा विवाह डिसेंबर २०२५ मध्ये झाला होता. लग्नानंतर काही महिन्यांतच त्यांच्या घरी नव्या पाहुण्याचं आगमन होणार असल्याच्या चर्चा रंगू लागल्या होत्या. अभिनेत्री जान्हवी किल्लेकरने संजनाच्या चोर ओटीचा व्हीडीओ शेअर केल्यानंतर या चर्चांना आणखी उधाण आलं होतं. त्यानंतर सूरज आणि संजनाने स्वतः चाहत्यांसोबत ही गोड बातमी शेअर करत लवकरच त्यांच्या आयुष्यात चिमुकला पाहुणा येणार असल्याचं सांगितलं होतं.

गर्भावस्थेदरम्यान संजनाचे बेबी बंपसोबतचे अनेक व्हीडीओ सोशल मीडियावर चर्चेत आले होते. काही दिवसांपूर्वी तिचं डोहाळे जेवणही मोठ्या उत्साहात पार पडलं. या कार्यक्रमाच्या आयोजनात जान्हवी किल्लेकरने विशेष पुढाकार घेतला होता. कुटुंबीय आणि जवळच्या व्यक्तींच्या उपस्थितीत हा सोहळा थाटात पार पडला होता. लेकीच्या जन्मानंतर सूरज चव्हाणचा रुग्णालयातील पहिला व्हीडीओ सोशल मीडियावर समोर आला आहे. सूरजच्या एका चाहत्याने हा व्हीडीओ शेअर केला असून तो सध्या मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. आपल्या लेकीला आणि पत्नीला भेटण्यासाठी सूरज रुग्णालयात पोहोचल्याचं व्हीडीओमध्ये दिसतं. सूरजला पाहण्यासाठी आणि नवजात बाळाची झलक पाहण्यासाठी रुग्णालयातील स्टाफसह चाहत्यांचीही गर्दी झाल्याचं व्हीडीओत पाहायला मिळतं.

## सणोत्सवाच्या पार्श्वभूमीवर जलालखेड्यात पोलिसांचा रूट मार्च

### दंगा नियंत्रणाची रंगीत तालीम; कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी नागपूर ग्रामीण पोलीस सज्ज

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

आगामी सणोत्सवाच्या पार्श्वभूमीवर जलालखेडा शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण व्हावी आणि कोणत्याही अनुचित प्रकाराला वेळीच आळा घालता यावा, यासाठी नागपूर ग्रामीण पोलिसांकडून जलालखेडा शहरात रूट मार्च काढण्यात आला. यावेळी दंगा नियंत्रणाच्या विविध उपाययोजनांची रंगीत तालीम घेऊन पोलिस दलाने आपली सज्जता दाखवून दिली.



जलालखेडा शहरात रूट मार्च काढताना पोलीस अधिकारी, कर्मचारी, दंगा नियंत्रण पथक व होमगार्ड जवान.

पोलिस निरीक्षक विनोद जांभळे यांच्या नेतृत्वाखाली जलालखेडा पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी, दंगा नियंत्रण पथक तसेच होमगार्ड जवानांनी रूट मार्चमध्ये सहभाग घेतला. शहरातील मुख्य रस्ता, बाजार चौक, बाजार लाईन, बसस्थानक परिसर तसेच संवेदनशील आणि महत्त्वाच्या ठिकाणांमधून पोलिसांचे संचलन करण्यात आले. पोलिसांचा मोठा ताफा रस्त्यावरून मार्गक्रमण करताना दिसल्याने नागरिकांचे लक्ष वेधले गेले.

सणोत्सवाच्या काळात मोठ्या प्रमाणात नागरिकांची गर्दी होत असते. त्यामुळे गर्दीचे नियोजन, वाहतूक नियंत्रण, संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवणे, संवेदनशील भागात गस्त वाढविणे तसेच अचानक उद्भवणाऱ्या परिस्थितीवर तातडीने नियंत्रण मिळविण्याच्या दृष्टीने पोलिस प्रशासनाने तयारी केली आहे. रूट मार्चनंतर दंगा नियंत्रणाची रंगीत तालीम घेण्यात आली. जमाव नियंत्रण, परिस्थिती चिघळल्यास तातडीने प्रतिसाद देणे, पोलिस पथकांची हालचाल, नागरिकांना सुरक्षित मार्ग उपलब्ध करून देणे आणि आपत्कालीन परिस्थितीत कायदा व सुव्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी आवश्यक उपाययोजनांचा यावेळी सराव करण्यात आला.

सणोत्सवाच्या काळात सोशल मीडियावरून अफवा, चुकीचे संदेश किंवा समाजात तेढ निर्माण करणाऱ्या पोस्ट प्रसारित होण्याची शक्यता लक्षात घेता पोलिसांकडून अशा प्रकारच्या हालचालींवरही लक्ष ठेवण्यात येणार आहे. नागरिकांनी कोणतीही अप्रमाणित माहिती पुढे पाठवू नये तसेच अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन पोलिस प्रशासनाने केले आहे. सण-उत्सव शांततेत पार पाडण्यासाठी नागरिक, व्यापारी, सामाजिक संघटना, मंडळांचे पदाधिकारी आणि सर्व समाजघटकांनी पोलिस प्रशासनाला सहकार्य करावे. कायदा हातात घेणाऱ्या किंवा शांतता भंग करण्याचा प्रयत्न करणाऱ्या व्यक्तींवर कठोर कारवाई केली जाईल, असा इशाराही पोलिस प्रशासनाकडून देण्यात आला आहे.

आगामी सणोत्सव शांततामय, सुरक्षित आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडावा, यासाठी नागपूर ग्रामीण पोलीस दल पूर्णपणे सज्ज असून नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देण्यात येत असल्याचे पोलिस निरीक्षक विनोद जांभळे यांनी सांगितले.

# डोंगरी देवस्थान...

कुंदन खोब्रागडे
नागभीड

डोंगरी म्हटलं की छोटे छोटे पहाड, एकदमच छोट्या छोट्या पहाडांनी तयार झालेले टेकडी, इकडे तिकडे अस्ताव्यस्त पडलेले मोठमोठाले दगड, वर चढायला अगदीच अरुंद व अडचणीची वाट, ओरबडलेला रस्ता, जिकडे तिकडे उंचच उंच वाढलेली झाडे असे एकंदरीत दृश्य आपल्या डोळ्यासमोर उभे राहते. अशाच एका छोट्या डोंगरी पण श्री दत्तप्रभूंच्या देवस्थानाबद्दल मी आज थोडक्यात तुम्हाला माहिती देणार आहे.

चंद्रपूर जिल्ह्यातील सिंदेवाही तालुक्यात अगदी शेवटच्या टोकावर बसलेले नवरगाव या गावात कधी मुक्कामाने थांबल्यास पहाटे पहाटे नगाळा आणि घंटीचा आवाज ऐकू येतो. हा आवाज नवरगाव आणि नैनपुर या दोन गावाच्या मधोमध बसलेले महानुभावांचे दुसरे अवतार श्री दत्तात्रेय प्रभू महाराज यांच्या देवस्थानचा (डोंगरी) असतो. नवरगावची डोंगरी असे त्या देवस्थानची प्रचिती. पंचक्रोशीत प्रसिद्ध असलेले हे स्थळ अगदीच रमणीय आहे. निसर्गाची एक वेगळीच आणि आकर्षित कृपादृष्टी इथे लाभलेली आहे. छोटासाच पण पहाळी भाग, त्यात उंचावर बसलेले मंदिर, आजूबाजूला छोट्या आणि मोठ्या झाडांनी लावलेली हजेरी, त्यांच्या बाजूलाच मोठ्या मोठ्या दगळाची छोटी डोंगरे, त्यासमोर लाभलेले दूरवरचे हिरवेगार शेत, थोड्याच अंतरावर छान सुंदर असा छोटा तलाव, बाजूला जंगल लागून असल्याने कधी पट्टेदार वाघ तर कधी बिबट्या व इतर छोट्या मोठ्या जनावरांचे दर्शन या परिसरात घडत असते. मंदिरातून दिसणाऱ्या परिसराचा एकूणच हा देखावा मनाला अगदीच आल्हाददायक सुकून देतो. जवळपास ३०-४० पायऱ्या चढून श्री. प्रभूंच्या दर्शनासाठी मंदिरात जावे लागते. त्यात पायऱ्यांच्या दोन्ही बाजूने लावलेली झाडे मनाला प्रफुल्लित करीत असल्याने पायऱ्या चढताना मनाला नवीन ऊर्जा मिळत असते. खरे बघितले तर नवरगाव या गावाला खूप मोठा ऐतिहासिक, सांस्कृतिक, राजकीय, शैक्षणिक, धार्मिक वारसा लाभलेला आहे. इथे खूप वर्षा आधीपासून बाजार भरतो आणि ही बाजारपेठ संपूर्ण पंचक्रोशीत नावाजलेली आहे यामध्ये भाजीपाल्यांची बाजारपेठ असो किंवा बैलांचा बाजार असो जवळपासच्या पाच ते सहा तालुक्यातील संपूर्ण उत्साही मंडळी या बाजाराला दर गुरुवारी न चुकता येत असते. मुख्य म्हणजे ही बाजारपेठ आजही दर गुरुवारी नित्यनेमाने भरत असते. एवढेच काय तर याच नवरगाव मध्ये अतिशय कठीण काळात म्हणजेच स्वतंत्र भारताच्या सुरुवातीपासूनच वंदनीय श्री बालाजी पाटील बोरकर यांनी भारत विद्यालयाची स्थापना करून शिक्षणाची सुरुवात केली आणि खेडेगावातील गरीब गरजू मुलांना शिक्षणाची दारे खुले करून दिली. या शाळेनेच कितीतरी मुलांना सुशिक्षित केले. या शाळेतूनच शिक्षण घेत कितीतरी गरीब घरची मुले अगदी चपरासी पदापासून ते डॉक्टर, इंजिनियर, शिक्षक, क्लास वन अधिकारी अशा मोठ्या पदावर रुजू झालीत. शिक्षण क्षेत्रात आजच्या युगाबरोबर अगदी प्री-प्रायमरी पासून ते पदवी आणि पदवीधर आणि चित्रकला महाविद्यालय अश्या उचशिक्षणाची सोय आता इथे आहे. सन २०२२ चा गोंडवाना विद्यापीठाचा उत्कृष्ट महाविद्यालयाचा पुरस्कार आमच्या नवरगाव येथील ज्ञानेश महाविद्यालयाला मिळाला आहे. विविध कला आमच्या नवरगाव या गावाने जोपासल्या आहेत. ज्यामध्ये नाट्यकला, लोककला, हस्तकला, वादन, गायक, या कला आजही जोपासल्या जात आहेत. महाराष्ट्रामध्ये क्वचितच आढळणारा नाटकाचा फिरता रंगमंच आमच्या नवरगाव येथे पहावयास मिळतो. एकाच नाटकाचे शंभराहून अधिक प्रयोग झालेल्या नाटकाचे लेखक, दिग्दर्शक तसेच कलावंत आदरणीय प्रा.सदानंद बोरकर सर हे सुद्धा आमच्या नवरगावचेच. आमच्या डोंगरी लगतच्या (बांधाच्या) तलावाजवळ आणि आणि नवरगावातील परिसरात "ताटवा" या मराठी चित्रपटाचे शूटिंग करून चित्रपट सन २०१७ मध्ये प्रदर्शित झालेला आहे. या शूटिंग दरम्यान अनेक मराठी अभिनेत्यांनी इथे हजेरी लावली होती. ३ जून २०२२ रोजी प्रदर्शित झालेला "झॉलीवूड" या चित्रपटाचे शूटिंग नवरगाव पासून अवघ्या १५-२० किमी अंतरावरील सिंदेवाहीच्या परिसरात झाले आहे. यामुळे अनेक नाट्य कलावंतांना जन्म देणारी जन्मभूमी तसेच झाडीपट्टी रंगभूमी असा नवरगावचा उल्लेख केला जातो.

सन १९६५ मध्ये महानुभाव पंथीय अस्पृश्य संघाचे अधिवेशन नवरगाव इथे स्व. डॉ. टी.वी. गेडाम साहेब यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आले होते. असे आमच्या नवरगावची एक वेगळीच ओळख फक्त चंद्रपूर जिल्ह्यापुरतीच नव्हे तर संबंध महाराष्ट्रात आणि देशभरात आहे. आता तुम्ही विचार कराल की नेमके हे नवरगाव आहे तरी कुठे? याबाबतचाही खुलासा मी इथे करणार आहे चंद्रपूर आणि नागपूर या दोन्ही मोठ्या शहरातपासून अगदी १२०-१३० किलोमीटर अंतरावर वसलेले हे गाव. या गावांमध्ये येण्याकरिता बसची सुविधा उपलब्ध आहे, एवढेच नाही तर अवघ्या पंधरा ते वीस किलोमीटर अंतरावर असलेल्या सिंदेवाही या तालुक्याच्या ठिकाणी रेल्वे स्टेशनची सुद्धा व्यवस्था आहे. नागपूर-उमरेड-भिवापूर-नागभीड-तळोधी-चिखलगाव असा प्रवास केल्यावर तिथून पश्चिमेस अवघ्या पाच किलोमीटर अंतरावर नवरगाव या गावी पोहोचता येते. तसेच नागपूर-उमरेड-भीसी-चिमूर-नेरी असा प्रवास करीत नेरी वरून पूर्वेस ३० ते ३५ किलोमीटर अंतरावर नवरगाव हे गाव आहे. अशा या इतिहासाने नटलेल्या व विविध उपक्रम गाजविलेल्या नवरगाव या गावात अगदी एक किलोमीटर अंतरावर आमचे श्री दत्त देवस्थान डोंगरी वसलेले आहे.

या डोंगरी देवस्थानच्या इतिहासाबद्दल मला मिळालेल्या माहितीप्रमाणे शेकडो वर्षाआधी झुडपी जंगलाने वेढलेला या भागात एक म्हातारी म्हणजेच डेमाबाई इथे एक झोपडी करून राहत होती. ओली भिक्षा करून ती आपले जीवन कसेबसे जगात होती. डेमाबाईची डोंगरी या नावाने ही टेकडी प्रसिद्ध होती. जवळच पेंढरीचे जंगल वाघाकरिता असल्याने नेहमी इथे जंगली जनावरांचा वावर असायचा. आजही पेंढरीचे जंगल वाघाकरिता प्रसिद्ध आहे. त्यावेळेस नवरगाव येथील काही मंडळी जेवण-भजन घेऊन दसऱ्याच्या (विजनवासाच्या) निमित्याने त्या डेमाबाईच्या झोपडीच्या आजूबाजूला जात असतं. त्यानंतर कालांतराने त्या ठीकाणी एक छोटासा ओठा तयार करून त्यात श्री. दत्त प्रभूंच्या विषेशांची मांडणी करून त्या ठिकाणी भाविक मंडळींसाठी सार्वजनिक माथा टेकविण्याची सोय केली. आजूबाजूच्या परिसरातील लोकांचे इथे देवदर्शनासाठी येणे सुरू झाले. तसेच प.पू.प.म.ई. पद्मनाभी बाबा हे इतर महंतांना इथे बोलवायचे, लोकांना मार्गदर्शन करायचे. बाहेरून आलेल्या महंतांच्या पोथ्या इथे तसेच परिसरात सुरु झाल्या. नंतर त्या ओट्यावर एक कवेलू झोपडी उभारण्यात आली. आणि श्री दत्त प्रभूंचे स्थान लोकांना कळू लागले. याठिकाणी लोकांचे येणे जाणे सुरू होते, अनेक वर्ष लोटून गेल्यावर, सन १९८७ च्या दरम्यान आर्थिक लोकवर्गणी व श्रमदानतून त्या कवेलु झोपडीचे मंदिरात रूपांतर करण्यात आले आणि डेमाबाईच्या डोंगरीचे श्री दत्त देवस्थान डोंगरी असे नामांतर झाले.

सुरवातीला कुठलीही सोय नसलेल्या या डोंगरी देवस्थानात आधुनिक युगाबरोबर अनेक सोयी सुविधा उपलब्ध आहेत. ज्यामध्ये मुख्यतः राहण्याची व जेवणाची सुविधा, पिण्याच्या पाण्याची सुविधा, स्वयंपाक गृह, येणाऱ्या जाणाऱ्याकरिता सुव्यवस्थित रस्ता, इलेक्ट्रिसिटी अशा अनेक आवश्यक त्या सर्व सोयी सुविधा इथे उपलब्ध आहेत. तुम्हाला सांगतो, मी लहान असताना म्हणजेच पंचवीस तीस वर्षाआधी अशी फारशी व्यवस्था सोयीसुविधा इथे नव्हत्या. आता हेच बघा ना मंदिरात चढून जाण्याकरिता इथे पायऱ्यांची व्यवस्था आहे, त्यावेळेस ही व्यवस्था नव्हती अगदी दगड माती तुडवीत खाचाखडग्यात पाय रोवित वर चढावं लागत होतं, पण खरं सांगू त्यात सुद्धा एक वेगळीच मजा असायची. आधी गाडी-सायकल खाली(मंदिराच्या पायथ्याशी) ठेवून पायी मंदिरात जावे लागायचे, आता तसं नाही सरळ गाडीच वरती घेऊन मंदिराच्या दारापर्यंत जाता येतं. एवढेच काय पिण्याच्या पाण्याची सुद्धा अशीच बोंब होती. अगदी मंदिराच्या पायथ्याशी शेतात गोड पाण्याची विहीर होती. गुंड/घागर अथवा कावड घेऊन पिण्याचे पाणी भरावे लागायचे. समजा कुणाला मंदिरामध्ये जेवण (पंगत) द्यायची असेल तर त्याला सकाळी पहाटेपासूनच काही बाया-माणसे लावून पिण्याचे पाणी, जळावू लाकडं असं जेवणाची सर्व साधनसामुग्री जमा करावी लागत असे. आता तसं काही राहिलं नाही मोटार लावल्याने सरळ वर मंदिरात पिण्याचे पाणी आणि इतर वापरासाठी सुद्धा पाणी मिळते. नळाची सिस्टम उपलब्ध आहे.

आमच्या लहानपणी व त्याआधी आजूबाजूचे लोक बैलबंडी/ रेंगीने इथे यायचे. रस्ता बरोबर नसल्याने व वाहनांची कमतरता असल्यामुळे मंदिरात नवरगांवरून पायी जाण्याशिवाय पर्याय उरत नव्हता, परंतु आता रस्ता व्यवस्थित झाल्याने व वाहनांची उपलब्धता असल्याने मंदिरात जाणे अगदीच सोयीचे झाले आहे. आधी सोयी सुविधा कमी असल्याने साधुसंतांना म्हातार वयात तिथे थांबणे कठीणच व्हायचे, त्यामुळे मंदिरात फारसे एक दोन महंत सोडले तर वास्तव्यास कुणीच नसायचे परंतु आता तसे नाही, सर्व सोयी सुविधा उपलब्ध असल्याने आमच्या या डोंगरी देवस्थानात अनेक साधुसंत महंत व भावीक तिथे वास्तव्यास असतात. त्यांच्या वास्तव्यास असन्याने व निरंतर भक्तीने तिथले वातावरण अगदी भक्तीमय झालेले असते. ज्याप्रमाणे नकारात्मक गोष्टींवर सकारात्मक विचार विजय मिळवतात अगदी त्याचप्रमाणे मलीन झालेल्या मनाला इथे प्रभूच्या मंदिरात व महानतांच्या सहवासात मन अगदी प्रफुलीत होऊन जातं.

आमच्या या डोंगरी देवस्थानाला पर्यटनाचा 'क' दर्जा मिळालेला आहे. तीर्थक्षेत्र विकास निधी अंतर्गत आमच्या या मंदिरास निधी उपलब्ध होत असतो. म्हणूनच दिवसेंदिवस इथे विविध विकासाची कामे होत आहेत. तसेच महानुभाव पंथाचा प्रचार व प्रसार करण्याकरिता आमच्या डोंगरी देवस्थानचे सर्व पदाधिकारी नेहमी तत्पर असतात. महानुभाव पंथाच्या नवतरुणांना व तरुणींना योग्य जोडीदार मिळावा या हेतूने फेब्रुवारी २००६ मध्ये "महानुभाव पंथीय वधु वर परिचय मेळाव्याची" सुरुवात करण्यात आली. त्यानंतर हा वधु वर परिचय मेळावा वेगवेगळ्या तालुक्यातील वेगवेगळ्या गावांमध्ये घेण्यात आला. ही परंपरा आजही सुरू आहे. कुटी प्रवचन, पोथी प्रवचन, प्रसाद वंदन असे अनेक प्रवचनाचे आयोजन इथे केल्या जाते. तसेच 'न-पाळते' (नवरात्री) मध्ये ९ दिवस निरंतर पोथी-प्रवचनाचा व प्रसाद वंदणाचा कार्यक्रम मागील ४-५ वर्षापासून इथे राबविला जातो. त्यानिमित्ताने अनेक महंतांचे मार्गदर्शन आणि साधक विचार सद्भविकांना लाभत असतात. त्याचप्रमाणे श्री. ज्ञानेश महाविद्यालय नवरगाव च्या एन.एस. एस. तर्फे विविध कॅम्प इथे घेतल्या जातात. धार्मिक तथा समाजहिताचे अनेक उपक्रम आमच्या डोंगरी देवस्थान, नवरगाव तर्फे आयोजित केले जातात. तसेच यावर्षी म्हणजेच सन २०२२-२०२३ मध्ये डोंगरी देवस्थान येथे वाचनालयाची सुरवात करायचे ठरविले आहे. लवकरच हे काम पूर्ण होऊन परिसरातील नवतरुण मंडळीला महानुभाव पंथाचा अभ्यास करण्याकरिता एक हक्काचे ठिकाण उपलब्ध होईल.

इतिहासाच्या गाभाऱ्यात शोधलं तर आमच्या नवरगाव परिसरात प्रभूंच्या पवित्र पाहुलांचा स्पर्श झालेला नाही. तरीही अनेक वर्षापासून महानुभाव पंथ इथे टिकून आहे, याचे कारण म्हणजे असे की प.पू.प.म.ई. पद्मनाभी बाबा, यांचे कार्य, परिश्रम आणि अनेक महंतांचे परिसरात येणे-जाणे, त्यामध्ये मुख्यतः प.पू.प.म.ई अभयराज दादा शास्त्री, प.पू.प.म.ई बाळकृष्ण शेवतकर अश्या अनेक महंतांनी इथे वास्तव्यास थांबून येथील सद्भविक मंडळींना दिलेले योग्य मार्गदर्शन. जवळपास १-२ महिने या क्षेत्रात निरंतर पोथी प्रवचनाचे कार्यक्रम नेहमी होत असत. त्यानंतर त्यांचा हा वारसा अनेक कुटुंबाने पुढे चालवीत आजवर टिकवून ठेवलेला आहे.

अनेक पीडित, दुःखाणे खचलेले, मरगळलेल्या मनाचे, उपाय न मिळालेल्या विविध समस्येने त्रस्त झालेले अनेक सदभाविक इथे मोठ्या आस्थेने येत असतात. प्रभूंच्या चरणी माथा टेकवून आपल्या व्यथा मोठ्या आशेने प्रभूंना सांगत असतात. प्रभूंच्या या पवित्र मंदिरात वातावरण एवढे भक्तीमय असते की इथे येणारा प्रत्येक व्यक्ती आपले दुःख विसरून प्रभूच्या भक्तीत विलीन होत जातो. आजच्या आधुनिक जगातील विज्ञान म्हणतो की, जर तुम्हाला कुठली चिंता सतावत असेल, किंवा मनावर एकदम भारी विचारांचे ओझे वाटत असेल, मनातल्या मनात दुःख तुम्हाला भेडसावत असेल, तर तुम्ही तुमचे दुःख आपल्या जवळच्या व्यक्तीला सांगा जेणेकरून तुमचे मन हलके होईल. तुम्ही कुणासोबत तरी तुमच्या चिंतेच्या कारणाविषयी बोललात तर तुम्हाला त्याचे उत्तर मिळण्याचे संकेत अधिक असतात. नेमके हेच विज्ञान इथे प्रभूच्या मंदिरात कामी पडते. जेव्हा तुम्ही तुमचे दुःख प्रभूच्या समोर मांडता, म्हणजेच आपण प्रभुंसोबत संवाद साधित असतो.

आपले दुःख आपल्याशिवाय कुणाला तरी सांगितले आणि ज्यांना मी सांगितले ते तर माझे पाठीराखेच आहेत, अशी भावना मनात निर्माण होते. परत दुसरी गोष्ट म्हणजे आपले परमेश्वरा सोबतचे बोलणे गुपित असल्याने दुसरा कुणी मला काय म्हणेल याची भीती आपल्याला राहत नाही. त्यामुळेच आपण आपले संपूर्ण मन त्या ठिकाणी मोकळे करीत असतो. म्हणून मंदिरात गेल्यावर आपल्याला आपले मन हलके झाल्याचा अनुभव येतो. आमच्या डोंगरी देवस्थानांच्या ठिकाणी असेच अनेक सदभाविक आपल्या मरगळलेल्या मनाला प्रफुल्लीत करून नवचैतन्याने कामाला लागतात.

दरवर्षी डिसेंबर महिन्यामध्ये श्री. दत्त जयंती निमित्त इथे खूप मोठी यात्रा भरत असते. या यात्रेची परंपरा खूप जुनी आहे मंदिराची वास्तू उभी होण्यापूर्वी म्हणजेच जेव्हा फक्त झाडाखाली छोटासा ओठा होता अगदी तेव्हापासून. पंचक्रोशीतील हजारोंच्या संख्येने सद्भाविक इथे प्रभूंच्या दर्शनासाठी इथे येतात. हलक्या गुलाबी थंडीत तेथील भक्तिमय वातावरण अगदीच मनाला नवीन ऊब देत असते. दोन दिवसीय या यात्रेत पहिल्या दिवशी नवरगाव मधून ढोलताशा आणि बँड पथकाच्या सहायाने नाचत, वाजत-गाजत भव्यदिव्य अशी श्री.प्रभूंची पालखी (मिरवणूक) काढल्या जाते. ही पालखी संपूर्ण नवरगाव नगरितून फिरवली जाते त्यानंतर दुसऱ्या दिवशी अनेक स्पर्धा आयोजित करून शाळकरी मुलांना तसेच बाहेरून आलेल्या सद्भक्तांना योग्य मार्गदर्शन दिल्या जाते. विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे आणि त्यांच्या अभ्यासाविषयीची गोडी निर्माण व्हावी याकरिता दरवर्षी जवळच्या परिसरातील महानुभाव पंथीय गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ आयोजित केला जातो. अनेक साधुसंत, महंत यांचा सहवास आणि मार्गदर्शन येथे येणाऱ्या प्रत्येक सद्भक्ताला मिळत असते. तसेच यात्रेला आलेल्या सर्व भाविकांसाठी संध्याकाळी भोजनाची व निवासाची व्यवस्था केली जाते. इथे येणारे अनेक व्यक्ती वर्षभरात अनेक विचारांनी मरगळलेल्या आणि थकलेल्या मनाला योग्य आणि उचित मार्गदर्शनाने आणि प्रभूंच्या दर्शनाने तेजोमय करून नवीन कामे करण्यास सज्ज होऊन निघून जातात.

शहरातील चमचमत्या प्रकाशात, वेगवान धावणाऱ्या गाड्यांच्या वेगात सरळ चोपड्या गुडगुडीत रस्त्यांच्या व आधुनिक वेस्टर्न स्टाईलने जगणारा नवतरुण भाविक जेव्हा इथे दत्त जयंती निमित्त भरणाऱ्या या यात्रेला प्रभू दर्शनासाठी येतो ना तेव्हा इथले भक्तीमय झालेलं वातावरण, अनेक पूजनीय साधुसंत, महंत यांचे कानी पडलेले मार्गदर्शनात्मक शब्द, तसेच नुकतेच निघालेले चण्याचे पीक, बोरीचे बोरकुट, वेरवण्या असे शहरांमध्ये न मिळणाऱ्या वस्तूंची एकत्रित मेजवानी त्यांना मिळते त्यामुळे अलगदच त्यांच्या मनात प्रभुंविषयी प्रेम, महंताविषयी आदर व पंथाविषयी आस्था असा एकत्रित गोपालकाला त्यांच्या मनावर बिंबविला जातो. म्हणून पालकांना मी विनंती करतो की त्यांनी आपल्या पाल्यांना अशा मंदिराच्या ठिकाणी किंवा महंतांच्या सहवासात काही वेळ द्यायला शिकविले पाहिजे.

मी स्वतःला खूप भाग्यवान समजतो की, अनेक शेकडो वर्षाचा ऐतिहासिक,सांस्कृतिक आणि धार्मिक वारसा लाभलेल्या या डोंगरी देवस्थान च्या परिसरात एक महानुभाव पंथीय सदभाविक घराण्यात जन्माला आलो. सुरुवातीला आई-बाबा आणि त्यानंतर अनेक साधू संत, महंतांचे मार्गदर्शन मला लाभले, व त्यामुळेच मी माझ्या मनातील भावना शब्दाद्वारे इथे मांडू शकलो त्या सर्वांचा मी शताशः ऋणी राहील.

महत्त्वाचे - अनेकांशी संवाद साधून ही माहिती गोळा केलेली आहे, त्यात मा. श्री. सुरेशजी खोब्रागडे, सेवानिवृत्त शिक्षक तथा अध्यक्ष श्री. दत्तात्रेय देवस्थान कमेटी (डोंगरी) नवरगाव यांचे मोलाचे सहकार्य मला मिळाले.

- ९३५६५२९५६१

# सोन्याची कुऱ्हाड आणि मोगऱ्याच्या कळ्या

प्रकाश एदलाबादकर,
नागपूर

साधारण पस्तीस वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. आम्ही रेशीमबागेत राहत असताना आमच्या शेजारी एक, मूळचा ग्रामीण भागातील, परिवार राहत होता. त्या घरातील कर्तापुरुष सरकारी अधिकारी होता. त्यांची, साधारण ऐंशी वर्षांची वृद्ध आई त्यांच्या कुटुंबात होती. या परिवारची जवळपासच कुठेतरी शेती होती. साहेबांचा धाकटा भाऊ शेती बघत असे. तो महिन्यातून एकदा नागपूरला येई आणि आपल्या म्हाताऱ्या आईला गावी घेऊन जाई. म्हातारी गावाकडे साधारण आठवडाभर मुक्काम करून नागपूरला परत येई. एका महिन्यात त्याचे येणे झाले नाही. एकदा शनिवारची सकाळची शाळा आटोपून मी घरी आलो. हिवाळ्याचे दिवस होते. त्या शेजारच्या मावशी घराच्या गच्चीत उन्हात बसल्या होत्या. मावशी या सुमाराला गावाला जातात हे मला ठाऊक होते. मी सहज विचारले,"मावशी गावाकडे गेल्या नाही वाटते या वेळी?"

"न्हाई ना बापू. दौलत आलाच न्हाई मले घ्यासाठी. का जनं का झालं असन तं!"मावशी उत्तरल्या." कोणतं गाव आहे तुमचं ?" माझा प्रश्न "सेलू " मावशींनी गावाचे नाव सांगितले.

"कुठे येते हे गाव?"पुन्हा माझा सवाल.

"तुले म्हाईत न्हाई सेलू?" आता मावशीचं प्रश्न.

"नाही मावशी. माझा सगळा जन्म शहरात गेला. मला खेडं नाही ठाऊक. कुठे येते सेलू? "माझ्या या प्रश्नाच्या उत्तरात मावशींनी जे सांगितले ते मी जन्मात विसरू शकणार नाही. माझ्या विदर्भाची श्रीमंती मावशींनी फक्त दोन ओळीत मावशींनी सांगितली. विदर्भाचा




असा भूगोल शाळेतल्या कोणत्याही मास्तरांनी सांगितला नव्हता. सेलू कुठे येते हे सांगताना मावशी म्हणाल्या .....

"नव लाखाची झाडी,बावन लाखाचं वऱ्हाड आन मंदी येते सेलू घोराड "

हे ऐकल्या बरोबर माझ्या अंगावर काटा आला. विदर्भाचे तसे दोन भाग पडतात. एक वऱ्हाड आणि दुसरा झाडीपट्टी. अकोला,अमरावती,बुलढाणा, वाशीम आणि यवतमाळ हे जिल्हे म्हणजे वऱ्हाड आणि गोंदिया, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली म्हणजे झाडीपट्टी. नागपूर आणि वर्धा हे दोन जिल्हे ना वऱ्हाडात,ना झाडीत! परंतु वध्यार्ला वऱ्हाड जवळचे आणि नागपूरला झाडी! वर्धा नदी ही विदर्भाचे बरोबर उभे दोन भाग करते. त्या नदीच्या काठावर सेलू गाव येते एवढाच अर्थ मला समजला. परंतु नेमका अर्थ काय हा प्रश्न मला अस्वस्थ करी.

पुढे एका ज्येष्ठ व्यक्तीला मी या म्हणीचा अर्थ विचारला. त्यांनी असे सांगितले की, वऱ्हाडची सुजलाम सुफलाम सुपीक भूमी म्हणजे पांढऱ्या सोन्याचे आगर! अव्वल इंग्रजी जमान्यात तत्कालीन ब्रिटिश सरकारला, काळ्या मातीच्या संपन्न वऱ्हाडातून बावन्न लाखाचा महसूल मिळत असे. म्हणूनच "वऱ्हाड अन सोन्याची कुऱ्हाड " ही म्हण प्रचलित झाली असावी. झाडीपट्टी म्हणजे वनसंपदेचा भाग आणि तांदळाचे कोठार! मोगऱ्याच्या कळ्यांसारखा भात! या लाल मातीच्या आणि तलावांनी संपन्न असलेल्या झाडीतून सरकारला नऊ लाखाचा महसूल मिळत असे. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील रकमेचे हे आकडे आहेत, हे लक्षात घ्या. ही होती माझ्या विदर्भाची श्रीमंती! विदर्भ केवळ संपत्तीनेच श्रीमंत नव्हता आणि आजही नाही. मनानेही हीच श्रीमंती आजवर जपलेली आहे आणि पुढेही जपेल.

## बाल मनातील श्रावणमास

श्रावण मास येता चैतन्य फुलतो
आमच्या चेहऱ्यावर आनंद झळतो
पावसाच्या सरी अंगावर बरसतो
चिखलात आम्ही झिम्मा खेळतो

ऊन-पावसाचा खेळ चालतो
आकाशात इंद्रधनुष्य खुलतो
सप्तरंगाची उधळण करतो
आईच्या साडीची उपमा देतो

तान्हा पोळ्याची रेस लावतो
नंदीबैल जणू डौलात सजतो
पुरणपोळीचा मुखी नैवद्य भरतो
बोजाऱ्याच्या नाणींनी खिसा फुगतो

दुकानात आम्ही रेलचेल करतो
खाऊंच्या खरेदीत गोंधळ उडतो
चॉकलेट कुरकुऱ्यांचा स्वाद जडतो
जेवनाकडे आम्ही पाठ फिरवतो

लिपिकासम सुनील कलम चालवितो
लहान सहानांची अबोल प्रित रेखाटतो
शब्दशब्दांची माला हा गुंफतो
बाल मनातील कविता साकारतो

- सुनील शिरपुरे
कमळवेल्ली,यवतमाळ
भ्रमणध्वनी-७४९८८८५०६१



# इंद्रायणी : स्त्रीमनाच्या जीवन संघर्षाची कहाणी

प्रा. विनय पाटील
वेलतूर, नागपूर

इंद्रायणी कादंबरी हातात पडताबरोबर तिने मनाचा ठाव घेणे सुरू केले. एका ध्येयवादी तरुणीच्या प्रखर संघर्षाची अनमोल गाथा लेखिकेने कादंबरी स्वरूपात मांडलेली आहे. खरं तर ही मुळातून वाचणेच हे साहित्य सृजनाचे आनंद सोहळा भोगणे आहे.

लेखिका छाया राऊत बर्वे यांच्या पहिल्या वहिल्या कादंबरीला नागपूरचे प्रथितयश कवी, लेखक समीक्षक व "ब्लर्ब"कार प्रभाकर तांडेकर 'प्रदत्त ' यांच्या पाठराखणीचे डौलदार कोंदण लाभले आहे. तिच्या स्वरूपाचे वर्णन करताना 'प्रदत्त' म्हणतात...."२४ भागात विभागलेली ही कादंबरी अशोक चक्रातील २४ आरेनुसार माणसाने जीवनाच्या सुंदरतेसाठी २४ तास सजग होऊन शांती, प्रगती व गतीचे परिशिलन करावे." कादंबरीच्या विषयगाभ्याचे इतके तत्त्वनिष्ठ वर्णन केवळ 'ब्लर्ब'कारच करू शकतो.

इंद्रायणी ऊर्फ इंदू या नायिकेभोवती फिरणारी कथा आपल्या मनाचा ठाव घेतल्याशिवाय राहत नाही. लेखिकेने आपल्या पूज्य मातोश्रीला लेखन कादंबरीच्यारूपाने अर्पण केले आहे. शिवाय या कादंबरीला महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध साहित्यिका तथा विदर्भ साहित्य संघ केंद्रीय कार्यकारणीच्या सन्माननीय सभासद डॉ. शोभा रोकडे यांनी आपल्या अभ्यासू व रसाळ प्रस्तावनेने सुशोभित केले आहे. तसेच कादंबरीला त्रिदल लेखक- लेखिकेचे अभिप्राय लाभले आहे. यामध्ये देहू येथील रशिया सुलताना, अमरावतीचे आबासाहेब कडू (वऱ्हाडी साहित्यिक), अमरावतीच्या ॲड. नीता कचवे (अध्यक्ष बांधिलकी प्रतिष्ठान) यांचे प्रोत्साहन लेखिकेची जमेची बाजू ठरल्या आहेत. कादंबरीचे मूळ वाचन आरंभ करण्यापूर्वी लेखिकेने आपल्या मनोगतातून त्यांची भूमिका अलगदपणे मांडली आहे. 'इंद्रायणी' कादंबरी ही दोन्ही कला माध्यमातून आपल्या भेटीस येते; ती म्हणजे कादंबरीत विखुरलेल्या काव्यपंक्ती आणि कथेच्या ओघातून येणारे अनेक विविध प्रसंग.

गद्य स्वरूपातील कादंबरीचा बाज त्यातील प्रकरणातून उधृत केला. काव्याच्या ओळीही कादंबरीच्या हातात हात घालून पुढे सरकत जातात. यातील लेखन शैलीची वैशिष्ट्य म्हणजे ठराविक अशी अनेक वाक्ये बोधवाक्य किंवा चिंतनात्मक घोषवाक्य वाटावीत; अशी लेखिकेने वापरली आहेत.




आता हेच पहा ना.... प्रकरण ७ मधील सुरुवातच मुळी काव्यात्मक वाक्याने झाली आहे. पृष्ठ क्रमांक ५६ "जीवनाला अनेक कंगोरे असतात; कधीकधी तर मनाची थेट द्वारे उघडतात तर कधी आपोआप बंद होतात. यातून रचनेतील नाद, माधुर्य आपसुकच आपल्या अनुभवायला मिळते. पारंपारिक लेखनानुसार कादंबरी ही दीर्घ लेखनाचा साहित्यप्रकार आहे पण त्याला कादंबरीकार लेखिका छाया राऊत त्यांनी काव्यछंदात्मक चारोळी सदृश्य काव्यपंक्तीचा मुक्त वापर केलेला दिसतो. लेखिकेने इंदूच्या मुखातून हलकेच या काव्यपंक्ती उदक उधृत केल्या आहेत.

"रंगीबेरंगी शेवंती
फुलांची हाय राणी
डोलत हाय वाऱ्यावर
गात हाय गाणी.....

संघर्षातून आयुष्याला यशस्वी करणारी नायिका म्हणजे इंद्रायणी. तिचं बालपण, संस्कार, संघर्ष, सामाजिक यातना या सगळ्या पातळीवर कादंबरीचे अनेक पैलू वाचकाच्या नजरेत येतात.

**कादंबरी :** इंद्रायणी
**लेखिका :** छाया राऊत-बर्वे
**(मो. ८३९००८६९१७)**
**प्रस्तावना :** डॉ. शोभा रोकडे
**ब्लर्ब :** प्रभाकर तांडेकर 'प्रदत्त'
**प्रकाशन :** स्मृतीगंध प्रकाशन
**मूल्य :** २००/- रुपये

समाजासाठी काहीतरी प्रामाणिकपणे करावे या ध्यासासाठी ती आपले दायित्व निभावते. परिस्थितीला शरण न जाता वेदनांची भांडवल न करता ती आपल्या कर्तव्यपथावर चालते. ती शिकवणी वर्ग घेते. स्वतः पैसा कमावते आणि वस्तीमधील इतर मुलांनाही सबळ बनवते. खेड्यातल्या जीवनातून नव्याने शहरी राहणीमानाची ओळख इंद्रायणीला तिच्या लग्नानंतर होऊ लागली. नवदांपत्य जीवनातील तिचे स्थान म्हणजे जंगलात खडकावर उगवलेल्या फुलांचे रोपटे कुणीतरी शहरी बागेतल्या कुंडीत रोपावे, असे झाले.

शहराचा कसलाही गंध नसलेली इंदू शहरात आपल्यावर थोडी बावचळली, घाबरली. परंतु मुळातच चाणक्य व धीट असलेल्या इंदूने काहीही जाणवू दिले नाही. इंदूच्या जीवनातील हा घडीपालट काहीसा अस्वस्थ करून गेला. पण तिचा नवरा महत्त्वाकांक्षी असल्यामुळे तिला हा नवजीवन प्रवास आनंदी वाटू लागला. लेखिकेने येथे प्रतिकात्मकरीत्या कादंबरीच्या कथानकाला वातावरण बदलाची चांगली झालर दिली.

येथून तिच्या पुढील आयुष्याच्या जीवन संघर्षाची, कष्टाची व प्रयत्नांची नवी मालिका सुरू होते. तिच्या नवऱ्याची वसंता हे नाव सुद्धा सुचक वाटते; कारण वसंतात संपूर्ण सृष्टी नवनिर्मितीच्या सौंदर्याने नटलेली शोभून दिसते. तसेच काहीसे इंदूच्या जीवनातही झाले आणि कथेतल्या नायकेच्या जीवनाचा साथीदार असलेला तिचा नवरा वसंताचेही सहकार्य लाभले.

कथानकातील घटना, प्रसंग व पात्र निर्मितीच्या विकासाला चालना देणारे ठरतात. नवीन घराचे स्वप्न बघू पाहणाऱ्या इंदूचे आता वसंताच्या रूपाने पूर्ण होते. अशातच नवीन घर उभारणी आणि विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठीचा पक्का आसरा याबद्दलही तिच्या मनात स्वप्न रुंजी घालत असते; पण घरचा, मुलाबाळांसोबतच नेटका संसार आणि स्वप्नपूर्तीचे प्रयत्न याचा मेळ बसवायला तिला बरेच अडथळे येतात. त्यामुळे कथेची रंजकताना आणि प्रवाहीपणा जोपासला जातो. लेखिकेच्या साहित्यिक प्रवासासाठी अनंत शुभेच्छा.

- ७८८८२८०५१३

# बाप्पांच्या उत्सवासाठी बापटांचा डि.जे. विरोध

गणेश पांडे
जि. नागपूर

सध्या पुणे हे तेथील घडत असलेल्या काही घटनांमुळे अलिकडे सामान्य जनतेमध्ये चर्चेचा विषय ठरत आहे,त्यातील एक प्रमुख घटना म्हणजे सामाजिक कार्यकर्ते विद्यानंद बापट यांनी गणेशोत्सव वा अशा प्रकारच्या तत्सम उत्सवांमध्ये प्रचलीत असलेल्या व उत्सवाच्या काळात मोठ्या प्रमाणावर ध्वनिप्रदूषण करणाऱ्या डि.जे.,डॉल्बीसारख्या कर्कश व कानठळ्या बसवणाऱ्या वाद्यांच्या वापराबद्दल खुलेआम घेतलेली विरोधाची भूमिका आणि त्यांच्या या भूमिकेला जन सामान्यांमधून मोठ्या प्रमाणावर समर्थन मिळत असतानांच त्यांना विरोध करणाऱ्यांकडून त्यांनी उपस्थित केलेल्या गणेशोत्सव वा तत्सम उत्सवांमधील कर्णकर्कश गोंगाट करणाऱ्या वाद्य वा वाद्यवृंद वा वाद्य संस्कृतीच्या वाढत्या वापरामुळे व प्रसारामुळे निर्माण होणाचा ध्वनिप्रदूषणाच्या व त्यामुळे आधीच आधुनिकतेच्या खांद्याला खांदा लावून आलेल्या व दिवसेंदिवस वाढतच असलेल्या यांत्रिकिकरणामुळे होणाऱ्या हवा व ध्वनिप्रदूषणाच्या आरोग्यावर होणाऱ्या हानिकारक दुष्परिणामांना सहन करीत असलेल्या सर्वसामान्य जनतेला यातून दिलासा देण्याच्या दृष्टीने सकारात्मक प्रतिसाद न देता व सर्वसाधारणपणे साधक बाधक विचार वा मंथन न करतां विरोधाला विरोधाची भूमिका अनुसरत व उपस्थित केलेल्या प्रश्नांना मुद्देसूद प्रतिवाद न करता, तर्कसंगत वैचारिक विरोधाची भूमिका घेण्याचा सुसंगत मार्ग सोडून त्यांना धर्मद्रोही ठरवून त्यामानाने सोपा शिवराळ भाषेत शिविगाळ व मारहाण करण्याचा विसंगत व आक्रमक पवित्रा घेतला गेला.

पुण्यासारख्या पुण्यभूमी म्हणविणाऱ्या शहरात घडलेल्या या व अशा घटनांमुळे पुणे सध्या सर्व देशभर चर्चेचा विषय ठरत आहे व सामान्य नागरिक म्हणून सर्वांचीच या विषयी काही ना काही मतं असतीलच व असायलही हवी. आजकाल देशात अस्तित्वात असलेल्या विविध समस्या व विषयांशी संबंधित व सामान्य नागरीकांच्या सुख सुविधा असुविधा वा दैनंदिन आरोग्य व जीवनाशी निगडित महत्त्वाच्या असलेल्या अशा प्रकारच्या घटना घडताना कुठे ना कुठे आपण ऐकतच असतो. परंतु महाराष्ट्रातील सर्वसामान्य जनतेच्या अस्मिता व भावनांशी जुळलेल्या व प्रत्येक मराठी माणसाला आपल्या दैवतासमान आपलासा वाटणाऱ्या व घरोघरी आपल्या शुभागमनाने आनंदपर्व घेऊन येणाऱ्या श्री गणेशाच्या गणेशपर्वाशी, गणेशोत्सवाशी संबंधित व अगदी गणेशोत्सव उंबरठ्यावर असताना पुण्यातील विद्यानंद बापट यांच्या डीजे विरोधाच्या भूमिकेमुळे व त्यातून निर्माण झालेल्या समर्थन व विरोधी भूमिका असलेल्या जनमताने व त्यातून घडलेल्या शिविगाळ व मारहाण प्रकरणामुळे पुणे व अवघ्या महाराष्ट्रातील जनमानसं ढवळून निघाला आहे.

एवढेच नव्हे तर हि घटना व त्यातून घडणारे विचार मंथन, निघणारे निष्कर्ष, काढले जाणारे तोडगे, पडणारे पायंडे व होणारे परिणाम हे आपल्या उत्सवप्रिय देशात उत्सवांच्या साजरीकरणाच्या दृष्टीने नवी सकारात्मक दिशा व दृष्टी देण्यासाठी परीणामकारक ठरणारे आहेत व हि घटना त्या दृष्टीने भविष्य काळासाठी परीवर्तनाची नांदी ठरणारी आहे.



आता विद्यानंद बापट यांनी डीजे सारख्या कर्णकर्कश वाद्यांच्या वापरावर गणेशोत्सवात बंदी वा निर्बंध घालण्याची भूमिका ही काही त्यांच्या उनाड व्रात्य मेंदुतुन निघालेली एखादी खुळचट, खोडसाळ कल्पना नाही तर ती त्यांच्या तल्लख बुद्धीतुन सुक्ष्म सखोल अभ्यासाअंती निघालेली वरवर क्षुल्लक भासणारी परंतु आजच्या आमच्या भान हरवून, बेभान होत चाललेल्या उत्सव प्रियतेमुळे दिवसेंदिवस वाढत चाललेल्या ध्वनिप्रदूषणा सारख्या अत्यंत गंभीर व सर्व सामान्यांच्या आरोग्यासाठी धोकादायक असलेल्या समस्येबाबत अभ्यासपूर्ण, विचारपूर्वक, विवेचनात्मक व होणाऱ्या विरोधाची कल्पना असुनही त्याला न जुमानता,निर्भिडपणे मांडलेली भूमिका आहे व त्याचे परीणाम हि त्यांना सहन करावे लागत आहे. तसेच ती पुवार्पार चालत आलेल्या आपल्या धार्मिक उत्सवांचे पावित्र्य व सोज्वळता न जपता वाढलेली स्वच्छंदता, स्पर्धात्मकता व बाजारूकरण यांना पायबंद घालण्यासाठी व या धार्मिक उत्सवांची सोज्वळता,पावित्र्य व महत्त्व जपण्याच्या दृष्टीने महत्त्वाची ठरणारी आहे. त्यांच्या या गणेशोत्सवा बाबतीत डिजे विरोधी भुमिकेला वैचारीक निष्कर्षांवर समर्थन देणारा बहुसंख्य सुजाण वर्ग आहे कारण हा प्रश्न व डिजेमुळे होणाऱ्या कर्कश आवाजाने होणाऱ्या ध्वनिप्रदूषणाचा प्रत्येकालाच त्रास होतो परंतु, धार्मिक बाब असल्याने उघडपणे त्याविरोधात कुणी बोलायची हिंमत करित नाही कारण धर्म विरोधी असल्याचा व धार्मिक बाबींवर टीका केल्याचा राग व रोष त्यांना ओढवून घ्यायची भीती असते व ते प्रत्येक व्यक्ती या नात्याने बरोबरही आहे.

माझे व्यक्तीशः विद्यानंद बापट यांच्या भूमिकेला समर्थन आहे व जर कुठली चांगली सुरुवात कुणी करत असेल तर प्रत्येक जबाबदार व विचारशील व सुजाण नागरिक त्यांच्या या भूमिकेला निश्चितच समर्थन देतील व द्यायला पाहिजे व समर्थन देऊ शकत नसले तरी उगाच आपली अतिरेकी धर्मनिष्ठा जागृत करून, कमीत कमी विरोध तरी करू नये. अर्थात हि डिजे विरोधी भूमिका केवळ गणेशोत्सव वा हिंदू धर्मियांच्या सणांबाबत मर्यादित न राहता,हि भूमिका हिंदू, मुस्लिम,शिख, जैन, ख्रिश्चन,पारशी या सर्वंच धर्मियांच्या उत्सव व सणांच्या बाबतीतही तेवढीच काटेकोर, कडक व कडकडीत असायला पाहिजे व त्यादृष्टीने प्रत्येक जाती, धर्म व पंथ, समुदायातील सुजाण नागरिकांनी आपापल्या जाती, धर्म व समाजात जागृती निर्माण करणे आवश्यक आहे व हिच आजची खरी गरज आहे व उद्याचा भविष्यकाळ उज्ज्वल व आशादायी होण्यासाठी हे होणे एक शुभ सुरुवात व शुभ चिन्हक आहे.

- ९५०३३५०५७४

# उमरेडच्या भागवत भांगे यांचा सेवाभावी शिक्षक पुरस्काराने गौरव!



दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड
सतिश तुळसकर

उमरेडच्या मातीत शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवून नागपूरच्या शिक्षण क्षेत्रात गेल्या १६ वर्षांपासून उल्लेखनीय सेवा बजावणारे प्रा. भागवत भांगे यांचा सेवासदन शिक्षण संस्थेच्या वतीने 'सेवाभावी शिक्षक पुरस्काराने' गौरव करण्यात आला. सेवासदन शिक्षण संस्थेच्या शतसंवत्सरीय महोत्सवी वर्षात मिळालेला हा सन्मान त्यांच्या प्रदीर्घ आणि सेवाभावी अध्यापन कार्याची पावती ठरला आहे.

उमरेड शहरातील नगर परिषद जोगीठाणा क्र. १ येथून प्रा. भांगे यांच्या शैक्षणिक प्रवासाची सुरुवात झाली. जीवन विकास विद्यालय, उमरेड येथून माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण घेतल्यानंतर नूतन आदर्श महाविद्यालयातील स्व. डॉ. कल्पनाताई व्यवहारे आणि डॉ. सुषमा लाखे यांसारख्या शिक्षणव्रती व्यक्तिमत्त्वांचा सहवास त्यांना लाभला. या जडणघडणीसोबतच घरातील संस्कारांनी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आकार दिला.

वडील स्व. माणिकराव भांगे यांनी प्रामाणिकपणाचा संस्कार दिला, तर आई इंदूबाईंनी मायेची ऊब दिली. शिक्षक असलेले बंधू दत्ता भांगे, डॉ. बळीराम भांगे आणि ताई यशोदा भांगे यांच्या प्रेरणेने शिक्षण आणि समाजाप्रती असलेली बांधिलकी अधिक दृढ झाली. अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या संस्कारातून त्यांच्या सामाजिक जाणीवेला आणि राष्ट्रहिताच्या विचारांना व्यापक दिशा मिळाली.

याच संस्कारांच्या बळावर त्यांनी नागपूरच्या शिक्षण क्षेत्रात वाटचाल सुरू केली. गेल्या १६ वर्षांपासून शंभर वर्षांची गौरवशाली परंपरा असलेल्या सेवासदन शिक्षण संस्थेत अध्यापन करताना त्यांनी विद्यार्थ्यांप्रती आत्मीयता, प्रभावी अध्यापन आणि सातत्यपूर्ण परिश्रमातून संस्थेच्या शैक्षणिक कार्यात योगदान दिले.

त्यांच्या कार्याची दखल घेत शिक्षक दिनाच्या कार्यक्रमात त्यांना 'सेवाभावी शिक्षक पुरस्कार' प्रदान करण्यात आला. राष्ट्रसेविका समितीच्या प्रमुख संचालिका वंदनीय शांताक्का यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या मंचावर जायका मोटर्स, नागपूरचे संचालक कुमार काळे यांच्या हस्ते हा सन्मान प्रदान करण्यात आला. यावेळी संस्था अध्यक्षा कांचनताई गडकरी आणि संस्थासचिव वासंती भागवत यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रा. भांगे यांची २०१८ मध्येही याच पुरस्कारासाठी निवड झाली होती. तसेच २०२५ मध्ये त्यांनी अध्यापन केलेल्या विषयात संस्थेचा सर्वोत्कृष्ट निकाल आणि विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या सर्वाधिक गुणांची दखल घेत त्यांना पुरस्काराने गौरविण्यात आले होते. सातत्याने मिळालेले हे सन्मान त्यांच्या अध्यापनातील गुणवत्ता आणि विद्यार्थ्यांच्या यशासाठी घेतलेल्या परिश्रमांची साक्ष देतात.

**सेवासदन शिक्षण संस्थेच्या शतसंवत्सरीय वर्षात १६ वर्षांच्या शिक्षणसेवेचा सन्मान !**

सेवासदन शिक्षण संस्थेने नुकतीच शंभर वर्षांची गौरवशाली वाटचाल पूर्ण केली असून सध्या शतसंवत्सरीय महोत्सवाचे वर्ष सुरू आहे. २ जानेवारी २०२६ रोजी पूजनीय गोविंददेव गिरी महाराज यांच्या हस्ते महोत्सवाचे उद्घाटन झाले असून २ जानेवारी २०२७ रोजी त्याचा समारोप होणार आहे. अशा ऐतिहासिक वर्षात संस्थेच्या १६ वर्षांच्या सेवेला मिळालेला प्रा. भागवत भांगे यांचा हा सन्मान विशेष महत्त्वाचा ठरला आहे.

उमरेडच्या मातीतून झालेली जडणघडण, आई-वडिलांचे संस्कार, भावंडांची प्रेरणा आणि सेवासदनमध्ये मिळालेले कर्मभूमीचे व्यासपीठ या सर्वांचा सुंदर संगम त्यांच्या प्रवासात दिसून येतो. त्यामुळे हा पुरस्कार केवळ एका शिक्षकाचा गौरव न राहता उमरेडच्या मातीतून घडलेल्या शिक्षणनिष्ठ व्यक्तिमत्त्वाच्या कायार्चा गौरव ठरला आहे.

# शेतकऱ्यांचा उत्साहाचा सण बैलपोळा

**१) खांदे मळण:** पोळ्याच्या पुर्वसंध्येला बैलांचे वर्षभर मानेवरच्या जुवाने दुखावलेले खांदे हळद लोण्याने खांदे मळतात व त्याविषयी कृतज्ञता व्यक्त केली जाते. यादिवशी सायंकाळी त्यांचे विधीवत पूजन करून गळ्यातील घंटेचा जोरात नाद करुन दुसऱ्या दिवशीच्या पोळा सणाला जेवनाचे आमंत्रण कानात सांगीतले जाते, आणि नैवेद्यात त्याला विविध पाने गव्हाच्या उंड्यात लहान लहान गोळ्यात उकडीचे वंड,गुळपोळी इ.असते, मान्यता आहे की जर एखाद्या बैलाला आमंत्रणाचा विसर पडला तर पोळ्याच्या दिवशी बैल जेवण घेत नाही. यादिवशी कामावर असलेला मजुरवर्ग,शेतमालक सारे सोबत जेवण करतात. अशा पद्धतीने शेतकरी वर्ग विशेष करून ग्रामीण भागात हा दिवस उत्साहात साजरा करतो.



**२) बैलपोळा :** आपल्या शेतीप्रधान देशात विशेष करून महाराष्ट्रात श्रावण अमावस्येला बैलांची वर्षभर राबलेल्या कामासाठी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी म्हणून त्यांच्या नावाने पोळा हा सण अतिशय थाटामाटात साजरा केल्या जातो. आणि आध्यात्मिक दृष्टिकोनातून त्याला नंदी म्हणजे महादेवाचं वाहन म्हणून शंकराचे ठाई मानून पूजन केले जाते. आदल्या दिवशी म्हणजे खांदे मळणीलाच त्याला पोळ्याच्या सणाचं जेवणाचे आमंत्रण दिले जाते. सकाळी नदीवर स्नान घालून त्याला स्वच्छ केल्यानंतर त्याला सजवून विविध रंगांचे आभूषणे यांनी सुंदर श्रृंगार करताना आरसे, झुली, वेसण, गोंडे, म्होरकी इत्यादी अनेक प्रकारे सजविण्यात बळीराजाची स्पर्धा लागते, स्पर्धेमध्ये त्याची तंदुरुस्ती शरीरयष्टी, शिंगाचा आकर्षकपणा इ. विचारात घेतला जातो. दुपारनंतर बैल गावातील मैदानात तोरणाखाली उभे करून मानाच्या बैलांना प्रथम तोरणाखाली आणून मग गावातील सर्व बैलांना सोबत पूजन करून पुरणपोळीचा नैवेद्य अर्पण करतात यावेळी गावातील झाडून सर्व लहान थोर नवे कोरे वस्त्र परिधान करून,जातीने हजर असतात. काही ठिकाणी मंगलाष्टके म्हणून लग्न लावण्याची प्रथा आहे. नंतर देवदर्शन करून बैलांची गावात वाजतगाजत मिरवणूक काढण्यात येत असताना महिला आपल्या दारासमोर पंचारती ओवाळून नैवेद्याचा घास घालतात, यानंतर जेवण झाल्यावर प्रत्येकाच्या घरी पानसुपारीचा कार्यक्रम असतो, वयाने लहान मंडळी ज्येष्ठांचे दर्शन घेतात व भेट म्हणून कमरेचा करदोडा देण्याची प्रथा आहे. यावेळी प्रत्येक जण घरोघरी भेटी देऊन विचारांची देवाणघेवाण करत अतिशय उत्साहाने आणि आनंदाने हा सण विशेष करून ग्रामीण भागात आजही असाच साजरा केल्या जातो. यांत्रिक शेतीमुळे बैलांची संख्या कमी झाली तरी बळीराजाने या सणाचे महत्त्व अबाधित राखले आहे.

**३) तान्हा पोळा :** पोळ्याच्या करेला म्हणजे दुसऱ्या दिवशी लहान मुले लाकडाचे बैलांना रंग देऊन झुली घालून त्यांचा सुंदर श्रृंगार करून सजवतात व बाळ गोपाळ यांचा बैलपोळा भरवून आपला आनंद साजरा करतात, यामध्ये बैलांना सजविण्याची स्पर्धा सुद्धा लागते.

**- डॉ.प्रकाश पांडे, वाशीम**